शिक्षण संचालनालय, गोवा सरकार, गोवा

# सुलभ गोमंत भारती

## पुस्तक तिसरे

## इयत्ता सातवी

GOVERNMENT OF GOA

२०१४

शिक्षण संचालनालय, गोवा सरकार, गोवा

सुलभ गोमंत भारती

पुस्तक तिसरे

इयत्ता सातवी

GOVERNMENT OF GOA

२०१४

मुद्रण : २००६
पुनर्मुद्रण : २००७
पुनर्मुद्रण : २००८
पुनर्मुद्रण : २००९
पुनर्मुद्रण : २०१०
पुनर्मुद्रण : २०११
पुनर्मुद्रण : २०१२
पुनर्मुद्रण : २०१३
पुनर्मुद्रण : २०१४

**प्रकाशक :**

शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय,
पर्वरी, गोवा.

**निर्मिती :**

राज्य शिक्षणशास्त्र संस्था
आल्त - पर्वरी - गोवा

**मुद्रक :**

**गणेश प्रिंटर्स**
ई-४, न्यू को-ऑप. सोसायटी,
वाय. पी. पोवार नगर,
कोल्हापूर - ४१६००८
फोन. : ९८२२५५३३९४

**© शिक्षण संचालनालय, पर्वरी गोवा-४०३००१**

## निवेदन

आपणांस माहित असेलच की, भारत सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून गोव्याच्या राज्य शिक्षणशास्त्र संस्थेने इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार केलेला असून त्याची अमलबजावणी जून १९९४ पासून करण्यात आली आहे.

१९९४-९५ मध्ये इयत्ता पाचवीची, १९९५-९६ मध्ये इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके तयार करण्यात येऊन ती शाळांमध्ये लावण्यात आली. त्यापुढील पायरी म्हणून चालू वर्षी (१९९६-९७) इयत्ता सातवीची पाठ्यपुस्तके तयार केलेली असून ती जून १९९६ पासून शाळांमध्ये लावण्यात येत आहेत.

वरील कार्यक्रमानुसार मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी तयार करण्यात आलेले ''सुलभ गोमंत भारती'' पुस्तक तिसरे, इयत्ता सातवी हे पुस्तक आपल्या हाती देत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

राज्य शिक्षण शास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रम विकसन कक्षाने तयार केलेले हे पाठ्यपुस्तक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना भाषाविषयक क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**शिक्षण संचालक**

मुद्रण : २००६
पुनर्मुद्रण : २००७
पुनर्मुद्रण : २००८
पुनर्मुद्रण : २००९
पुनर्मुद्रण : २०१०
पुनर्मुद्रण : २०११
पुनर्मुद्रण : २०१२
पुनर्मुद्रण : २०१३
पुनर्मुद्रण : २०१४

**प्रकाशक :**

शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय,
पर्वरी, गोवा.

**निर्मिती :**

राज्य शिक्षणशास्त्र संस्था
आल्त - पर्वरी - गोवा

**मुद्रक :**

**गणेश प्रिंटर्स**
ई-४, न्यू को-ऑप. सोसायटी,
वाय. पी. पोवार नगर,
कोल्हापूर - ४१६००८
फोन. : ९८२२५५३३९४

**© शिक्षण संचालनालय, पर्वरी गोवा-४०३००१**

निवेदन

आपणांस माहित असेलच की, भारत सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून गोव्याच्या राज्य शिक्षणशास्त्र संस्थेने इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार केलेला असून त्याची अमलबजावणी जून १९९४ पासून करण्यात आली आहे.

१९९४-९५ मध्ये इयत्ता पाचवीची, १९९५-९६ मध्ये इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके तयार करण्यात येऊन ती शाळांमध्ये लावण्यात आली. त्यापुढील पायरी म्हणून चालू वर्षी (१९९६-९७) इयत्ता सातवीची पाठ्यपुस्तके तयार केलेली असून ती जून १९९६ पासून शाळांमध्ये लावण्यात येत आहेत.

वरील कार्यक्रमानुसार मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी तयार करण्यात आलेले ''सुलभ गोमंत भारती'' पुस्तक तिसरे, इयत्ता सातवी हे पुस्तक आपल्या हाती देत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

राज्य शिक्षण शास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रम विकसन कक्षाने तयार केलेले हे पाठ्यपुस्तक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना भाषाविषयक क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**शिक्षण संचालक**

# प्रस्तावना

गोवा सरकारने नवीन अभ्यासक्रम सर्व शाळांमध्ये क्रमान्वित केल्यावर त्यावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने हाती घेत-ले. ह्या उपक्रमात गेल्या वर्षी (१९९५-९६) इयत्ता सहावीसी सर्व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात आली.

ह्याच मालिकेतील इयत्ता सातवीची पुस्तके ह्या वर्षी राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने तयार केली. त्यातील मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी 'सुलभ गोमंत भारती' पुस्तक तिसरे तयार करण्यात आले आहे.

हे पुस्तक तयार करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण ध्यानात घेण्यात आले आहे.

ह्या पुस्तकाच्या निर्मितीसाठी खालील व्यक्तींचा सहभाग लाभला आहे.

**✶ लेखक समिती ✶**

श्री. मनोहर द. कोरगांवकर (निमंत्रक)

श्री. दशरथ स. शेटगांवकर — श्रीमती गीता गो. काळे
श्री. सुरेश बा. राणे — श्रीमती शैलजा स. किनळेकर
श्री. नारायण बा. धारगळकर — श्री. चंद्रकांत म. गांवस
श्री. लक्ष्मण वा. बेहरे — श्री. मारुती धों. दळवी
श्री. ज्ञानेश स. सावंत — श्रीमती कृष्णाबाई भा. नायक

**✶ परीक्षण समिती ✶**

श्री. बबन पंडित — श्री. चंद्रकांत चिपळूणकर

वरील सर्व सभासदांचे तसेच त्यांच्या संस्थाचालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

संचालक
राज्य शिक्षण शास्त्र संस्था,
आल्त पर्वरी गोवा


# प्रस्तावना

गोवा सरकारने नवीन अभ्यासक्रम सर्व शाळांमध्ये क्रमान्वित केल्यावर त्यावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने हाती घेत-ले. ह्या उपक्रमात गेल्या वर्षी (१९९५-९६) इयत्ता सहावीसी सर्व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात आली.

ह्याच मालिकेतील इयत्ता सातवीची पुस्तके ह्या वर्षी राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने तयार केली. त्यातील मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी 'सुलभ गोमंत भारती' पुस्तक तिसरे तयार करण्यात आले आहे.

हे पुस्तक तयार करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण ध्यानात घेण्यात आले आहे.

ह्या पुस्तकाच्या निर्मितीसाठी खालील व्यक्तींचा सहभाग लाभला आहे.

**✶ लेखक समिती ✶**

श्री. मनोहर द. कोरगांवकर (निमंत्रक)

श्री. दशरथ स. शेटगांवकर — श्रीमती गीता गो. काळे
श्री. सुरेश बा. राणे — श्रीमती शैलजा स. किनळेकर
श्री. नारायण बा. धारगळकर — श्री. चंद्रकांत म. गांवस
श्री. लक्ष्मण वा. बेहरे — श्री. मारुती धों. दळवी
श्री. ज्ञानेश स. सावंत — श्रीमती कृष्णाबाई भा. नायक

**✶ परीक्षण समिती ✶**

श्री. बबन पंडित — श्री. चंद्रकांत चिपळूणकर

वरील सर्व सभासदांचे तसेच त्यांच्या संस्थाचालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

संचालक
राज्य शिक्षण शास्त्र संस्था,
आल्त पर्वरी गोवा

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | खरा अर्थ | १ |
| २. | असा धरी छंद | ६ |
| ३. | आणि ते हुतात्मे झाले! | १० |
| ४. | ऋतुचक्र | १४ |
| ५. | चित्र (कविता) -- मंगेश पाडगांवकर | १७ |
| ६. | मी एक डास..... | १८ |
| ७. | मन करा रे प्रसन्न! | २२ |
| ८. | बँक | २६ |
| ९. | चित्रकार दलाल | २९ |
| १०. | हिरवी स्वप्ने आकारू (कविता) --कल्याण इनामदार | ३२ |
| ११. | शर्थीची झुंज | ३३ |
| १२. | बांबूकाम | ३७ |
| १३. | प्रजाहितदक्ष अहिल्याबाई | ४२ |
| १४. | थोर गणिती | ४६ |
| १५. | घडवू महान हिंदुस्तान (कविता)- पुष्पाग्रज | ४९ |
| १६. | विज्ञानाची कास | ५० |
| १७. | साप-आपला मित्र! | ५३ |
| १८. | निघाली सहल | ५६ |
| १९. | कायापालट | ५९ |
| २०. | मुले आम्ही या भारतभूची (कविता)- बजरंग सरोदे | ६४ |
| २१. | नवी दिशा | ६५ |
| २२. | युगपुरुष | ६८ |
| २३. | दक्षिण गंगोत्री | ७१ |
| २४. | पाच प्रश्न | ७५ |
| २५. | या मुलांना- या फुलांना (कविता) - पद्माकर वैद्य | ८४ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | खरा अर्थ | १ |
| २. | असा धरी छंद | ६ |
| ३. | आणि ते हुतात्मे झाले! | १० |
| ४. | ऋतुचक्र | १४ |
| ५. | चित्र (कविता) -- मंगेश पाडगांवकर | १७ |
| ६. | मी एक डास..... | १८ |
| ७. | मन करा रे प्रसन्न! | २२ |
| ८. | बँक | २६ |
| ९. | चित्रकार दलाल | २९ |
| १०. | हिरवी स्वप्ने आकारू (कविता) --कल्याण इनामदार | ३२ |
| ११. | शर्थीची झुंज | ३३ |
| १२. | बांबूकाम | ३७ |
| १३. | प्रजाहितदक्ष अहिल्याबाई | ४२ |
| १४. | थोर गणिती | ४६ |
| १५. | घडवू महान हिंदुस्तान (कविता)- पुष्पाग्रज | ४९ |
| १६. | विज्ञानाची कास | ५० |
| १७. | साप-आपला मित्र! | ५३ |
| १८. | निघाली सहल | ५६ |
| १९. | कायापालट | ५९ |
| २०. | मुले आम्ही या भारतभूची (कविता)- बजरंग सरोदे | ६४ |
| २१. | नवी दिशा | ६५ |
| २२. | युगपुरुष | ६८ |
| २३. | दक्षिण गंगोत्री | ७१ |
| २४. | पाच प्रश्न | ७५ |
| २५. | या मुलांना- या फुलांना (कविता) - पद्माकर वैद्य | ८४ |

# प्रतिज्ञागीत

शालेय पाठ्यपुस्तकातील गद्य प्रतिज्ञेला श्री. नावडीकर यांनी दिलेले गेयरूप
चाल– 'आओ बच्चो तुम्हे दिखाएँ झाँकी हिंदोस्तानकी'

भारत माझा देश सारे भारतीय बांधव माझे
माझ्या देशावरती आहे प्रेम निरंतर हे माझे।।
देशातील समृद्ध आणखी विविध तऱ्हेने नटलेल्या
परंपरांचा अभिमानच ज्या आजवरी चालत आल्या।।
पाइक होण्या  परंपरांचा अंगि पात्रता मम यावी
सदैव राहिन प्रयत्नवादी होइन त्यास सुसंवादी
पालक माझे गुरुजन माझे आणि वडिलधाऱ्यांनाही
सन्मानाने सौजन्याने वागवीन मी त्यांनाही।।
देशहि माझा बांधव माझे यांच्याशी मी निष्ठेने
राहिन माझी हीच प्रतिज्ञा करितो आज प्रतिष्ठेने।।
त्यांच्या कल्याणात आणखी त्यांच्या समृद्धीत अहा
सामावुनि सुख माझे गेले अनुभूति ही दिव्य महा।।


# प्रतिज्ञागीत

शालेय पाठ्यपुस्तकातील गद्य प्रतिज्ञेला श्री. नावडीकर यांनी दिलेले गेयरूप
चाल– 'आओ बच्चो तुम्हे दिखाएँ झाँकी हिंदोस्तानकी'

भारत माझा देश सारे भारतीय बांधव माझे
माझ्या देशावरती आहे प्रेम निरंतर हे माझे।।
देशातील समृद्ध आणखी विविध तऱ्हेने नटलेल्या
परंपरांचा अभिमानच ज्या आजवरी चालत आल्या।।
पाइक होण्या  परंपरांचा अंगि पात्रता मम यावी
सदैव राहिन प्रयत्नवादी होइन त्यास सुसंवादी
पालक माझे गुरुजन माझे आणि वडिलधाऱ्यांनाही
सन्मानाने सौजन्याने वागवीन मी त्यांनाही।।
देशहि माझा बांधव माझे यांच्याशी मी निष्ठेने
राहिन माझी हीच प्रतिज्ञा करितो आज प्रतिष्ठेने।।
त्यांच्या कल्याणात आणखी त्यांच्या समृद्धीत अहा
सामावुनि सुख माझे गेले अनुभूति ही दिव्य महा।।

# भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

भारतीय राज्यघटनेत खालील मूलभूत कर्तव्यांचा अंतर्भाव केला आहे.

१. भारतीय राज्यघटनेचे पालन करणे आणि तिच्या तत्त्वांचा, संस्थांचा तसेच राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा सन्मान राखणे.

२. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणारी उदात्त तत्त्वे हृदयात जतन करून त्यांचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

४. देशरक्षणासाठी व देशसेवेसाठी हाक येईल तेव्हा समर्पित होणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रांतिक इत्यादी भेदभाव न मानता सर्व भारतीयांत एकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करणे, तसेच महिलांचा सन्मान आणि प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या रीतिरिवाजांचा परित्याग करणे.

६. विविधतेने नटलेल्या आपल्या वैभवसंपन्न वारशाचा सन्मान राखून तो जतन करणे.

७. राने, तलाव, नद्या आणि वन्य प्राणी अंतर्भूत असलेल्या नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, तसेच सर्व जीवसृष्टीशी दयाभावाने वागणे.

८. वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद, जिज्ञासा आणि सुधारक वृत्ती यांची जोपासना करणे.

९. सामाजिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि प्रतिज्ञापूर्वक हिंसाचारापासून दूर राहणे.

१०. सर्व क्षेत्रातील वैयक्तिक आणि सांघिक कार्यात सर्वोत्तमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे.


# भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

भारतीय राज्यघटनेत खालील मूलभूत कर्तव्यांचा अंतर्भाव केला आहे.

१. भारतीय राज्यघटनेचे पालन करणे आणि तिच्या तत्त्वांचा, संस्थांचा तसेच राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा सन्मान राखणे.

२. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणारी उदात्त तत्त्वे हृदयात जतन करून त्यांचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

४. देशरक्षणासाठी व देशसेवेसाठी हाक येईल तेव्हा समर्पित होणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रांतिक इत्यादी भेदभाव न मानता सर्व भारतीयांत एकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करणे, तसेच महिलांचा सन्मान आणि प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या रीतिरिवाजांचा परित्याग करणे.

६. विविधतेने नटलेल्या आपल्या वैभवसंपन्न वारशाचा सन्मान राखून तो जतन करणे.

७. राने, तलाव, नद्या आणि वन्य प्राणी अंतर्भूत असलेल्या नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, तसेच सर्व जीवसृष्टीशी दयाभावाने वागणे.

८. वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद, जिज्ञासा आणि सुधारक वृत्ती यांची जोपासना करणे.

९. सामाजिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि प्रतिज्ञापूर्वक हिंसाचारापासून दूर राहणे.

१०. सर्व क्षेत्रातील वैयक्तिक आणि सांघिक कार्यात सर्वोत्तमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे.

# १. खरा अर्थ

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याच्या मालकीचे खूप मोठे शेत होते. तो दिवसभर शेतात काम करायचा. त्याची बायकोसुद्धा त्याला मदत करायची. त्यांच्या कष्टाचे त्यांना चांगले फळ मिळे. घर नेहमी धनधान्याने भरलेले असायचे; कशाचीही ददात नव्हती.

त्या शेतकऱ्याला तीन मुलगे होते. मुलांनी चांगले शिकावे म्हणून शेतकऱ्याने त्यांना शाळेत घातले. शाळेसाठी आवश्यक सर्व गोष्टी तो वेळोवेळी आणून देत असे. मुलगे शाळेला जात, पण अभ्यासाकडे त्यांचे लक्ष नसे. वडिलांबरोबर कधी शेतात गेले तरी काम करण्याऐवजी ते उनाडक्या करायचे. वडिलांनी अनेकवेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण पालथ्या घागरीवर पाणी! ते आळशी व अविचारी होते. आईवडिलांच्या कष्टावर ते आरामात जगत.

मुलगे मोठे झाले. त्यांची लग्ने झाली. ते वडिलांबरोबर शेतात थोडे काम करू लागले; परंतु वडिलांसारखे मेहनतीचे काम कोणीच करीत नव्हता. शेतकऱ्याचे वय झाले होते. 'आपली तिन्ही मुलं शिकली नाहीत. शेतात कष्ट करायचीही त्यांची तयारी नाही. त्यांचं पुढं कसं होणार?' ही चिंता त्याला सतत सतवायची.

एकदा त्याने आपल्या खास मित्राला बोलाविले व आपले दुःख त्याच्याजवळ व्यक्त केले. दोघांनी विचार करून त्यावर एक उपाय काढला. मित्राने एक पेटी शेतकऱ्याला आणून दिली. शेतकऱ्याने त्या पेटीला कुलूप लावून ती आपल्या खोलीत पलंगाखाली ठेवली. मुलांना वाटले वडिलांनी धनसंपत्ती एकत्र करून ठेवली असणार. सर्वांचे लक्ष पेटीकडे असे; पण वडील तिथे असल्याने पेटीला हात लावायला कुणीच धजत नव्हता.

एक दिवस शेतकरी खूप आजारी पडला. मोठ्या मुलाने ताबडतोब वैद्याला बोलावून औषधोपचार केले. वैद्य वेगवेगळी औषधे देत होते. तरीही शेतकऱ्याला गुण पडत नव्हता. अखेरीस शेतकऱ्याने प्राण सोडला. काही दिवसानंतर शेतकऱ्याच्या बायकोने मोठ्या मुलाला खोलीतील पेटी आणायला सांगितले. मोठ्या मुलाने पेटी आणली व उघडली. बाकीच्या भावांनी पेटीत डोकावले. पेटीत धन नाही, दागिने नाहीत हे पाहून ते निराश झाले. तोच मोठ्या मुलाने पेटीतून एक मोठा कागद बाहेर काढला. त्याबरोबर मधल्या मुलाने तो कागद हातात घेऊन पाहिला. त्यावर पुढील दोन ओळी मोठ्या अक्षरांत लिहिल्या होत्या.



# १. खरा अर्थ

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याच्या मालकीचे खूप मोठे शेत होते. तो दिवसभर शेतात काम करायचा. त्याची बायकोसुद्धा त्याला मदत करायची. त्यांच्या कष्टाचे त्यांना चांगले फळ मिळे. घर नेहमी धनधान्याने भरलेले असायचे; कशाचीही ददात नव्हती.

त्या शेतकऱ्याला तीन मुलगे होते. मुलांनी चांगले शिकावे म्हणून शेतकऱ्याने त्यांना शाळेत घातले. शाळेसाठी आवश्यक सर्व गोष्टी तो वेळोवेळी आणून देत असे. मुलगे शाळेला जात, पण अभ्यासाकडे त्यांचे लक्ष नसे. वडिलांबरोबर कधी शेतात गेले तरी काम करण्याऐवजी ते उनाडक्या करायचे. वडिलांनी अनेकवेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण पालथ्या घागरीवर पाणी! ते आळशी व अविचारी होते. आईवडिलांच्या कष्टावर ते आरामात जगत.

मुलगे मोठे झाले. त्यांची लग्ने झाली. ते वडिलांबरोबर शेतात थोडे काम करू लागले; परंतु वडिलांसारखे मेहनतीचे काम कोणीच करीत नव्हता. शेतकऱ्याचे वय झाले होते. 'आपली तिन्ही मुलं शिकली नाहीत. शेतात कष्ट करायचीही त्यांची तयारी नाही. त्यांचं पुढं कसं होणार?' ही चिंता त्याला सतत सतवायची.

एकदा त्याने आपल्या खास मित्राला बोलाविले व आपले दुःख त्याच्याजवळ व्यक्त केले. दोघांनी विचार करून त्यावर एक उपाय काढला. मित्राने एक पेटी शेतकऱ्याला आणून दिली. शेतकऱ्याने त्या पेटीला कुलूप लावून ती आपल्या खोलीत पलंगाखाली ठेवली. मुलांना वाटले वडिलांनी धनसंपत्ती एकत्र करून ठेवली असणार. सर्वांचे लक्ष पेटीकडे असे; पण वडील तिथे असल्याने पेटीला हात लावायला कुणीच धजत नव्हता.

एक दिवस शेतकरी खूप आजारी पडला. मोठ्या मुलाने ताबडतोब वैद्याला बोलावून औषधोपचार केले. वैद्य वेगवेगळी औषधे देत होते. तरीही शेतकऱ्याला गुण पडत नव्हता. अखेरीस शेतकऱ्याने प्राण सोडला. काही दिवसानंतर शेतकऱ्याच्या बायकोने मोठ्या मुलाला खोलीतील पेटी आणायला सांगितले. मोठ्या मुलाने पेटी आणली व उघडली. बाकीच्या भावांनी पेटीत डोकावले. पेटीत धन नाही, दागिने नाहीत हे पाहून ते निराश झाले. तोच मोठ्या मुलाने पेटीतून एक मोठा कागद बाहेर काढला. त्याबरोबर मधल्या मुलाने तो कागद हातात घेऊन पाहिला. त्यावर पुढील दोन ओळी मोठ्या अक्षरांत लिहिल्या होत्या.

१

**'सावलीतून जावे सावलीतून यावे!**
**मिष्टान्न खाऊन श्रीमंत व्हावे!'**

त्याने त्या ओळी सर्वांना वाचून दाखवल्या. त्याच्या हातातील कागद घेऊन मोठ्या भावाने पुन्हा एकदा त्या ओळी वाचल्या. वाचता वाचता त्याचा चेहरा उजळला. वडिलांनी पेटीत धन, दागिने न ठेवता श्रीमंत होण्याचा सोपा उपाय सुचविलेला पाहून तो खूष झाला. त्याचे भाऊही आनंदित झाले.

ते तिघेही वडिलांच्या उपदेशाचे तंतोतंत पालन करू लागले. जास्तसा वेळ ते घरातच घालवू लागले. शेतात अधुनमधून जायचे; पण ते सुद्धा ऊन उतरल्यावर! गावा-तही सावलीतून हिंडू लागले. घरात दररोज पक्वान्ने खाऊ लागले. अशा प्रकारे ते चैनीत दिवस घालवू लागले. त्यांचे हे वागणे पाहून आईला फार दुःख झाले. पिकांनी हिरवीगार दिसणारी जमीन ओसाड पडलेली पाहून ती अस्वस्थ झाली. तिने आपल्या मुलांना शेतात कामाला जाण्यासाठी खूप विनविले; पण मुळातच आळशी असल्याने ते वडिलांच्या उपदेशाचे निमित्त पुढे करायचे.

वडिलांचा मृत्यू होऊन वर्ष होत आले. वर्षभरात घरातील धनधान्य संपत आले. मोठ्या सुनेने नवऱ्याला व दिरांना या परिस्थितीची जाणीव करून दिली. वडिलांची आज्ञा पाळूनही आपल्याला पैसा मिळाला नाही या विचाराने ते दुःखी झाले. या विषयावर त्यांची बोलणी होत; पण उपाय सुचत नव्हता. एके दिवशी वडिलांचे मित्र त्यांच्या घरी आले. मुलांनी त्यांचे स्वागत केले. मुलांशी गप्पा मारत असताना घराला आलेली अवकळा पाहून त्यांनी मुलांना विचारले, ''काय रे, हल्ली शेतात काही पिकत नाही की काय?'' त्यांचा प्रश्न ऐकून धाकट्या भावांनी मोठ्या भावाकडे पाहिले. मोठ्या भावाने सर्व हकीकत सांगितली व तो कागद आणून दाखवला. त्यावेळी त्या मुलांकडे केविलवाणे पाहत ते म्हणाले, ''अरे वेड्यांनो, या ओळींचा शब्दशः अर्थ तुम्ही लक्षात घेतलात. याचा खरा अर्थ असा आहे, सावलीतून जावे म्हणजे सूर्योदयापूर्वी शेतात कामासाठी जावे. सावलीतून यावे म्हणजे सूर्यास्तानंतर घरी यावे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यन्त शेतात खूप कष्ट केल्यावर घरी शिजविलेले साधे अन्नसुद्धा गोड लागते. असे कष्ट केल्यावर धान्याच्या रूपाने लक्ष्मी घरी येईल व तो माणूस श्रीमंत होईल.' हा अर्थ लक्षात न घेता तुम्ही आरामात राहून वडिलोपार्जित धन मात्र संपवून टाकलेत.'' वडिलांच्या मित्राच्या या स्पष्टीकरणाने मुलांना त्यांची चूक उमगली. आपल्या वर्तनाचा त्यांना पश्चाताप झाला.

त्यानंतर ते दिवसभर शेतात राबू लागले. काही दिवसांनी त्यांच्या शेतात पिके डोलू लागली. धान्याच्या रूपाने घरात लक्ष्मी आली. वर्षभरात पुन्हा घर पूर्वस्थितीला आले.



**'सावलीतून जावे सावलीतून यावे!**
**मिष्टान्न खाऊन श्रीमंत व्हावे!'**

त्याने त्या ओळी सर्वांना वाचून दाखवल्या. त्याच्या हातातील कागद घेऊन मोठ्या भावाने पुन्हा एकदा त्या ओळी वाचल्या. वाचता वाचता त्याचा चेहरा उजळला. वडिलांनी पेटीत धन, दागिने न ठेवता श्रीमंत होण्याचा सोपा उपाय सुचविलेला पाहून तो खूष झाला. त्याचे भाऊही आनंदित झाले.

ते तिघेही वडिलांच्या उपदेशाचे तंतोतंत पालन करू लागले. जास्तसा वेळ ते घरातच घालवू लागले. शेतात अधुनमधून जायचे; पण ते सुद्धा ऊन उतरल्यावर! गावा-तही सावलीतून हिंडू लागले. घरात दररोज पक्वान्ने खाऊ लागले. अशा प्रकारे ते चैनीत दिवस घालवू लागले. त्यांचे हे वागणे पाहून आईला फार दुःख झाले. पिकांनी हिरवीगार दिसणारी जमीन ओसाड पडलेली पाहून ती अस्वस्थ झाली. तिने आपल्या मुलांना शेतात कामाला जाण्यासाठी खूप विनविले; पण मुळातच आळशी असल्याने ते वडिलांच्या उपदेशाचे निमित्त पुढे करायचे.

वडिलांचा मृत्यू होऊन वर्ष होत आले. वर्षभरात घरातील धनधान्य संपत आले. मोठ्या सुनेने नवऱ्याला व दिरांना या परिस्थितीची जाणीव करून दिली. वडिलांची आज्ञा पाळूनही आपल्याला पैसा मिळाला नाही या विचाराने ते दुःखी झाले. या विषयावर त्यांची बोलणी होत; पण उपाय सुचत नव्हता. एके दिवशी वडिलांचे मित्र त्यांच्या घरी आले. मुलांनी त्यांचे स्वागत केले. मुलांशी गप्पा मारत असताना घराला आलेली अवकळा पाहून त्यांनी मुलांना विचारले, ''काय रे, हल्ली शेतात काही पिकत नाही की काय?'' त्यांचा प्रश्न ऐकून धाकट्या भावांनी मोठ्या भावाकडे पाहिले. मोठ्या भावाने सर्व हकीकत सांगितली व तो कागद आणून दाखवला. त्यावेळी त्या मुलांकडे केविलवाणे पाहत ते म्हणाले, ''अरे वेड्यांनो, या ओळींचा शब्दशः अर्थ तुम्ही लक्षात घेतलात. याचा खरा अर्थ असा आहे, सावलीतून जावे म्हणजे सूर्योदयापूर्वी शेतात कामासाठी जावे. सावलीतून यावे म्हणजे सूर्यास्तानंतर घरी यावे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यन्त शेतात खूप कष्ट केल्यावर घरी शिजविलेले साधे अन्नसुद्धा गोड लागते. असे कष्ट केल्यावर धान्याच्या रूपाने लक्ष्मी घरी येईल व तो माणूस श्रीमंत होईल.' हा अर्थ लक्षात न घेता तुम्ही आरामात राहून वडिलोपार्जित धन मात्र संपवून टाकलेत.'' वडिलांच्या मित्राच्या या स्पष्टीकरणाने मुलांना त्यांची चूक उमगली. आपल्या वर्तनाचा त्यांना पश्चाताप झाला.

त्यानंतर ते दिवसभर शेतात राबू लागले. काही दिवसांनी त्यांच्या शेतात पिके डोलू लागली. धान्याच्या रूपाने घरात लक्ष्मी आली. वर्षभरात पुन्हा घर पूर्वस्थितीला आले.

२



वडिलांच्या मित्राने केलेल्या मार्गदर्शनामुळे आपण सुधारलो याची जाणीव त्या मुलांना झाली. त्यांनी वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त वडिलांच्या त्या मित्राला जेवायला बोलावले. त्यांचे नातेवाईकही त्या दिवशी जेवायला आले होते. सर्वजण ओसरीवर बसले. धाकट्या मुलाने घरातून एक लाकडी चौकट आणली. त्या चौकटीत वडिलांच्या उपदेशाचा तो कागद चिकटवला होता. मधल्या भावाने ती चौकट ओसरीच्या भिंतीवर मध्यभागी लावली.

सर्वांनी मिळून त्या ओळी पुन्हा वाचल्या–

सावलीतून जावे सावलीतून यावे।
मिष्टान्न खाऊन श्रीमंत व्हावे।।





वडिलांच्या मित्राने केलेल्या मार्गदर्शनामुळे आपण सुधारलो याची जाणीव त्या मुलांना झाली. त्यांनी वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त वडिलांच्या त्या मित्राला जेवायला बोलावले. त्यांचे नातेवाईकही त्या दिवशी जेवायला आले होते. सर्वजण ओसरीवर बसले. धाकट्या मुलाने घरातून एक लाकडी चौकट आणली. त्या चौकटीत वडिलांच्या उपदेशाचा तो कागद चिकटवला होता. मधल्या भावाने ती चौकट ओसरीच्या भिंतीवर मध्यभागी लावली.

सर्वांनी मिळून त्या ओळी पुन्हा वाचल्या–

सावलीतून जावे सावलीतून यावे।
मिष्टान्न खाऊन श्रीमंत व्हावे।।

### शब्दार्थ

**ददात–** उणीव, कमतरता, **दीर–** नवऱ्याचा भाऊ, **ओसाड–** पडीक, तंतोतंत– जसेच्या तसे, **अवकळा–** वाईट स्थिती, **मिष्टान्न –** गोड अन्न, **वडिलोपार्जित–** वाडवडिलांपासून मिळालेली, **चूक उमगणे–** चूक लक्षात येणे, **पश्चात्ताप होणे–** चुकीची जाणीव होणे.

### म्हण

**पालथ्या घागरीवर पाणी–** कितीही समजावून सांगितले तरी स्वभावात बदल न होणे

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शेतकऱ्याच्या मुलांचा स्वभाव कसा होता?
२) शेतकऱ्याच्या पलंगाखालची पेटी पाहून मुलांना काय वाटले?
३) पेटी उघडून पाहताच मुलगे निराश का झाले?
४) कागदावरील मजकूर वाचून मुलगे आनंदित का झाले?
५) शेतकऱ्याची बायको अस्वस्थ का झाली होती?
६) मुलांनी वडिलांच्या मित्राला जेवायला का बोलाविले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) शेतकऱ्याला कोणत्या गोष्टीची चिंता वाटे?
२) शेतकऱ्याने मुलांना सुधारण्यासाठी कोणती युक्ती केली?
३) वडिलांच्या आज्ञेचा मुलांना कोणता अर्थ लावला?
४) शेतकऱ्याच्या मित्राने मजकुराचा कोणता अर्थ सांगितला?
५) मुलांनी आपली चूक कशी सुधारली?



### शब्दार्थ

**ददात–** उणीव, कमतरता, **दीर–** नवऱ्याचा भाऊ, **ओसाड–** पडीक, तंतोतंत– जसेच्या तसे, **अवकळा–** वाईट स्थिती, **मिष्टान्न –** गोड अन्न, **वडिलोपार्जित–** वाडवडिलांपासून मिळालेली, **चूक उमगणे–** चूक लक्षात येणे, **पश्चात्ताप होणे–** चुकीची जाणीव होणे.

### म्हण

**पालथ्या घागरीवर पाणी–** कितीही समजावून सांगितले तरी स्वभावात बदल न होणे

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शेतकऱ्याच्या मुलांचा स्वभाव कसा होता?
२) शेतकऱ्याच्या पलंगाखालची पेटी पाहून मुलांना काय वाटले?
३) पेटी उघडून पाहताच मुलगे निराश का झाले?
४) कागदावरील मजकूर वाचून मुलगे आनंदित का झाले?
५) शेतकऱ्याची बायको अस्वस्थ का झाली होती?
६) मुलांनी वडिलांच्या मित्राला जेवायला का बोलाविले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) शेतकऱ्याला कोणत्या गोष्टीची चिंता वाटे?
२) शेतकऱ्याने मुलांना सुधारण्यासाठी कोणती युक्ती केली?
३) वडिलांच्या आज्ञेचा मुलांना कोणता अर्थ लावला?
४) शेतकऱ्याच्या मित्राने मजकुराचा कोणता अर्थ सांगितला?
५) मुलांनी आपली चूक कशी सुधारली?

**व्यवसाय**

खाली कंसात दिलेल्या शब्दसमूहातून नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद निवडून पुढे दिलेल्या रकान्यात लिहा.

(शेत, ती, नाही, आळशी, त्यांना, कुलूप, चित्र, गुरू, कागद, बोलावले, मला, तिने, दाखवला, आपण, येईल, तुम्ही, घेतलात, आई, लाकडी, वैद्य)

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| | | | |

**उपक्रम**

'पंचतंत्र' किंवा 'हितोपदेश' या पुस्तकातील गोष्टी वाचा.



**व्यवसाय**

खाली कंसात दिलेल्या शब्दसमूहातून नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद निवडून पुढे दिलेल्या रकान्यात लिहा.


(शेत, ती, नाही, आळशी, त्यांना, कुलूप, चित्र, गुरू, कागद, बोलावले, मला, तिने, दाखवला, आपण, येईल, तुम्ही, घेतलात, आई, लाकडी, वैद्य)

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| | | | |

**उपक्रम**

'पंचतंत्र' किंवा 'हितोपदेश' या पुस्तकातील गोष्टी वाचा.

# २. असा धरी छंद




सुदेश आईसोबत आपल्या मावशीकडे गेला होत. मावशीने त्यांचे स्वागत केले आणि आपल्या मुलाला हाक मारून सांगितले, ''अरे श्रीकांत! इकडे ये. कोण आलंय, बघ ना!''

श्रीकांत  पळतच आतून बाहेर आला. सुदेशला बघून तो म्हणाला, ''अरे व्वा! बऱ्याच दिवसांनी आलास. चल, आत माझ्या खोलीत बसू या.''


दोघेही आत गेले. ''कसल्या कामात गुंतला होतास रे तू?'' असे म्हणत सुदेशने टेबलावरची एक वही उचलली. त्या वहीच्या मुखपृष्ठावर सुंदर अक्षरांत लिहिले होते. 'अमृतकण.'

सुदेश त्या वहीचे एकेक पान हळुवारपणे उलटू लागला. प्रत्येक पानावर ठळक आणि वळणदार अक्षरात लिहिलेले सुविचार होते. विनोबा भावे, पं. जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, वि. स. खांडेकर, साने गुरुजी, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, शेक्सपिअर अशा अनेक थोरांचे विचार त्या वहीत होते.

सुदेश वही पाहण्यात गुंग झाला. प्रत्येक सुविचार सोप्या भाषेत होता. त्यामुळे समजायला सोपा होता.



# २. असा धरी छंद




सुदेश आईसोबत आपल्या मावशीकडे गेला होत. मावशीने त्यांचे स्वागत केले आणि आपल्या मुलाला हाक मारून सांगितले, ''अरे श्रीकांत! इकडे ये. कोण आलंय, बघ ना!''

श्रीकांत  पळतच आतून बाहेर आला. सुदेशला बघून तो म्हणाला, ''अरे व्वा! बऱ्याच दिवसांनी आलास. चल, आत माझ्या खोलीत बसू या.''

दोघेही आत गेले. ''कसल्या कामात गुंतला होतास रे तू?'' असे म्हणत सुदेशने टेबलावरची एक वही उचलली. त्या वहीच्या मुखपृष्ठावर सुंदर अक्षरांत लिहिले होते. 'अमृतकण.'

सुदेश त्या वहीचे एकेक पान हळुवारपणे उलटू लागला. प्रत्येक पानावर ठळक आणि वळणदार अक्षरात लिहिलेले सुविचार होते. विनोबा भावे, पं. जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, वि. स. खांडेकर, साने गुरुजी, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, शेक्सपिअर अशा अनेक थोरांचे विचार त्या वहीत होते.

सुदेश वही पाहण्यात गुंग झाला. प्रत्येक सुविचार सोप्या भाषेत होता. त्यामुळे समजायला सोपा होता.

''हे काम शिक्षकांनी करायला सांगितलंय का?'' सुदेशने विचारले.

''सुदेश, हे सारे सुविचार मीच जमवलेत! आमच्या शाळेत प्रार्थनेच्या वेळी रोज एकेक विद्यार्थी सुविचार सांगतो आणि त्याचा अर्थही स्पष्ट करतो.'' श्रीकांत उत्तरला.

''पण रोज असे नवेनवे सुविचार कुठून आणता तुम्ही?'' सुदेशने प्रश्न केला.

''काही वर्तमानपत्रातून दरदिवशी सुविचार छापले जातात. दूरदर्शनवरही सुविचार दाखविले जातात.'' श्रीकांतने त्याची शंका दूर केली.

''खरंच की! अशाप्रकारे कितीतरी सुविचार मिळू शकतात. आता आलं माझ्या लक्षात!'' सुदेश म्हणाला.

''मी वेगवेगळ्या लेखकांची पुस्तकं वाचतो. पुस्तकं वाचून आनंद तर मिळतोच. शिवाय बरेच चांगले चांगले विचार सहज मिळत जातात. चांगले विचार असलेली वाक्यं मी वहीत लिहून ठेवतो.'' श्रीकांतने सांगितले.

श्रीकांतचे बोलणे ऐकता ऐकता सुदेशने असाच एखादा संग्रह करायचे ठरविले.

श्रीकांत पुढे सांगू लागला. ''माझ्या एका मित्रानं विविध प्रकारच्या कितीतरी रिकाम्या आगपेट्या जमविल्या आहेत.'' हे सारे ऐकून सुदेशच्या मनातील विचार पक्का झाला.

मावशीकडून परतल्यापासून सुदेश नेहमी घाईत दिसू लागला. वेगवेगळ्या पक्ष्यांची पिसे तो गोळा करू लागला. निरनिराळ्या पक्ष्यांची चित्रेही त्याने मिळविली. एका वहीत प्रत्येक पानावर एका पक्ष्याचे पीस आणि चित्र चिकटविले व त्या पक्ष्याची थोडक्यात पण महत्त्वाची अशी माहितीही लिहिली. अशा रितीने सुदेशचा 'पक्षिज्ञानसंग्रह' तयार झाला. या त्याच्या उपक्रमामुळे सुदेशला निरनिराळ्या पक्ष्यांची नीट ओळख झाली. परिसरातील कोणत्याही पक्ष्याची माहिती तो आपल्या दोस्तांना सांगत असे. म्हणून त्याचे दोस्त त्याला 'पक्षिमित्र' म्हणत. सुदेशचा पक्षिसंग्रह पाहू त्याच्या मित्रांनाही हुरूप झाला. ते स्वतः वेगवेगळ्या वस्तूंचे संग्रह करू लागले. सुरुवातीला ते कुतूहलाने वस्तू जमवीत. पुढे त्यांना अशा वस्तूंचा संग्रह करण्यात मोठा आनंद वाटू लागला. पुढे त्यांना वस्तुसंग्रह करण्याचा छंदच जडला.

सुदेश आणि त्याच्या मित्रांनी नाना प्रकारच्या वस्तू जमविल्या. त्यांनी जमविलेल्या काही वस्तू दुर्मिळ तर होत्याच, शिवाय आकर्षकही! एखाद्या वस्तूंचे वेगवेगळे नमुने एकत्र बघण्यात सगळ्यांना मौज वाटे. घरी येणाऱ्या मित्रांना, तसेच पाहुणे मंडळींना ते आपापले संग्रह दाखवीत. त्यांच्या ह्या संग्रहाबद्दल त्यांना शाबासकी मिळे.



''हे काम शिक्षकांनी करायला सांगितलंय का?'' सुदेशने विचारले.

''सुदेश, हे सारे सुविचार मीच जमवलेत! आमच्या शाळेत प्रार्थनेच्या वेळी रोज एकेक विद्यार्थी सुविचार सांगतो आणि त्याचा अर्थही स्पष्ट करतो.'' श्रीकांत उत्तरला.

''पण रोज असे नवेनवे सुविचार कुठून आणता तुम्ही?'' सुदेशने प्रश्न केला.

''काही वर्तमानपत्रातून दरदिवशी सुविचार छापले जातात. दूरदर्शनवरही सुविचार दाखविले जातात.'' श्रीकांतने त्याची शंका दूर केली.

''खरंच की! अशाप्रकारे कितीतरी सुविचार मिळू शकतात. आता आलं माझ्या लक्षात!'' सुदेश म्हणाला.

''मी वेगवेगळ्या लेखकांची पुस्तकं वाचतो. पुस्तकं वाचून आनंद तर मिळतोच. शिवाय बरेच चांगले चांगले विचार सहज मिळत जातात. चांगले विचार असलेली वाक्यं मी वहीत लिहून ठेवतो.'' श्रीकांतने सांगितले.

श्रीकांतचे बोलणे ऐकता ऐकता सुदेशने असाच एखादा संग्रह करायचे ठरविले.

श्रीकांत पुढे सांगू लागला. ''माझ्या एका मित्रानं विविध प्रकारच्या कितीतरी रिकाम्या आगपेट्या जमविल्या आहेत.'' हे सारे ऐकून सुदेशच्या मनातील विचार पक्का झाला.


मावशीकडून परतल्यापासून सुदेश नेहमी घाईत दिसू लागला. वेगवेगळ्या पक्ष्यांची पिसे तो गोळा करू लागला. निरनिराळ्या पक्ष्यांची चित्रेही त्याने मिळविली. एका वहीत प्रत्येक पानावर एका पक्ष्याचे पीस आणि चित्र चिकटविले व त्या पक्ष्याची थोडक्यात पण महत्त्वाची अशी माहितीही लिहिली. अशा रितीने सुदेशचा 'पक्षिज्ञानसंग्रह' तयार झाला. या त्याच्या उपक्रमामुळे सुदेशला निरनिराळ्या पक्ष्यांची नीट ओळख झाली. परिसरातील कोणत्याही पक्ष्याची माहिती तो आपल्या दोस्तांना सांगत असे. म्हणून त्याचे दोस्त त्याला 'पक्षिमित्र' म्हणत. सुदेशचा पक्षिसंग्रह पाहू त्याच्या मित्रांनाही हुरूप झाला. ते स्वतः वेगवेगळ्या वस्तूंचे संग्रह करू लागले. सुरुवातीला ते कुतूहलाने वस्तू जमवीत. पुढे त्यांना अशा वस्तूंचा संग्रह करण्यात मोठा आनंद वाटू लागला. पुढे त्यांना वस्तुसंग्रह करण्याचा छंदच जडला.

सुदेश आणि त्याच्या मित्रांनी नाना प्रकारच्या वस्तू जमविल्या. त्यांनी जमविलेल्या काही वस्तू दुर्मिळ तर होत्याच, शिवाय आकर्षकही! एखाद्या वस्तूंचे वेगवेगळे नमुने एकत्र बघण्यात सगळ्यांना मौज वाटे. घरी येणाऱ्या मित्रांना, तसेच पाहुणे मंडळींना ते आपापले संग्रह दाखवीत. त्यांच्या ह्या संग्रहाबद्दल त्यांना शाबासकी मिळे.

७

सुदेश आणि त्याच्या दोस्तांच्या मनात आपल्या वस्तुसंग्रहाचे प्रदर्शन भरविण्याचा विचार आला. त्यांनी सरपंचांची भेट घेतली. वस्तु संग्रहांविषयी माहिती दिली आणि प्रदर्शन भरविण्याची इच्छा व्यक्त केली. सरपंचांना प्रदर्शनाची कल्पना खूप आवडली. त्यानंतर सुदेश व इतरांनी आपल्या शाळेतील शिक्षकांना प्रदर्शनाविषयी सांगितले. त्यांनाही आनंद झाला. त्यांच्या मदतीने सुदेश आणि त्याच्या मित्रांनी प्रदर्शनाची योजना तयार केली.

पंचायतीच्या सभागृहात सदेश आणि त्याच्या इतर मित्रांनी आपापले संग्रह व्यवस्थित मांडले. प्रत्येक संग्रह आकर्षक दिसण्यासाठी सजावट केली. एका टेबलावर पक्षिसंग्रह ठेवला. सोबत काही पक्ष्यांची मोठ्या आकारातील चित्रेही ठेवली. दुसऱ्या टेबलावर पेनांचे वेगवेगळे प्रकार मांडले. आणखी एका टेबलावर दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक अशा विविध नियतकालिकांचे अंक मांडले होते. सध्या प्रकाशित न होणारी अशी काही जुनी नियतकालिकेही त्यांत होती. एका टेबलावर काही तक्ते मांडले होते. त्यावर वेगवेगळ्या म्हणी ठळक अक्षरांत लिहिल्या होत्या. त्याशिवाय आणखीही काही तक्ते होते. त्या तक्त्यांवर काही शब्द दिले होते आणि त्या शब्दांसाठी भारतातील वेगवेगळ्या भाषांत कोणते शब्द वापरले जातात ते लिहिले होते. वेगवेगळ्या प्राण्यांची सुबक अशी रंगीत चित्रे एका टेबलावर मांडली होती. कापूस वा चिंध्या भरून केलेल्या काही प्राण्यांच्या प्रतिकृतीही ठेवल्या होत्या. जवळच भिंतीवर प्राण्यांची काही चित्रे टांगली होती. एका टेबलावर विविध प्रकारच्या दगडांचे नमुने नीट मांडून ठेवले होते.






सुदेश आणि त्याच्या दोस्तांच्या मनात आपल्या वस्तुसंग्रहाचे प्रदर्शन भरविण्याचा विचार आला. त्यांनी सरपंचांची भेट घेतली. वस्तु संग्रहांविषयी माहिती दिली आणि प्रदर्शन भरविण्याची इच्छा व्यक्त केली. सरपंचांना प्रदर्शनाची कल्पना खूप आवडली. त्यानंतर सुदेश व इतरांनी आपल्या शाळेतील शिक्षकांना प्रदर्शनाविषयी सांगितले. त्यांनाही आनंद झाला. त्यांच्या मदतीने सुदेश आणि त्याच्या मित्रांनी प्रदर्शनाची योजना तयार केली.

पंचायतीच्या सभागृहात सदेश आणि त्याच्या इतर मित्रांनी आपापले संग्रह व्यवस्थित मांडले. प्रत्येक संग्रह आकर्षक दिसण्यासाठी सजावट केली. एका टेबलावर पक्षिसंग्रह ठेवला. सोबत काही पक्ष्यांची मोठ्या आकारातील चित्रेही ठेवली. दुसऱ्या टेबलावर पेनांचे वेगवेगळे प्रकार मांडले. आणखी एका टेबलावर दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक अशा विविध नियतकालिकांचे अंक मांडले होते. सध्या प्रकाशित न होणारी अशी काही जुनी नियतकालिकेही त्यांत होती. एका टेबलावर काही तक्ते मांडले होते. त्यावर वेगवेगळ्या म्हणी ठळक अक्षरांत लिहिल्या होत्या. त्याशिवाय आणखीही काही तक्ते होते. त्या तक्त्यांवर काही शब्द दिले होते आणि त्या शब्दांसाठी भारतातील वेगवेगळ्या भाषांत कोणते शब्द वापरले जातात ते लिहिले होते. वेगवेगळ्या प्राण्यांची सुबक अशी रंगीत चित्रे एका टेबलावर मांडली होती. कापूस वा चिंध्या भरून केलेल्या काही प्राण्यांच्या प्रतिकृतीही ठेवल्या होत्या. जवळच भिंतीवर प्राण्यांची काही चित्रे टांगली होती. एका टेबलावर विविध प्रकारच्या दगडांचे नमुने नीट मांडून ठेवले होते.



सभागृह छान सजवले गेले. गावच्या सरपंचांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रदर्शनातील सर्व वस्तू त्यांनी बारकाईने बघितल्या व मुलांच्या या कामगिरीबद्दल प्रशंसा केली. मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ग्रामपंचायतीतर्फे त्यांनी बक्षिसेही जाहीर केली.

गावातील तसेच शेजारच्या गावांतील शाळकरी मुलांनी ते प्रदर्शन पाहिले. सुदेशच्या आमंत्रणावरून श्रीकांतही आला होता. प्रदर्शन पाहून त्याला मोठी मौज वाटली. गावातील लोकांनी प्रदर्शन पाहून त्यांचे कौतुक केले.

---

### शब्दार्थ

**नियतकालिक–** ठराविक काळाने प्रसिद्ध होणारे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) श्रीकांतची सुविचारवही पाहून सुदेशने काय ठरविले?
२) प्रदर्शन कुठे भरविले होते?
३) प्रदर्शन पहायला कोण कोण आले होते?

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) श्रीकांतची सुविचारवही सुदेशला का आवडली?
२) वाचनामुळे कोणकोणते फायदे होतात?
३) सुदेशने पक्षिज्ञानसंग्रह तयार करण्यासाठी काय काय केले?
४) मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सपरंचानीन काय काय केले?

### व्यवसाय

खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची अनेकवचनी रूपें करून ती वाक्ये पुन्हा लिहा.

१) अहमदने चित्र ठेवले.
२) मी वही उचलली.
३) मुलाने दररोज सुविचार वाचावा.
४) शिक्षक विद्यार्थ्याला खेळ शिकवतात.
५) तू कुठे गेला होतास?

### उपक्रम

विविध सुविचारांचा संग्रह करा.

●●●



सभागृह छान सजवले गेले. गावच्या सरपंचांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रदर्शनातील सर्व वस्तू त्यांनी बारकाईने बघितल्या व मुलांच्या या कामगिरीबद्दल प्रशंसा केली. मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ग्रामपंचायतीतर्फे त्यांनी बक्षिसेही जाहीर केली.

गावातील तसेच शेजारच्या गावांतील शाळकरी मुलांनी ते प्रदर्शन पाहिले. सुदेशच्या आमंत्रणावरून श्रीकांतही आला होता. प्रदर्शन पाहून त्याला मोठी मौज वाटली. गावातील लोकांनी प्रदर्शन पाहून त्यांचे कौतुक केले.

---

### शब्दार्थ

**नियतकालिक–** ठराविक काळाने प्रसिद्ध होणारे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) श्रीकांतची सुविचारवही पाहून सुदेशने काय ठरविले?
२) प्रदर्शन कुठे भरविले होते?
३) प्रदर्शन पहायला कोण कोण आले होते?

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) श्रीकांतची सुविचारवही सुदेशला का आवडली?
२) वाचनामुळे कोणकोणते फायदे होतात?
३) सुदेशने पक्षिज्ञानसंग्रह तयार करण्यासाठी काय काय केले?
४) मुलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सपरंचानीन काय काय केले?

### व्यवसाय

खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची अनेकवचनी रूपें करून ती वाक्ये पुन्हा लिहा.

१) अहमदने चित्र ठेवले.
२) मी वही उचलली.
३) मुलाने दररोज सुविचार वाचावा.
४) शिक्षक विद्यार्थ्याला खेळ शिकवतात.
५) तू कुठे गेला होतास?

### उपक्रम

विविध सुविचारांचा संग्रह करा.

●●●

# ३. आणि ते हुतात्मे झाले!

कर्ऽऽ कर्ऽऽऽ आवाज झाला. कोठडीचे दार उघडले. मार खाऊन अर्धमेले झालेले दोन्ही कैदी सावरून बसले. त्यांच्या नजरा दाराकडे वळल्या. पुढे येणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी ते मनाची तयारी करू लागले.

गेले सहा दिवस ते दोन्ही कैदी या कोठडीत होते. पोलीस अधिकाऱ्यांकडून मार खात होते. त्यांना बोलके करण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यांच्या साथीदारांची नावे व इतर माहिती वदवून घेण्यासाठी त्यांना मारझोड करणे, तहानेने व्याकूळ झाले तरी प्यायला पाणी न देणे, डोळ्यांवर प्रखर प्रकाश टाकून झोपू न देणे, लोंबकळत ठेवणे, जळत्या सिगारेटचे चटके देणे अशा प्रकारची अमानुष वागणूक त्यांना दिली जात होती.

सन १९५५ मध्ये गोव्यात स्वातंत्र्य चळवळीला ऊत आला होता. गोवा पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त करण्यासाठी गोव्यातील तसेच गोव्याबाहेरील अनेक लोक सत्याग्रह करीत होते. पोलीस निरनिराळ्या मार्गाने स्वातंत्र्य सैनिकांचा शोध घेत होते. कुणाकडून तरी या दोन स्वातंत्र्यसैनिकांची नावे एका पोलीस अधिकाऱ्याला समजली. त्याने त्या दोघांना पकडून पणजीतील पोलीसठाण्यात आणले. तो अधिकारी खूश होता. या सैनिकांकडून आपल्याला चळवळीत भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांची माहिती मिळेल असे त्याला वाटत होते. त्या शूर वीरांनी गेल्या सहा दिवसांत तोंड उघडले नव्हते. देशाशी एकनिष्ठ असलेले ते वीर सगळे अत्याचार मुकाटपणे सोसत होते.

'उठा आता' असे तिरस्काराने म्हणतच एक पोलीस अधिकारी कोठडीत आला. त्याने दोन्ही स्वातंत्र्यसैनिकांच्या हातात बेड्या ठोकल्या व त्यांना एका जीपमध्ये ढकलले. जीपमध्ये तो अधिकारी व शिपाईही बसले. जीप भर वेगाने निघाली.

थोड्याच वेळात जीप त्यांच्या गावात थांबली. पोलिसांनी त्यांना उतरविले. एकाला जवळच्याच झाडाला करकचून बांधले. ही बातमी वाऱ्यासारखी गावात पसरली. काही लोक भीतभीतच घराबाहेर पडले. प्रत्येकजण दुरुनच समोरचे दृश्य पाहत होता; पण पुढे येण्याचे धाडस कुणालाही होत नव्हते.

झाडाला बांधलेल्या स्वातंत्र्यसैनिकाकडे नजर टाकीत पोलीस अधिकारी म्हणाला, ''हा तुझा गाव. तुझी बायको, मुलं, आईवडील, मित्र या गावात आहेत. त्यांच्यासोबत तुला पूर्वीप्रमाणं आनंदात राहायचं असेल तर माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.'' पण सैनिकाने तोंडातून एक शब्दही काढला नाही. थोडा वेळ थांबून अधिकारी पुढे म्हणाला,



# ३. आणि ते हुतात्मे झाले!

कर्ऽऽ कर्ऽऽऽ आवाज झाला. कोठडीचे दार उघडले. मार खाऊन अर्धमेले झालेले दोन्ही कैदी सावरून बसले. त्यांच्या नजरा दाराकडे वळल्या. पुढे येणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी ते मनाची तयारी करू लागले.

गेले सहा दिवस ते दोन्ही कैदी या कोठडीत होते. पोलीस अधिकाऱ्यांकडून मार खात होते. त्यांना बोलके करण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यांच्या साथीदारांची नावे व इतर माहिती वदवून घेण्यासाठी त्यांना मारझोड करणे, तहानेने व्याकूळ झाले तरी प्यायला पाणी न देणे, डोळ्यांवर प्रखर प्रकाश टाकून झोपू न देणे, लोंबकळत ठेवणे, जळत्या सिगारेटचे चटके देणे अशा प्रकारची अमानुष वागणूक त्यांना दिली जात होती.

सन १९५५ मध्ये गोव्यात स्वातंत्र्य चळवळीला ऊत आला होता. गोवा पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त करण्यासाठी गोव्यातील तसेच गोव्याबाहेरील अनेक लोक सत्याग्रह करीत होते. पोलीस निरनिराळ्या मार्गाने स्वातंत्र्य सैनिकांचा शोध घेत होते. कुणाकडून तरी या दोन स्वातंत्र्यसैनिकांची नावे एका पोलीस अधिकाऱ्याला समजली. त्याने त्या दोघांना पकडून पणजीतील पोलीसठाण्यात आणले. तो अधिकारी खूश होता. या सैनिकांकडून आपल्याला चळवळीत भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांची माहिती मिळेल असे त्याला वाटत होते. त्या शूर वीरांनी गेल्या सहा दिवसांत तोंड उघडले नव्हते. देशाशी एकनिष्ठ असलेले ते वीर सगळे अत्याचार मुकाटपणे सोसत होते.

'उठा आता' असे तिरस्काराने म्हणतच एक पोलीस अधिकारी कोठडीत आला. त्याने दोन्ही स्वातंत्र्यसैनिकांच्या हातात बेड्या ठोकल्या व त्यांना एका जीपमध्ये ढकलले. जीपमध्ये तो अधिकारी व शिपाईही बसले. जीप भर वेगाने निघाली.

थोड्याच वेळात जीप त्यांच्या गावात थांबली. पोलिसांनी त्यांना उतरविले. एकाला जवळच्याच झाडाला करकचून बांधले. ही बातमी वाऱ्यासारखी गावात पसरली. काही लोक भीतभीतच घराबाहेर पडले. प्रत्येकजण दुरुनच समोरचे दृश्य पाहत होता; पण पुढे येण्याचे धाडस कुणालाही होत नव्हते.

झाडाला बांधलेल्या स्वातंत्र्यसैनिकाकडे नजर टाकीत पोलीस अधिकारी म्हणाला, ''हा तुझा गाव. तुझी बायको, मुलं, आईवडील, मित्र या गावात आहेत. त्यांच्यासोबत तुला पूर्वीप्रमाणं आनंदात राहायचं असेल तर माझ्या प्रश्नाचं उत्तर दे.'' पण सैनिकाने तोंडातून एक शब्दही काढला नाही. थोडा वेळ थांबून अधिकारी पुढे म्हणाला,

१०

''जर सहकाऱ्यांची नावं सांगितलीस तर आत्ताच मी तुला सोडून देईन. नाहीतर इथंच ठार करीन!''

त्याचे बोलणे संपते न संपते तोच दुरून रडण्याचा आवाज ऐकू आला. सैनिकाने आवाजाच्या दिशेने पाहिले. दूरवर त्याची बायको उभी होती. तीच रडत होती. भेदरलेल्या नजरेने पाहत तिला बिलगून मुलगा उभा होता. बाजूला आई-वडील हताश होऊन पाहत उभे होते. त्या सगळ्यांना पाहताच त्याच्या मनात कालवाकालव झाली. त्याचक्षणी सारे काही सांगून टाकावे म्हणून ओठ थरथरले; पण दुसऱ्याच क्षणी गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी घेतलेल्या शपथेची त्याला आठवण झाली. त्याने स्वतःलाच बजावले, 'काही सांगायचे नाही.' त्याने नकारार्थी मान हालविली.

आमिष दाखवूनही उपयोग होत नाही हे पाहून तो पोलीस अधिकारी अधिकच संतापला व पिस्तुल रोखून म्हणाला, ''मी तुला शेवटची संधी देतो. जिवंत रहायचं असेल तर लवकर सांग.''



''मला माहीत नाही.'' सैनिकाने ठामपणे सांगितले. ठोऽऽऽ पोलीस अधिकाऱ्याने पिस्तुलाची कळ दाबली. लोक भयभीत झाले. गोळी सैनिकाच्या मस्तकात शिरली. रक्ताची धार खाली ओघळली. सैनिकाने मान टाकली.



''जर सहकाऱ्यांची नावं सांगितलीस तर आत्ताच मी तुला सोडून देईन. नाहीतर इथंच ठार करीन!''

त्याचे बोलणे संपते न संपते तोच दुरून रडण्याचा आवाज ऐकू आला. सैनिकाने आवाजाच्या दिशेने पाहिले. दूरवर त्याची बायको उभी होती. तीच रडत होती. भेदरलेल्या नजरेने पाहत तिला बिलगून मुलगा उभा होता. बाजूला आई-वडील हताश होऊन पाहत उभे होते. त्या सगळ्यांना पाहताच त्याच्या मनात कालवाकालव झाली. त्याचक्षणी सारे काही सांगून टाकावे म्हणून ओठ थरथरले; पण दुसऱ्याच क्षणी गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी घेतलेल्या शपथेची त्याला आठवण झाली. त्याने स्वतःलाच बजावले, 'काही सांगायचे नाही.' त्याने नकारार्थी मान हालविली.

आमिष दाखवूनही उपयोग होत नाही हे पाहून तो पोलीस अधिकारी अधिकच संतापला व पिस्तुल रोखून म्हणाला, ''मी तुला शेवटची संधी देतो. जिवंत रहायचं असेल तर लवकर सांग.''



''मला माहीत नाही.'' सैनिकाने ठामपणे सांगितले. ठोऽऽऽ पोलीस अधिकाऱ्याने पिस्तुलाची कळ दाबली. लोक भयभीत झाले. गोळी सैनिकाच्या मस्तकात शिरली. रक्ताची धार खाली ओघळली. सैनिकाने मान टाकली.

''तुझ्या साथीदारांची नावं सांग; नाहीतर मरायला तयार हो.'' दुसऱ्या सैनिकावर पिस्तुल रोखीत अधिकारी म्हणाला.

दुसऱ्या सैनिकाच्या मनात चलबिचल सुरू झाली. त्याला आपल्या वृद्ध मातापित्यांची आठवण झाली. त्यांच्यासाठी तरी जगलेच पाहिजे असे त्याला वाटू लागले. इतक्यात त्याची नजर साथीदाराच्या प्रेतावर पडली व क्षणातच तो सावरला.

अधिकाऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवून तो उद्‌गारला, ''झाड गोळी.''

सैनिकाचे शब्द ऐकताच अधिकारी रागाने लालबुंद झाला. त्याने शिपायांना हुकूम दिला. शिपायांनी त्याला नदीकाठी नेले. त्याच्या हातातील बेड्या काढल्या व त्याला नदीत ढकलून दिले. सैनिक पोहण्याचा प्रयत्न करू लागला. अधिकाऱ्याने नेम धरून गोळ्या झाडल्या व त्यालाही ठार केले. नदीचे पाणी लाल झाले. गोवा स्वातंत्र्यलढ्यात आणखी दोन हुतात्म्यांची भर पडली.

---

**शब्दार्थ**

**कोठडी–** बंद खोली, **अमानुष–** माणुसकीला न शोभणारे , **आमिष–** प्रलोभन, **करकचून–** घट्ट आवळून, **भेदरणे –** घाबरून जाणे.

**वाक्प्रचार**

**ऊत येणे–** जोर येणे

**डोळ्याला डोळा भिडविणे –** न घाबरता पाहणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) कोठडीतील कैद्यांना मार का दिला जात होता?

२) गोव्यात स्वातंत्र्यचळवळीला ऊत केव्हा आला होता?

३) लोक गोव्यात सत्याग्रह का करीत होते?

४) स्वातंत्र्यसैनिकांना जीपमध्ये बसवून कोठे नेण्यात आले?

५) पोर्तुगीज अधिकाऱ्याने सैनिकाला कोणते आमिष दाखविले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कोठडीत ठेवलेल्या कैद्यांना कोणकोणत्या प्रकारची शिक्षा दिली जात होती?

२) या पाठातील स्वातंत्र्यसैनिकांचे देशप्रेम कसे दिसून येते?



''तुझ्या साथीदारांची नावं सांग; नाहीतर मरायला तयार हो.'' दुसऱ्या सैनिकावर पिस्तुल रोखीत अधिकारी म्हणाला.

दुसऱ्या सैनिकाच्या मनात चलबिचल सुरू झाली. त्याला आपल्या वृद्ध मातापित्यांची आठवण झाली. त्यांच्यासाठी तरी जगलेच पाहिजे असे त्याला वाटू लागले. इतक्यात त्याची नजर साथीदाराच्या प्रेतावर पडली व क्षणातच तो सावरला.

अधिकाऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवून तो उद्‌गारला, ''झाड गोळी.''

सैनिकाचे शब्द ऐकताच अधिकारी रागाने लालबुंद झाला. त्याने शिपायांना हुकूम दिला. शिपायांनी त्याला नदीकाठी नेले. त्याच्या हातातील बेड्या काढल्या व त्याला नदीत ढकलून दिले. सैनिक पोहण्याचा प्रयत्न करू लागला. अधिकाऱ्याने नेम धरून गोळ्या झाडल्या व त्यालाही ठार केले. नदीचे पाणी लाल झाले. गोवा स्वातंत्र्यलढ्यात आणखी दोन हुतात्म्यांची भर पडली.

---

**शब्दार्थ**

**कोठडी–** बंद खोली, **अमानुष–** माणुसकीला न शोभणारे , **आमिष–** प्रलोभन, **करकचून–** घट्ट आवळून, **भेदरणे –** घाबरून जाणे.

**वाक्प्रचार**

**ऊत येणे–** जोर येणे

**डोळ्याला डोळा भिडविणे –** न घाबरता पाहणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) कोठडीतील कैद्यांना मार का दिला जात होता?

२) गोव्यात स्वातंत्र्यचळवळीला ऊत केव्हा आला होता?

३) लोक गोव्यात सत्याग्रह का करीत होते?

४) स्वातंत्र्यसैनिकांना जीपमध्ये बसवून कोठे नेण्यात आले?

५) पोर्तुगीज अधिकाऱ्याने सैनिकाला कोणते आमिष दाखविले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) कोठडीत ठेवलेल्या कैद्यांना कोणकोणत्या प्रकारची शिक्षा दिली जात होती?

२) या पाठातील स्वातंत्र्यसैनिकांचे देशप्रेम कसे दिसून येते?

१२

**व्यवसाय**

**१. खाली दिलेली विशेषणे वापरून वाक्ये तयार करा.**

स्वच्छ, सुंदर, थंड, शूर, हुशार, शहाणा, म्हातारा.

**उपक्रम**

एखाद्या स्वातंत्र्यसैनिकाचे चित्र मिळवून ते वहीत चिकटवा व त्या चित्राखाली त्याच्या कार्याची थोडक्यात माहिती लिहा.



**व्यवसाय**

**१. खाली दिलेली विशेषणे वापरून वाक्ये तयार करा.**


स्वच्छ, सुंदर, थंड, शूर, हुशार, शहाणा, म्हातारा.

**उपक्रम**

एखाद्या स्वातंत्र्यसैनिकाचे चित्र मिळवून ते वहीत चिकटवा व त्या चित्राखाली त्याच्या कार्याची थोडक्यात माहिती लिहा.

१३

# ४. ऋतुचक्र




**श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे।**

मुग्धांचे कवितागायन चालू होते. बाहेर ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू होता. आषाढातील पावसाच्या सरींनी धरती हिरवीगार झाली होती. जणू ती हिरवा शालू नेसून वर्षाऋतूच्या स्वगतास सज्ज झाली होती. श्रावण महिना सुरू झाला. याच महिन्यात



# ४. ऋतुचक्र



**श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे।**

मुग्धांचे कवितागायन चालू होते. बाहेर ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ सुरू होता. आषाढातील पावसाच्या सरींनी धरती हिरवीगार झाली होती. जणू ती हिरवा शालू नेसून वर्षाऋतूच्या स्वगतास सज्ज झाली होती. श्रावण महिना सुरू झाला. याच महिन्यात

१४

नागपंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी सण येतात. 'निसर्गाशी मैत्री करा, बंधुभावाने वागा. दुष्टांचा नाश करा' असेच ते आम्हाला सांगत असतात.

अशा उत्साही वातावरणातच भाद्रपद महिना केव्हा येतो ते कळतही नाही. श्रीगणेशाचे आगमन होते. घरोघरी गणपतीची मनोभावे पूजा केली जाते. भाद्रपद संपतो आणि शरदऋतूला सुरुवात होते. सारे वातावरण कसे प्रसन्न बनते. झाडे पाना-फुलांनी बहरून जातात. शेते डोलू लागतात.

'दसरा सण मोठा। नाही आनंदा तोटा'

असे म्हणतच आश्विनमास येतो. या महिन्यात गोव्यात तसेच महाराष्ट्रात नवरात्र, कर्नाटकात 'विजयादशमी', बंगालात 'दुर्गापूजा' तर केरळमध्ये 'ओणम' हे सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. 'अनिष्ट गोष्टी नष्ट करा' अशा संदेश हे सण आपल्याला देतात. याच सुमारास मुसलमान बांधव मोठ्या उत्साहाने 'मोहरम' हा सण साजरा करतात.

पावसाळा संपत आलेला असतो. दीपावलीच्या स्वागताला सारे सज्ज होतात. नरकासुराचा वध करून स्नान केले जाते व आनंदाने सर्वत्र दिव्यांची आरास केली जाते. 'घर प्रकाशमय करा व चांगल्याचे स्वागत करा' असे सांगणारा हा कार्तिक महिना, हळूहळू थंडी वाढत जाते. मार्गशीर्षकाची गारठवून टाकणारी थंडी हेमंतऋतूची आठवण करून देते. या ऋतूमध्ये 'नाताळ' हा सण येतो. येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून हा सण आनंदाने साजरा केला जातो. त्यानंतर पौष महिन्यात मकरसंक्रांत येते. 'शत्रुत्व विसरून स्नेह वाढवा' असे सांगणारा हा सण. आपण स्नेहाचे प्रतीक म्हणून एकमेकांना तिळगूळ वाटतो.

तामीळनाडूत याच सुमारास 'पोंगल' सण साजरा केला जातो.

हेमंतातील थंडीचा कडाका हळूहळू कमी होऊ लागतो आणि शिशिराची चाहूल लागते. झाडांची पाने गळून पडतात व नवीन पालवी फुटू लागते. माघ संपून फाल्गुन महिना येतो, तो होळीचा सण घेऊनच. मोठ्या धुमधडाक्याने हा सण साजरा केला जातो. 'होळी'च्या आनंदी वातावरणातच वसंतऋतूचे आगमन होते. कोकिळ 'कुहू कुहू' गात वसंतऋतूचे स्वागत करतो. चैत्र महिन्याने नववर्षाची सुरुवात होते. चैत्राचा पहिला दिवस म्हणजेच 'गुढीपाडवा.' या दिवशी घरोघरी गुढ्या-तोरणे उभारून भारतीय नववर्षाचे स्वागत केले जाते.

चैत्र संपता संपता उन्हाळा सुरू होतो. वैशाखातील उन्हाचे चटके सहन करीत शेतकरी आपल्या कामाला सुरुवात करतो. ग्रीष्मऋतूतील या कडक उन्हाळ्यातही दक्षिणेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याची झुळूक त्याच्या मनाला सुखावत असते. ज्येष्ठ महिना सुरू होतो.



नागपंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी सण येतात. 'निसर्गाशी मैत्री करा, बंधुभावाने वागा. दुष्टांचा नाश करा' असेच ते आम्हाला सांगत असतात.

अशा उत्साही वातावरणातच भाद्रपद महिना केव्हा येतो ते कळतही नाही. श्रीगणेशाचे आगमन होते. घरोघरी गणपतीची मनोभावे पूजा केली जाते. भाद्रपद संपतो आणि शरदऋतूला सुरुवात होते. सारे वातावरण कसे प्रसन्न बनते. झाडे पाना-फुलांनी बहरून जातात. शेते डोलू लागतात.

'दसरा सण मोठा। नाही आनंदा तोटा'

असे म्हणतच आश्विनमास येतो. या महिन्यात गोव्यात तसेच महाराष्ट्रात नवरात्र, कर्नाटकात 'विजयादशमी', बंगालात 'दुर्गापूजा' तर केरळमध्ये 'ओणम' हे सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. 'अनिष्ट गोष्टी नष्ट करा' अशा संदेश हे सण आपल्याला देतात. याच सुमारास मुसलमान बांधव मोठ्या उत्साहाने 'मोहरम' हा सण साजरा करतात.

पावसाळा संपत आलेला असतो. दीपावलीच्या स्वागताला सारे सज्ज होतात. नरकासुराचा वध करून स्नान केले जाते व आनंदाने सर्वत्र दिव्यांची आरास केली जाते. 'घर प्रकाशमय करा व चांगल्याचे स्वागत करा' असे सांगणारा हा कार्तिक महिना, हळूहळू थंडी वाढत जाते. मार्गशीर्षकाची गारठवून टाकणारी थंडी हेमंतऋतूची आठवण करून देते. या ऋतूमध्ये 'नाताळ' हा सण येतो. येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस म्हणून हा सण आनंदाने साजरा केला जातो. त्यानंतर पौष महिन्यात मकरसंक्रांत येते. 'शत्रुत्व विसरून स्नेह वाढवा' असे सांगणारा हा सण. आपण स्नेहाचे प्रतीक म्हणून एकमेकांना तिळगूळ वाटतो.

तामीळनाडूत याच सुमारास 'पोंगल' सण साजरा केला जातो.

हेमंतातील थंडीचा कडाका हळूहळू कमी होऊ लागतो आणि शिशिराची चाहूल लागते. झाडांची पाने गळून पडतात व नवीन पालवी फुटू लागते. माघ संपून फाल्गुन महिना येतो, तो होळीचा सण घेऊनच. मोठ्या धुमधडाक्याने हा सण साजरा केला जातो. 'होळी'च्या आनंदी वातावरणातच वसंतऋतूचे आगमन होते. कोकिळ 'कुहू कुहू' गात वसंतऋतूचे स्वागत करतो. चैत्र महिन्याने नववर्षाची सुरुवात होते. चैत्राचा पहिला दिवस म्हणजेच 'गुढीपाडवा.' या दिवशी घरोघरी गुढ्या-तोरणे उभारून भारतीय नववर्षाचे स्वागत केले जाते.

चैत्र संपता संपता उन्हाळा सुरू होतो. वैशाखातील उन्हाचे चटके सहन करीत शेतकरी आपल्या कामाला सुरुवात करतो. ग्रीष्मऋतूतील या कडक उन्हाळ्यातही दक्षिणेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याची झुळूक त्याच्या मनाला सुखावत असते. ज्येष्ठ महिना सुरू होतो.

१५

फणस, काजू, करवंदे, जांभळे यासारख्या मधुर फळांना बहर आलेला असतो. काही दिवसानंतर आकाशात काळे ढग जमू लागतात. पाहता पाहता आषाढातील जलधारा कोसळू लागतात. या जलधारा नवे विचार, नवे निश्चय यांचा जूण वर्षाव करतात.

असे हे ऋतुचक्र अखंड फिरत राहते आणि त्याचबरोबर येणारे सणही आम्हाला आनंद देत राहतात.

असे हे ऋतुचक्र अखंड फिरणारे!
असे हे ऋतुचक्र आनंद देणारे!

---

**शब्दार्थ**

**शिरवे –** पावसाची बारीक सर, **धरती–** जमीन, **स्नेह–** प्रेम.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) श्रावण महिन्यात कोणकोणते सण येतात?
२) दीपावली आपल्याला कोणता संदेश देते?
३) नववर्षाचे स्वागत आपण कसे करतो?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१) या पाठात श्रावण महिन्याचे वर्णन कसे केले आहे?
२) शरदऋतूमध्ये वातावरणात कोणता बदल होतो?
३) 'दीपावली' व 'नाताळ' हे सण कोणती शिकवण देतात?

**व्यवसाय**

**१. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी समानार्थी शब्द वापरा व वाक्ये पुन्हा लिहा.**

१) प्रत्येकाने आपले शहर स्वच्छ ठेवावे.
२) जॉनचे गाव डोंगराच्या कुशीत होते.
३) सर्प हा शेतकऱ्याचा मित्र आहे.
४) चोरीची वार्ता हां हां म्हणता गावात पसरली.
५) आकाशात मेघ जमा झाले होते.

**उपक्रम**

१) ऋतू, महिने व सण यांची माहिती देणारे चक्र तयार करा.
२) वेगवेगळ्या राज्यातील सणांची यादी करा.

●●●



फणस, काजू, करवंदे, जांभळे यासारख्या मधुर फळांना बहर आलेला असतो. काही दिवसानंतर आकाशात काळे ढग जमू लागतात. पाहता पाहता आषाढातील जलधारा कोसळू लागतात. या जलधारा नवे विचार, नवे निश्चय यांचा जूण वर्षाव करतात.

असे हे ऋतुचक्र अखंड फिरत राहते आणि त्याचबरोबर येणारे सणही आम्हाला आनंद देत राहतात.

असे हे ऋतुचक्र अखंड फिरणारे!
असे हे ऋतुचक्र आनंद देणारे!

---

**शब्दार्थ**

**शिरवे –** पावसाची बारीक सर, **धरती–** जमीन, **स्नेह–** प्रेम.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) श्रावण महिन्यात कोणकोणते सण येतात?
२) दीपावली आपल्याला कोणता संदेश देते?
३) नववर्षाचे स्वागत आपण कसे करतो?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१) या पाठात श्रावण महिन्याचे वर्णन कसे केले आहे?
२) शरदऋतूमध्ये वातावरणात कोणता बदल होतो?
३) 'दीपावली' व 'नाताळ' हे सण कोणती शिकवण देतात?

**व्यवसाय**

**१. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी समानार्थी शब्द वापरा व वाक्ये पुन्हा लिहा.**

१) प्रत्येकाने आपले शहर स्वच्छ ठेवावे.
२) जॉनचे गाव डोंगराच्या कुशीत होते.
३) सर्प हा शेतकऱ्याचा मित्र आहे.
४) चोरीची वार्ता हां हां म्हणता गावात पसरली.
५) आकाशात मेघ जमा झाले होते.

**उपक्रम**

१) ऋतू, महिने व सण यांची माहिती देणारे चक्र तयार करा.
२) वेगवेगळ्या राज्यातील सणांची यादी करा.

●●●

१६

# ५. चित्र

तळ्यात पाणी हिरवेगार
मजेत फिरती बदके चार

इकडून तिकडे पळते खार
तिची शेपटी झुपकेदार

पिंपळ पानांनी भरदार
जसा उभा कोणी सरदार

कडा पलिकडे काळा शार
शुभ्र दुधाची झिरपे धार

ऊन कोवळे हे हळुवार
सोन्याचे झाले घरदार.





# ५. चित्र

तळ्यात पाणी हिरवेगार
मजेत फिरती बदके चार

इकडून तिकडे पळते खार
तिची शेपटी झुपकेदार

पिंपळ पानांनी भरदार
जसा उभा कोणी सरदार


कडा पलिकडे काळा शार
शुभ्र दुधाची झिरपे धार

ऊन कोवळे हे हळुवार
सोन्याचे झाले घरदार.



१७

# ६. मी एक डास...




जून महिन्याच्या शेवटचा आठवडा होता. पावसाळा सुरू होऊन पंधरा-वीस दिवस झाले होते. रमेश तापाने आजारी होता. आता त्याचा ताप कमी होऊन दोन दिवस झाले होते. त्याला तापामुळे बराच थकवा आला होता. त्याला झोप येत होती. इतक्यात त्याच्या कानाजवळ डासाची गुणगुण सुरू झाली.

''काय रमेश, बरं वाटतंय ना आता?'' आवाज कानावर आला. रमेश दचकला. ''अरे, घाबरू नकोस, मी ॲनाफिलीस डासच् बोलत आहे.

''अरे, आठवतंय तुला? प्रथम तुझं अंग दुखू लागलं. नंतर तुला ताप आला आणि वांत्याही होऊ लागल्या. तुझा मित्र सुरेश याला चक्कर आणि ताप आला. याचं कारण काय माहीत आहे? अरे, तुम्हाला आमच्यातीलच मादी चावली. तिनं सुईसारख्या टोकदार सोंडेतून आपल्या शरीरातील मलेरियाचे रोगजंतू तुमच्या शरीरात सोडले.



६. मी एक डास...



जून महिन्याच्या शेवटचा आठवडा होता. पावसाळा सुरू होऊन पंधरा-वीस दिवस झाले होते. रमेश तापाने आजारी होता. आता त्याचा ताप कमी होऊन दोन दिवस झाले होते. त्याला तापामुळे बराच थकवा आला होता. त्याला झोप येत होती. इतक्यात त्याच्या कानाजवळ डासाची गुणगुण सुरू झाली.

''काय रमेश, बरं वाटतंय ना आता?'' आवाज कानावर आला. रमेश दचकला. ''अरे, घाबरू नकोस, मी ॲनाफिलीस डासच् बोलत आहे.

''अरे, आठवतंय तुला? प्रथम तुझं अंग दुखू लागलं. नंतर तुला ताप आला आणि वांत्याही होऊ लागल्या. तुझा मित्र सुरेश याला चक्कर आणि ताप आला. याचं कारण काय माहीत आहे? अरे, तुम्हाला आमच्यातीलच मादी चावली. तिनं सुईसारख्या टोकदार सोंडेतून आपल्या शरीरातील मलेरियाचे रोगजंतू तुमच्या शरीरात सोडले.

१८

अरे, आम्ही तुमच्याकडं येण्याचं कारण माहीत आहे का? तुम्हीच निर्माण केलेलं वातावरण. तू तुझ्या खोलीची स्वच्छता केलीस आणि केरकचरा घराच्या मागील भागात टाकलास. आईनेही स्वयंपाकघरातील साफसफाई करून खराब झालेले जिन्नस, नारळाच्या करवंट्या इत्यादी वस्तू घराबाहेर टाकल्या. ताईनं इतर खोल्यातील सफाई करून सर्व टाकाऊ वस्तू डबक्यात टाकल्या. मी आणि आमचे कुटुंबीय तिकडून जात होतो. आम्ही विचार केला. आपल्याला इकडं भरपूर खाद्य तर मिळेलच, शिवाय सुखानं संसारही थाटता येईल. तुमचे शेजारीही चांगले हं त्यांनी तर तुंबलेली गटारे तशीच ठेवली होती. तुमच्या घराच्या मागील बाजूचे शेजारी तर फारच चांगले. त्यांनी आम्हाला आग्रहाचं निमंत्रण दिलं. त्यांच्या संडासाच्या टाकीचं पाणी भरून वहात होतं. त्याकडं त्यांनी दुर्लक्ष केलं होतं. म्हणून आम्ही आणि आमचे नातेवाईक, मित्रमंडळी तुमच्या परिसरात येऊन राहू लागलो.

तुझ्या घरासभोवतालचा परिसर आम्हाला पोषक होता. थोड्या दिवसानंतर आमच्या लक्षात आलं की, तुमच्या छप्परावरील पाण्याची टाकी बरेच दिवस उघडून साफ केलेली नव्हती. ती जागा अंडी घालण्यास आम्हाला योग्य वाटली. साचलेले स्वच्छ पाणी इतर ठिकाणीही होतंच. त्याही ठिकाणी अंडी घालणं आम्हाला सोयीचं होतं.

तुला आमच्याविषयी काही माहिती आहे का? आमचे अंदाजे ३२०० जातिबांधव आहेत. मलेरियासारख्या साथीचा प्रसार करणं हेच आमचं काम, हेच काम आम्ही मना-पासून करू लागलो, जूनच्या अखेरीस तर आमच्या कामाला जोर आला.

तुला आलेला ताप नेमका कोणत्या प्रकारचा हे समजून घेणं आवश्यक होतं. त्यासाठी बाबांनी तुझं रक्त तपासून घेतलं ना! त्यामुळंच डॉक्टरांना योग्य निदान करून तुझ्यावर उपचार करता आले. डॉक्टरांनी दिलेलं औषध पूर्ण घेणं आवश्यक आहे. मध्येच सोडू नकोस हं. नाहीतर तुझ्या जीवितालासुद्धा धोका पोहचू शकतो.

सुरेशच्या घरच्या मंडळींनी मात्र त्याला डॉक्टरकडं नेलं नाही. तर काय केलं माहीत आहे? त्यांनी ठिकठिकाणाहून अंगारे, दोरे, मंतरलेले पाणी आणून उपचार चालू ठेवले आहेत. अरे, अशानं त्याचा ताप कसा जाईल?

डॉक्टरांनी औषध देताना तुला मलेरिया झाल्याचं सांगितलं आणि स्वच्छतेबद्दल सूचनाही केल्या. त्यानंतर तुझ्या आई-बाबांनी घराभोवतालच्या स्वच्छतेकडं लक्ष दिलं. परिसर साफ केला. सर्व टाकाऊ वस्तू जाऊन नष्ट केल्या. पाणी साचून राहणार नाही अशी व्यवस्था केली. घरात पाणी साठविण्याची भांडी, टाकी जंतुनाशकं वापरून स्वच्छ केली. पाणी उकळून पिऊ लागलात. त्यामुळं तुमच्या घराच्या आसपास राहाणं आम्हाला अशक्य झालं. स्वच्छतेनंतर तुम्ही जंतुनाशकांचे फवारेही मारलेत. त्यामुळं आमची अनेक



अरे, आम्ही तुमच्याकडं येण्याचं कारण माहीत आहे का? तुम्हीच निर्माण केलेलं वातावरण. तू तुझ्या खोलीची स्वच्छता केलीस आणि केरकचरा घराच्या मागील भागात टाकलास. आईनेही स्वयंपाकघरातील साफसफाई करून खराब झालेले जिन्नस, नारळाच्या करवंट्या इत्यादी वस्तू घराबाहेर टाकल्या. ताईनं इतर खोल्यातील सफाई करून सर्व टाकाऊ वस्तू डबक्यात टाकल्या. मी आणि आमचे कुटुंबीय तिकडून जात होतो. आम्ही विचार केला. आपल्याला इकडं भरपूर खाद्य तर मिळेलच, शिवाय सुखानं संसारही थाटता येईल. तुमचे शेजारीही चांगले हं त्यांनी तर तुंबलेली गटारे तशीच ठेवली होती. तुमच्या घराच्या मागील बाजूचे शेजारी तर फारच चांगले. त्यांनी आम्हाला आग्रहाचं निमंत्रण दिलं. त्यांच्या संडासाच्या टाकीचं पाणी भरून वहात होतं. त्याकडं त्यांनी दुर्लक्ष केलं होतं. म्हणून आम्ही आणि आमचे नातेवाईक, मित्रमंडळी तुमच्या परिसरात येऊन राहू लागलो.

तुझ्या घरासभोवतालचा परिसर आम्हाला पोषक होता. थोड्या दिवसानंतर आमच्या लक्षात आलं की, तुमच्या छप्परावरील पाण्याची टाकी बरेच दिवस उघडून साफ केलेली नव्हती. ती जागा अंडी घालण्यास आम्हाला योग्य वाटली. साचलेले स्वच्छ पाणी इतर ठिकाणीही होतंच. त्याही ठिकाणी अंडी घालणं आम्हाला सोयीचं होतं.

तुला आमच्याविषयी काही माहिती आहे का? आमचे अंदाजे ३२०० जातिबांधव आहेत. मलेरियासारख्या साथीचा प्रसार करणं हेच आमचं काम, हेच काम आम्ही मना-पासून करू लागलो, जूनच्या अखेरीस तर आमच्या कामाला जोर आला.

तुला आलेला ताप नेमका कोणत्या प्रकारचा हे समजून घेणं आवश्यक होतं. त्यासाठी बाबांनी तुझं रक्त तपासून घेतलं ना! त्यामुळंच डॉक्टरांना योग्य निदान करून तुझ्यावर उपचार करता आले. डॉक्टरांनी दिलेलं औषध पूर्ण घेणं आवश्यक आहे. मध्येच सोडू नकोस हं. नाहीतर तुझ्या जीवितालासुद्धा धोका पोहचू शकतो.

सुरेशच्या घरच्या मंडळींनी मात्र त्याला डॉक्टरकडं नेलं नाही. तर काय केलं माहीत आहे? त्यांनी ठिकठिकाणाहून अंगारे, दोरे, मंतरलेले पाणी आणून उपचार चालू ठेवले आहेत. अरे, अशानं त्याचा ताप कसा जाईल?

डॉक्टरांनी औषध देताना तुला मलेरिया झाल्याचं सांगितलं आणि स्वच्छतेबद्दल सूचनाही केल्या. त्यानंतर तुझ्या आई-बाबांनी घराभोवतालच्या स्वच्छतेकडं लक्ष दिलं. परिसर साफ केला. सर्व टाकाऊ वस्तू जाऊन नष्ट केल्या. पाणी साचून राहणार नाही अशी व्यवस्था केली. घरात पाणी साठविण्याची भांडी, टाकी जंतुनाशकं वापरून स्वच्छ केली. पाणी उकळून पिऊ लागलात. त्यामुळं तुमच्या घराच्या आसपास राहाणं आम्हाला अशक्य झालं. स्वच्छतेनंतर तुम्ही जंतुनाशकांचे फवारेही मारलेत. त्यामुळं आमची अनेक

१९

कुटुंबं उद्ध्वस्त झाली.

अरे, तुम्हीच काय नगरपालिकेनंसुद्धा आमच्याविरुद्ध मोहीम उघडली. त्यांनाही आम्ही नको होतोच. सर्व तुंबलेली गटारे त्यांनी स्वच्छ केली. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना केल्या. ठिकठिकाणी जंतुनाशकांचे फवारे मारले. आम्हाला सर्वांनीच सळो की पळो करून सोडलं आहे.

आता मी तुझा निरोप घेण्यासाठीच आलो आहे. तू गैरसमजानं मलाच दोषी ठरवशील म्हणून सांगतो, की तुम्हीच आम्हाला बोलावून इकडं आणलंत. त्यामुळं हे सगळं घडलं. बरंय, येतो मी आता!''

रमेश रागाने ओरडला, ''आता बिलकूल फिरकू नकोस इकडं!''

रमेशला झोपेतून जाग आली. त्याला घाम सुटला होता. सहज त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. घरासमोरील रस्त्याच्या कडेला साफसफाई चालली होती. काही कामगार गटारे साफ करत होते. तर काहीजण जंतुनाशकाचे फवारे मारीत होते.

---

### शब्दार्थ

**थकवा–** अशक्तपणा, **ॲनाफिलीस–** मलेरियाचा फैलाव करणारी डासाची एक जात, **पोषक–** योग्य, **उद्ध्वस्त–** नाश, नष्ट, **निदान–** परीक्षा.

### वाक्प्रचार

**सळो की पळो करून सोडणे–** जगणे नकोसे करणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) रमेशच्या कानाजवळ कोणत्या जातीचा डास बोलत होता?
२) रमेश व सुरेशला मलेरियाचा ताप कशामुळे आला?
३) डॉक्टरांनी रमेशच्या आजाराचे निदान कसे केले?
४) डासांची कुटुंबे उद्ध्वस्त का झाली?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) मलेरियाची लक्षणे कोणती?
२) रमेशच्या घराजवळील परिसरात डासांनी मुक्काम का ठोकला?
३) डॉक्टरांनी स्वच्छतेबाबत कोणत्या सूचना केल्या?
४) मलेरियाचा प्रसार होऊ नये म्हणून नगरपालिकेने कोणती मोहीम हाती घेतली?



कुटुंबं उद्ध्वस्त झाली.

अरे, तुम्हीच काय नगरपालिकेनंसुद्धा आमच्याविरुद्ध मोहीम उघडली. त्यांनाही आम्ही नको होतोच. सर्व तुंबलेली गटारे त्यांनी स्वच्छ केली. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना केल्या. ठिकठिकाणी जंतुनाशकांचे फवारे मारले. आम्हाला सर्वांनीच सळो की पळो करून सोडलं आहे.

आता मी तुझा निरोप घेण्यासाठीच आलो आहे. तू गैरसमजानं मलाच दोषी ठरवशील म्हणून सांगतो, की तुम्हीच आम्हाला बोलावून इकडं आणलंत. त्यामुळं हे सगळं घडलं. बरंय, येतो मी आता!''

रमेश रागाने ओरडला, ''आता बिलकूल फिरकू नकोस इकडं!''

रमेशला झोपेतून जाग आली. त्याला घाम सुटला होता. सहज त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. घरासमोरील रस्त्याच्या कडेला साफसफाई चालली होती. काही कामगार गटारे साफ करत होते. तर काहीजण जंतुनाशकाचे फवारे मारीत होते.

---

### शब्दार्थ

**थकवा–** अशक्तपणा, **ॲनाफिलीस–** मलेरियाचा फैलाव करणारी डासाची एक जात, **पोषक–** योग्य, **उद्ध्वस्त–** नाश, नष्ट, **निदान–** परीक्षा.

### वाक्प्रचार

**सळो की पळो करून सोडणे–** जगणे नकोसे करणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) रमेशच्या कानाजवळ कोणत्या जातीचा डास बोलत होता?
२) रमेश व सुरेशला मलेरियाचा ताप कशामुळे आला?
३) डॉक्टरांनी रमेशच्या आजाराचे निदान कसे केले?
४) डासांची कुटुंबे उद्ध्वस्त का झाली?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) मलेरियाची लक्षणे कोणती?
२) रमेशच्या घराजवळील परिसरात डासांनी मुक्काम का ठोकला?
३) डॉक्टरांनी स्वच्छतेबाबत कोणत्या सूचना केल्या?
४) मलेरियाचा प्रसार होऊ नये म्हणून नगरपालिकेने कोणती मोहीम हाती घेतली?

२०

**व्यवसाय**

खालील प्रत्येक वाक्यात वाक्प्रचाराच्या अर्थाचा उपयोग केलेला आहे व प्रत्येक कंसात वाक्प्रचार दिलेला आहे. कंसातील वाक्प्रचाराचा योग्यप्रकारे उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.

१) पहिला क्रमांक आल्याचे कळल्यावर रिटाला अतिशय आनंद झाला.
(आनंद गगनात न मावणे)

२) भीमाने बकासुराचा पराभव केला.
(गारद करणे)

३) कासिमने काढलेले चित्र पाहून सरपंचांनी त्याला शाबासकी दिली.
(पाठीवरून हात फिरविणे)

४) सरदाराला आपली चूक कळल्यावर तो राजाला शरण आला.
(लोटांगण घालणे)

५) एडिसनने नवे नवे शोध लावून प्रसिद्धी मिळविली.
(नाव कमावणे)

**उपक्रम**

तुम्ही स्वतः आंबा, फणस, काजू व केळ यापैकी एक झाड आहात असे समजून वर्गात दहा वाक्ये बोला.

●●●



**व्यवसाय**

खालील प्रत्येक वाक्यात वाक्प्रचाराच्या अर्थाचा उपयोग केलेला आहे व प्रत्येक कंसात वाक्प्रचार दिलेला आहे. कंसातील वाक्प्रचाराचा योग्यप्रकारे उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.

१) पहिला क्रमांक आल्याचे कळल्यावर रिटाला अतिशय आनंद झाला.
(आनंद गगनात न मावणे)

२) भीमाने बकासुराचा पराभव केला.
(गारद करणे)

३) कासिमने काढलेले चित्र पाहून सरपंचांनी त्याला शाबासकी दिली.
(पाठीवरून हात फिरविणे)

४) सरदाराला आपली चूक कळल्यावर तो राजाला शरण आला.
(लोटांगण घालणे)

५) एडिसनने नवे नवे शोध लावून प्रसिद्धी मिळविली.
(नाव कमावणे)

**उपक्रम**

तुम्ही स्वतः आंबा, फणस, काजू व केळ यापैकी एक झाड आहात असे समजून वर्गात दहा वाक्ये बोला.

●●●

२१

# ७. मन करा रे प्रसन्न!

आषाढी एकादशी आली. देहू गावातील वारकरी मंडळी टाळ, मृदंग वगैरे घेऊन देवळाकडे जमली. तुकोबा मात्र अजून आले नव्हते. त्यांची वाट पाहून मंडळी कंटाळली. शेवटी कोणीतरी म्हटले, ''तुकोबा, अजून आले नाहीत. वेळ तर होत आली. पण त्यांच्याशिवाय जायचं तरी कसं?''

''त्याच्या घरी जाऊन बघू या.'' दुसरा म्हणाला.

सर्वांनाच ते पटलं. सगळे वारकरी तुकोबाच्या घरी आले. तुकोबा ओसरीवर 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत बसले होते. त्यांना बसलेले बघून एका वारकऱ्याने विचारले,

''तुकोबा, अजून तुमची तयारी झाली नाही?''

''कसली तयारी?'' तुकोबांनी विचारले.

''कसली म्हणून काय विचारता? वारीला निघायचं नाही का?'' दुसऱ्या वारकऱ्याने प्रश्न केला.

तुकोबा म्हणाले, ''आता माझं वय झालंय. मला चालणं झेपत नाही. तुम्ही चला.''

''छे! छे!'' त्यातला एकजण म्हणाला, ''अहो, तुम्ही असल्याशिवाय वारीला शोभा नाही. तुम्ही पाहिजेच.'' सगळ्यांनी आग्रह धरला.

''प्रत्येक वारीला न चुकता पंढरपूरला जाणारे तुकोबा यापूर्वी नकार देतात हे ऐकून वारकऱ्यांना आश्चर्य वाटले. ते अधिक आग्रह करू लागले. ''तुम्ही आलंच पाहिजे. आषाढी-कार्तिकी एकादशीला चंद्रभागेचं स्नान आणि पांडुरंगाचं दर्शन चुकलं नाही तुमचं!''

''गोष्ट खरी आहे. परंतु आता चालण्याचा त्रास होतो.'' तुकोबा.

''मग चंद्रभागेत स्नान व पांडुरंगाचं दर्शन .......'' एक वारकरी. ते ऐकून तुकोबा घरात गेले व एक भोपळा घेऊन बाहेर आले. मंदपणे हसत ते म्हणाले, ''हा भोपळा घ्या.''

''भोपळा घेऊन काय करायचं.'' दुसरा एक वारकरी.

''हा भापळा न समजता 'तुकोबाच' समजा आणि चंद्रभागेत याला स्नान घाला. पांडुरंगाचं दर्शनही घडवा आणि घेऊन या.'' तुकोबा त्या वारकऱ्याचा हातात भोपळा देत म्हणाले.



# ७. मन करा रे प्रसन्न!

आषाढी एकादशी आली. देहू गावातील वारकरी मंडळी टाळ, मृदंग वगैरे घेऊन देवळाकडे जमली. तुकोबा मात्र अजून आले नव्हते. त्यांची वाट पाहून मंडळी कंटाळली. शेवटी कोणीतरी म्हटले, ''तुकोबा, अजून आले नाहीत. वेळ तर होत आली. पण त्यांच्याशिवाय जायचं तरी कसं?''

''त्याच्या घरी जाऊन बघू या.'' दुसरा म्हणाला.

सर्वांनाच ते पटलं. सगळे वारकरी तुकोबाच्या घरी आले. तुकोबा ओसरीवर 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत बसले होते. त्यांना बसलेले बघून एका वारकऱ्याने विचारले,

''तुकोबा, अजून तुमची तयारी झाली नाही?''

''कसली तयारी?'' तुकोबांनी विचारले.

''कसली म्हणून काय विचारता? वारीला निघायचं नाही का?'' दुसऱ्या वारकऱ्याने प्रश्न केला.

तुकोबा म्हणाले, ''आता माझं वय झालंय. मला चालणं झेपत नाही. तुम्ही चला.''

''छे! छे!'' त्यातला एकजण म्हणाला, ''अहो, तुम्ही असल्याशिवाय वारीला शोभा नाही. तुम्ही पाहिजेच.'' सगळ्यांनी आग्रह धरला.

''प्रत्येक वारीला न चुकता पंढरपूरला जाणारे तुकोबा यापूर्वी नकार देतात हे ऐकून वारकऱ्यांना आश्चर्य वाटले. ते अधिक आग्रह करू लागले. ''तुम्ही आलंच पाहिजे. आषाढी-कार्तिकी एकादशीला चंद्रभागेचं स्नान आणि पांडुरंगाचं दर्शन चुकलं नाही तुमचं!''

''गोष्ट खरी आहे. परंतु आता चालण्याचा त्रास होतो.'' तुकोबा.

''मग चंद्रभागेत स्नान व पांडुरंगाचं दर्शन .......'' एक वारकरी. ते ऐकून तुकोबा घरात गेले व एक भोपळा घेऊन बाहेर आले. मंदपणे हसत ते म्हणाले, ''हा भोपळा घ्या.''

''भोपळा घेऊन काय करायचं.'' दुसरा एक वारकरी.

''हा भापळा न समजता 'तुकोबाच' समजा आणि चंद्रभागेत याला स्नान घाला. पांडुरंगाचं दर्शनही घडवा आणि घेऊन या.'' तुकोबा त्या वारकऱ्याचा हातात भोपळा देत म्हणाले.

२२

''ठीक आहे. आता तुम्हीच हे सांगता म्हणून आम्ही मान्य करतो.'' असे म्हणून वारकरी भोपळा घेऊन निघाले.

एके दिवशी तुकोबा ओसरीवर बसले होते. त्यावेळी विठ्ठल नामाचा गजर ऐकू आला. तिकडे त्यांची नजर गेली. वारकरी येताना दिसत होते. तुकोबा आपल्या पत्नीला–जिजाऊला म्हणाले, ''अग, वारकरी येताहेत. त्यांच्या भोजन–फराळाची काहीतरी व्यवस्था करायला हवी.''

जिजाऊ बाहेर येत म्हणाली, ''घरात धान्य शिल्लक नाही.''

''दारी आलेल्यांना उपाशी पाठवू नये. काहीतरी व्यवस्था कर.'' तुकोबांनी सांगितले.

तिने घरात शोधून बघितले व आतूनच म्हणाली, ''थोड्या कण्या आहेत.''

''कण्या तर कण्या. त्याच शिजव.'' तुकाराम म्हणाले.

तोपर्यंत वारकरी येऊन पोहोचले. त्यांचे स्वागत करत तुकोबा म्हणाले, ''या या. कशी झाली वारी? पांडुरंगाचं दर्शन झालं ना?''

''हो हो, पांडुरंगाचं दर्शन झालं. मन तृप्त झालं.''

एक वारकरी पुढं येऊन म्हणाला, ''हा घ्या तुम्ही दिलेला भोपळा.''





''ठीक आहे. आता तुम्हीच हे सांगता म्हणून आम्ही मान्य करतो.'' असे म्हणून वारकरी भोपळा घेऊन निघाले.

एके दिवशी तुकोबा ओसरीवर बसले होते. त्यावेळी विठ्ठल नामाचा गजर ऐकू आला. तिकडे त्यांची नजर गेली. वारकरी येताना दिसत होते. तुकोबा आपल्या पत्नीला–जिजाऊला म्हणाले, ''अग, वारकरी येताहेत. त्यांच्या भोजन–फराळाची काहीतरी व्यवस्था करायला हवी.''

जिजाऊ बाहेर येत म्हणाली, ''घरात धान्य शिल्लक नाही.''

''दारी आलेल्यांना उपाशी पाठवू नये. काहीतरी व्यवस्था कर.'' तुकोबांनी सांगितले.

तिने घरात शोधून बघितले व आतूनच म्हणाली, ''थोड्या कण्या आहेत.''

''कण्या तर कण्या. त्याच शिजव.'' तुकाराम म्हणाले.

तोपर्यंत वारकरी येऊन पोहोचले. त्यांचे स्वागत करत तुकोबा म्हणाले, ''या या. कशी झाली वारी? पांडुरंगाचं दर्शन झालं ना?''

''हो हो, पांडुरंगाचं दर्शन झालं. मन तृप्त झालं.''

एक वारकरी पुढं येऊन म्हणाला, ''हा घ्या तुम्ही दिलेला भोपळा.''



२३

''दमून आला आहात. आता जेवूनच चला.'' तुकोबांनी विनंती केली. वारकऱ्यांनी ती विनंती मान्य केली.

वारकऱ्यांनी आणलेला भोपळा जिजाऊकडे देत तुकोबा म्हणाले, ''या भोपळ्याची भाजी कर.''

थोड्या वेळाने भोजनाची तयारी झाली. पाने मांडली. पंगत बसली. 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' असा नामघोष करून वारकरी जेवू लागले. एक दोन घास खाताच भाजी कडू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कोणी जेवेना. तसे तुकोबा म्हणाले, ''अहो, थांबलात का? जेवा ना.''

''तुकोबा, अहो भाजी कडू आहे.'' एकजण म्हणाला.

''खरंच कडू आहे.'' दुसरा म्हणाला.

''असं म्हणता? बरं, मला एक सांगा. या भोपळ्याला तुम्ही चंद्रभागेत स्नान घातलं होतं ना?'' तुकोबांनी विचारले.

''चंद्रभागेत स्नान तर घातलंच आणि देवदर्शनसुद्धा करवून आणलं.''

''मग तो कडू कसा राहिला?'' तुकोबांनी प्रश्न केला.

सगळे एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले. काय बोलावे ते कुणालाच सुचेना.

''बरं, मला एक सांगा, आम्ही तीर्थस्नान कशासाठी करतो?'' तुकोबांनी विचारले.

''पाप नष्ट व्हावे, आपल्यातील दोष जावेत म्हणून.'' एकजण उत्तरला.

''मग या भोपळ्याचा कडूपणा का गेला नाही?''

तुकोबाच्या या प्रश्नावर सर्वजण गप्प राहिले. त्यावर तुकोबा म्हणाले,

''फक्त वाऱ्या करून किंवा देवदर्शनाने दोष जात नाहीत.'' सारेजण आ वासून त्यांच्याकडे बघू लागले. आपले काहीतरी चुकले असे त्यांना वाटू लागले.

''मग आपल्यातील दोष जाण्यासाठी काय करावं?'' एकाने विचारले.

''मन प्रसन्न ठेवावं. वाईट विचार मनात आणू नयेत. आचरण चांगलं ठेवावं. म्हणजे आपोआप सगळे दोष निघून जातील.'' असे सांगून तुकाराम अभंग आळवू लागले.

**मन करा रे प्रसन्न।**
**सर्व सिद्धीचे कारण।**



''दमून आला आहात. आता जेवूनच चला.'' तुकोबांनी विनंती केली. वारकऱ्यांनी ती विनंती मान्य केली.

वारकऱ्यांनी आणलेला भोपळा जिजाऊकडे देत तुकोबा म्हणाले, ''या भोपळ्याची भाजी कर.''

थोड्या वेळाने भोजनाची तयारी झाली. पाने मांडली. पंगत बसली. 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' असा नामघोष करून वारकरी जेवू लागले. एक दोन घास खाताच भाजी कडू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कोणी जेवेना. तसे तुकोबा म्हणाले, ''अहो, थांबलात का? जेवा ना.''

''तुकोबा, अहो भाजी कडू आहे.'' एकजण म्हणाला.

''खरंच कडू आहे.'' दुसरा म्हणाला.

''असं म्हणता? बरं, मला एक सांगा. या भोपळ्याला तुम्ही चंद्रभागेत स्नान घातलं होतं ना?'' तुकोबांनी विचारले.

''चंद्रभागेत स्नान तर घातलंच आणि देवदर्शनसुद्धा करवून आणलं.''

''मग तो कडू कसा राहिला?'' तुकोबांनी प्रश्न केला.

सगळे एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले. काय बोलावे ते कुणालाच सुचेना.

''बरं, मला एक सांगा, आम्ही तीर्थस्नान कशासाठी करतो?'' तुकोबांनी विचारले.

''पाप नष्ट व्हावे, आपल्यातील दोष जावेत म्हणून.'' एकजण उत्तरला.

''मग या भोपळ्याचा कडूपणा का गेला नाही?''

तुकोबाच्या या प्रश्नावर सर्वजण गप्प राहिले. त्यावर तुकोबा म्हणाले,

''फक्त वाऱ्या करून किंवा देवदर्शनाने दोष जात नाहीत.'' सारेजण आ वासून त्यांच्याकडे बघू लागले. आपले काहीतरी चुकले असे त्यांना वाटू लागले.

''मग आपल्यातील दोष जाण्यासाठी काय करावं?'' एकाने विचारले.

''मन प्रसन्न ठेवावं. वाईट विचार मनात आणू नयेत. आचरण चांगलं ठेवावं. म्हणजे आपोआप सगळे दोष निघून जातील.'' असे सांगून तुकाराम अभंग आळवू लागले.

**मन करा रे प्रसन्न।**
**सर्व सिद्धीचे कारण।**

२४

**शब्दार्थ**

**वारकरी–** पंढरीची वारी करणारा, **मृदंग–** भजनात वाजविण्याचे एक वाद्य,
**कण्या –** धान्याचे बारीक कण,

**वाक्‌प्रचार**

**आ वासून पाहणे–** आश्चर्याने पाहणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) वारकरी देवळाजवळ का जमले?
२) वारकऱ्यांकडे भोपळा देऊन तुकोबांनी त्यांना काय सांगितले?
३) जिजाऊने जेवणासाठी काय काय केले?
४) वारकरी जेवायचे का थांबले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) माणसातील दोष घालवण्यासाठी तुकारामांनी काय सुचविले?
२) या कथेतील भोपळ्याच्या उदाहरणावरून कोणती शिकवण मिळते?

**व्यवसाय**

**खालील उताऱ्यात योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हे वापरा व उतारा पुन्हा लिहा.**

गणू हुंदके देत पुन्हा म्हणत होता झाडं नाही तोडायची झाडं नाही तोडायची

अरे गणू काय झालं रडायला गुरुजींनी विचारले गणूने सगळी हकीकत सांगितली गुरुजींना गणूचे फार कौतुक वाटले त्या बिचाऱ्याचं दुःख खरं आहे गेल्या वर्षी त्याच्या घरातील माणसं नाही का चिरडून मेली आता या डोंगरावरची झाडं तोडली तर पुन्हा तसंच नाही का घडणार खरंच हे रान ही झाडं आपण वाचवली पाहिजेत

**उपक्रम**

१. तुमच्या शाळेत वाचनालयातून संतांच्या कथा असलेले पुस्तक मिळवून वाचा.
२. तुम्ही वाचलेली संताची गोष्ट वर्गातील मुलांना सांगा.

●●●



**शब्दार्थ**

**वारकरी–** पंढरीची वारी करणारा, **मृदंग–** भजनात वाजविण्याचे एक वाद्य,
**कण्या –** धान्याचे बारीक कण,

**वाक्‌प्रचार**

**आ वासून पाहणे–** आश्चर्याने पाहणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) वारकरी देवळाजवळ का जमले?
२) वारकऱ्यांकडे भोपळा देऊन तुकोबांनी त्यांना काय सांगितले?
३) जिजाऊने जेवणासाठी काय काय केले?
४) वारकरी जेवायचे का थांबले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) माणसातील दोष घालवण्यासाठी तुकारामांनी काय सुचविले?
२) या कथेतील भोपळ्याच्या उदाहरणावरून कोणती शिकवण मिळते?

**व्यवसाय**

**खालील उताऱ्यात योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हे वापरा व उतारा पुन्हा लिहा.**

गणू हुंदके देत पुन्हा म्हणत होता झाडं नाही तोडायची झाडं नाही तोडायची

अरे गणू काय झालं रडायला गुरुजींनी विचारले गणूने सगळी हकीकत सांगितली गुरुजींना गणूचे फार कौतुक वाटले त्या बिचाऱ्याचं दुःख खरं आहे गेल्या वर्षी त्याच्या घरातील माणसं नाही का चिरडून मेली आता या डोंगरावरची झाडं तोडली तर पुन्हा तसंच नाही का घडणार खरंच हे रान ही झाडं आपण वाचवली पाहिजेत

**उपक्रम**

१. तुमच्या शाळेत वाचनालयातून संतांच्या कथा असलेले पुस्तक मिळवून वाचा.
२. तुम्ही वाचलेली संताची गोष्ट वर्गातील मुलांना सांगा.

●●●

२५

# ८. बँक

मोनिका आज खुशीत होती. तिला राज्य पातळीवर आयोजित केलेल्या पर्यावरण विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले होते. बक्षिसाची रक्कम घेऊन घरी येताना तिने बाबांना विचारले, ''बाबा, या पैशाच आपण काय घ्यायचं हो?''

बाबा म्हणाले, ''पैशांचं आपण काही घ्यायचं नाही बाळ.''

''मग काय करू या?'' मोनिकाने विचारले.

''आपण तुझं बँकेत खातं उघडू.'' बाबांनी सांगितले.

''कधी जाऊ या बँकेत?'' मोनिकाने विचारले.

''तू उद्याच जा ना बँकेत तुझ्या आईबरोबर. ती तुला खातं उघडायला मदत करील.'' बाबांनी सांगितले.

बोलता बोलता ते घरी पोहचले. बाबांशी झालेले बोलणे मोनिकाने आईच्या कानावर घातले.

''छान कल्पना आहे, जाऊ या आपण बँकेत; पण खातं उघडण्यासाठी दोन फोटो लागतील ना!'' आई म्हणाली.

''हो बरी आठवण केलीस. ओळखपत्रासाठी मोनिकाचा फोटो काढला होता. त्याच्या दोन प्रती माझ्याकडे आहेत.'' बाबा म्हणाले. बाबांनी कपाटातून काढून त्या प्रती मोनिकाकडे दिल्या.

दुसऱ्या दिवशी मोनिका व तिची आई बँकेत गेल्या. तेथील कारकुनाकडून आईने नवीन खाते उघडण्यासाठी फॉर्म घेतले. फॉर्मवर त्या दिवशीची तारीख लिहिली. मोनिकाचे पूर्ण नाव व पत्ता लिहिला. मोनिकाला फॉर्मवर सही करायला सांगितले.

''ह्या सहीला 'नमुना-सही' म्हणतात.'' आई म्हणाली.

''नमुना सही का करायची असते?'' मोनिकाने विचारले.

''नमुना सही फार महत्त्वाची असते. या सहीवरून बँकेला खातेदाराची ओळख पटते.'' आईने अधिक माहिती दिली. फॉर्मवर फोटो चिकटविण्यासाठी जागा होती. त्या जागेत आईने मोनिकाचा एक फोटो चिकटविला.



# ८. बँक

मोनिका आज खुशीत होती. तिला राज्य पातळीवर आयोजित केलेल्या पर्यावरण विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले होते. बक्षिसाची रक्कम घेऊन घरी येताना तिने बाबांना विचारले, ''बाबा, या पैशाच आपण काय घ्यायचं हो?''

बाबा म्हणाले, ''पैशांचं आपण काही घ्यायचं नाही बाळ.''

''मग काय करू या?'' मोनिकाने विचारले.

''आपण तुझं बँकेत खातं उघडू.'' बाबांनी सांगितले.

''कधी जाऊ या बँकेत?'' मोनिकाने विचारले.

''तू उद्याच जा ना बँकेत तुझ्या आईबरोबर. ती तुला खातं उघडायला मदत करील.'' बाबांनी सांगितले.

बोलता बोलता ते घरी पोहचले. बाबांशी झालेले बोलणे मोनिकाने आईच्या कानावर घातले.

''छान कल्पना आहे, जाऊ या आपण बँकेत; पण खातं उघडण्यासाठी दोन फोटो लागतील ना!'' आई म्हणाली.

''हो बरी आठवण केलीस. ओळखपत्रासाठी मोनिकाचा फोटो काढला होता. त्याच्या दोन प्रती माझ्याकडे आहेत.'' बाबा म्हणाले. बाबांनी कपाटातून काढून त्या प्रती मोनिकाकडे दिल्या.

दुसऱ्या दिवशी मोनिका व तिची आई बँकेत गेल्या. तेथील कारकुनाकडून आईने नवीन खाते उघडण्यासाठी फॉर्म घेतले. फॉर्मवर त्या दिवशीची तारीख लिहिली. मोनिकाचे पूर्ण नाव व पत्ता लिहिला. मोनिकाला फॉर्मवर सही करायला सांगितले.

''ह्या सहीला 'नमुना-सही' म्हणतात.'' आई म्हणाली.

''नमुना सही का करायची असते?'' मोनिकाने विचारले.

''नमुना सही फार महत्त्वाची असते. या सहीवरून बँकेला खातेदाराची ओळख पटते.'' आईने अधिक माहिती दिली. फॉर्मवर फोटो चिकटविण्यासाठी जागा होती. त्या जागेत आईने मोनिकाचा एक फोटो चिकटविला.

२६



''आई, तो दुसरा फोटो कशाला?'' मोनिकाने विचारले.

''पासबुकावर चिकटविण्यासाठी?'' आईने सांगितले.

फॉर्मवर आईने परिचित म्हणून आपलीही सही केली. नंतर पैसे भरण्याच्या फॉर्ममध्ये योग्य ती माहिती लिहिली. पैसे व तो फॉर्म कॅशियरकडे दिला. कॅशियरने पैसे घेतले. फॉर्मवर पैसे पोहोचल्याचा शिक्का मारला. फॉर्मचा एक भाग त्याने मोनिकाच्या आईकडे परत दिला. खाते उघडण्याचा फॉर्म, पैसे भरल्याच्या फॉर्मचा भाग व मोनिकाचा दुसरा फोटो आईने दुसऱ्या कारकुनाकडे दिला. हे सर्व मोनिका लक्षपूर्वक पाहत होती. तिच्याकडे वळून आई म्हणाली, ''पासबुक मिळेपर्यंत आपल्याला थोडा वेळ थांबावं लागेल.''

जवळच्याच खुर्च्यांवर दोघीही बसल्या. ''आई, पैसे काढताना काय करायचं असतं ग?'' मोनिकाने विचारले.

आईने कारकुनाकडून पैसे काढण्यासाठी लागणारा फॉर्म मागून घेतला व तो कसा भरावयाचा याची माहिती दिली आणि सांगितले, ''मोनिका, पैसे काढताना या फॉर्मवर नमुना-सहीप्रमाणेच सही कर हं.''

थोड्या वेळाने कारकुनाने नवीन पासबुक दिले. मोनिका आता या बँकेची खातेदार झाली. आईने पासबुकावर असलेला खातेक्रमांक मोनिकाला दाखविला. यापुढे बँकेचा व्यवहार करताना हा खातेक्रमांक लिहायचा असतो, असे सांगितले.





''आई, तो दुसरा फोटो कशाला?'' मोनिकाने विचारले.

''पासबुकावर चिकटविण्यासाठी?'' आईने सांगितले.

फॉर्मवर आईने परिचित म्हणून आपलीही सही केली. नंतर पैसे भरण्याच्या फॉर्ममध्ये योग्य ती माहिती लिहिली. पैसे व तो फॉर्म कॅशियरकडे दिला. कॅशियरने पैसे घेतले. फॉर्मवर पैसे पोहोचल्याचा शिक्का मारला. फॉर्मचा एक भाग त्याने मोनिकाच्या आईकडे परत दिला. खाते उघडण्याचा फॉर्म, पैसे भरल्याच्या फॉर्मचा भाग व मोनिकाचा दुसरा फोटो आईने दुसऱ्या कारकुनाकडे दिला. हे सर्व मोनिका लक्षपूर्वक पाहत होती. तिच्याकडे वळून आई म्हणाली, ''पासबुक मिळेपर्यंत आपल्याला थोडा वेळ थांबावं लागेल.''

जवळच्याच खुर्च्यांवर दोघीही बसल्या. ''आई, पैसे काढताना काय करायचं असतं ग?'' मोनिकाने विचारले.

आईने कारकुनाकडून पैसे काढण्यासाठी लागणारा फॉर्म मागून घेतला व तो कसा भरावयाचा याची माहिती दिली आणि सांगितले, ''मोनिका, पैसे काढताना या फॉर्मवर नमुना-सहीप्रमाणेच सही कर हं.''

थोड्या वेळाने कारकुनाने नवीन पासबुक दिले. मोनिका आता या बँकेची खातेदार झाली. आईने पासबुकावर असलेला खातेक्रमांक मोनिकाला दाखविला. यापुढे बँकेचा व्यवहार करताना हा खातेक्रमांक लिहायचा असतो, असे सांगितले.

२७

आपले पासबुक घेऊन मोनिका आईबरोबर आनंदाने घरी परतली.

---

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) मोनिका खुश का होती?
२) मोनिकाला मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेचे काय करायचे ठरले?
३) बाबांनी मोनिकाला फोटोच्या प्रती का दिल्या?
४) मोनिकाच्या आईने फॉर्मवर सही का केली?

**प्रश्न २ : खालील दिलेल्या प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) नमुना सहीबाबत आईने मोनिकाला कोणती माहिती दिली?
२) मोनिकाच्या आईने फॉर्म भरून दिल्यावर कॅशियरने काय काय केले?

**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) दिनेश नि सुरेश शाळेत निघाले.
२) विमलने आंबे व केळी घेतली.
३) सुनिता आपल्या मैत्रिणीकडे निघाली पण तिला बस चुकल्याने माघारी परतावे लागले.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द दोन किंवा दोन वाक्ये जोडतात. अशा शब्दांना 'उभयान्वयी अव्यय' असे म्हणतात. अव्यये अविकारी असतात.

**उभयान्वयी अव्ययाची काही उदाहरणे :**

आणि, परंतु, जर-तरं, तथापि, किंवा, म्हणून, अन्, की, कारण, अथवा, सबब.

**व्यवसाय**

उभयान्वयी अव्यय असलेली या पाठातील वाक्ये शोधून लिहा व त्या वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.

**उपक्रम**

नजिकच्या बँकेला भेट द्या. खात्यात पैसे भरण्यासाठी लागणारा फॉर्म घेऊन तो व्यवस्थित लिहा व तो भरलेला फॉर्म शिक्षकांकडून तपासून घ्या.

●●●



आपले पासबुक घेऊन मोनिका आईबरोबर आनंदाने घरी परतली.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) मोनिका खुश का होती?
२) मोनिकाला मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेचे काय करायचे ठरले?
३) बाबांनी मोनिकाला फोटोच्या प्रती का दिल्या?
४) मोनिकाच्या आईने फॉर्मवर सही का केली?

**प्रश्न २ : खालील दिलेल्या प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) नमुना सहीबाबत आईने मोनिकाला कोणती माहिती दिली?
२) मोनिकाच्या आईने फॉर्म भरून दिल्यावर कॅशियरने काय काय केले?

**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) दिनेश नि सुरेश शाळेत निघाले.
२) विमलने आंबे व केळी घेतली.
३) सुनिता आपल्या मैत्रिणीकडे निघाली पण तिला बस चुकल्याने माघारी परतावे लागले.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द दोन किंवा दोन वाक्ये जोडतात. अशा शब्दांना 'उभयान्वयी अव्यय' असे म्हणतात. अव्यये अविकारी असतात.

**उभयान्वयी अव्ययाची काही उदाहरणे :**

आणि, परंतु, जर-तरं, तथापि, किंवा, म्हणून, अन्, की, कारण, अथवा, सबब.

**व्यवसाय**

उभयान्वयी अव्यय असलेली या पाठातील वाक्ये शोधून लिहा व त्या वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.

**उपक्रम**

नजिकच्या बँकेला भेट द्या. खात्यात पैसे भरण्यासाठी लागणारा फॉर्म घेऊन तो व्यवस्थित लिहा व तो भरलेला फॉर्म शिक्षकांकडून तपासून घ्या.

●●●

२८

# ९. चित्रकार दलाल



दीनाने एक चित्र हळूच दप्तरातून काढले अन् दामूच्या हातात ठेवले. दामू कौतुकाने पाहू लागला.

“अरे, हे तर आपले मुख्याध्यापक! तू काढलंस हे चित्र? छान आहे हं!” दामू उद्गारला नि लगेच पुढे म्हणाला, “आपण हे चित्र वर्गशिक्षकांना दाखवू. चालेल ना?” दीना कां-कू करू लागला.

तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली. प्रार्थनेनंतर वर्गशिक्षक वर्गात आले. दामू हळूच त्यांच्याजवळ गेला. “सर, दीनानाथनं काढलंय हे चित्र!” चित्र दाखवित दामूने सांगितले.

शिक्षकांनी काही क्षण ते चित्र न्याहाळले आणि म्हटले, “फारच छान, शाबास दीनानाथ!” दीनाला हायसे वाटले.

शाळा सुटायची वेळ झाली होती. मुख्याध्यापकांनी दीनाला बोलाविल्याचा निरोप घेऊन शाळेचा शिपाई आला. दीना भीतभीतच मुख्याध्यापकांकडे गेला. “तुझा वडिलांना उद्या मला भेटायला सांग.” मुख्याध्यापकांनी दीनाला सांगितले.



९. चित्रकार दलाल



दीनाने एक चित्र हळूच दप्तरातून काढले अन् दामूच्या हातात ठेवले. दामू कौतुकाने पाहू लागला.

“अरे, हे तर आपले मुख्याध्यापक! तू काढलंस हे चित्र? छान आहे हं!” दामू उद्गारला नि लगेच पुढे म्हणाला, “आपण हे चित्र वर्गशिक्षकांना दाखवू. चालेल ना?” दीना कां-कू करू लागला.

तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली. प्रार्थनेनंतर वर्गशिक्षक वर्गात आले. दामू हळूच त्यांच्याजवळ गेला. “सर, दीनानाथनं काढलंय हे चित्र!” चित्र दाखवित दामूने सांगितले.

शिक्षकांनी काही क्षण ते चित्र न्याहाळले आणि म्हटले, “फारच छान, शाबास दीनानाथ!” दीनाला हायसे वाटले.

शाळा सुटायची वेळ झाली होती. मुख्याध्यापकांनी दीनाला बोलाविल्याचा निरोप घेऊन शाळेचा शिपाई आला. दीना भीतभीतच मुख्याध्यापकांकडे गेला. “तुझा वडिलांना उद्या मला भेटायला सांग.” मुख्याध्यापकांनी दीनाला सांगितले.

मुख्याध्यापकांनी बाबांना का बरे बोलावले असेल? आपले मुख्याध्यापक बाबांकडे कोणती तक्रार करणार कुणास ठाऊक, वर्गशिक्षकांनी ते चित्र मुख्याध्यापकांना दाखवले की काय? आपले चित्र पाहून त्यांना राग तर आला नसेल? वर्गशिक्षकांनी तर आपणास त्या चित्राबद्दल शाबासकी दिली. दीनाच्या मनात विचारचक्र सुरू झाले.

दुसऱ्या दिवशी दीनाचे वडील मुख्याध्यापकांना भेटले. मुख्याध्यापकांनी दीनाच्या चित्रकलेची प्रशंसा केली. त्याच्या या कलागुणांकडे अधिक लक्ष द्यायला सांगितले. तसेच चित्रकलेचे पुढील शिक्षण घेण्यासाठी दीनाला मुंबईला पाठविण्यास सुचविले.

दीना शाळेतून घरी गेल्यावर वडिलांकडून त्याला सारे समजले. त्याच्या मनातील भीती दूर झाली.

पुढे दीना पोर्तुगीज फायनल परीक्षा उत्तीर्ण झाला. त्यानंतर तो पुढील शिक्षणाकरिता मुंबईला गेला. तेथे नोकरी करत त्याने आपले पुढील शिक्षण पूर्ण केले. वेळ फुकट घालविणे त्याला आवडत नसे. फावल्या वेळेत तो चित्रे काढीत असे.

त्याने काढलेली चित्रे वेगवेगळ्या नियतकालिकांतून येऊ लागली. ती लोकांना आवडू लागली. थोड्याच काळात लोक दीनाला 'चित्रकार दीनानाथ दलाल' या नावाने ओळखू लागले.

या प्रसिद्ध चित्रकाराचा जन्म गोव्यातील मडगाव शहरात झाला. ३० मे १९१६ हा त्यांचा जन्मदिन. बालपणापासूनच त्यांना चित्रकलेची आवड होती. सुंदर सुंदर चित्रे काढून ते सर्वांकडून शाबासकी मिळवित.

गोव्यातील निसर्ग, मंदिरे, चर्चेस हे त्यांच्या चित्रांचे प्रमुख विषय असत. ऐतिहासिक व पौराणिक प्रसंगांवरही त्यांनी आकर्षक चित्रे रेखाटली. ती चित्रे दिनानाथ अशा कौशल्याने रेखाटत की पाहणाऱ्याला त्यातील व्यक्ती जिवंत वाटत असत. अनेक प्रसिद्ध लेखक आपल्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांकरिता दलालांच्याच चित्रांचा आग्रह धरीत. त्यांनी रेखाटलेल्या मनोवेधक चित्रांनी कित्येक दिवाळी अंक सजत. दिनदर्शिकांवरही त्यांचीच चित्रे असत. ही चित्रे लोकांना एवढी आवडत की लोक ती चौकटीत घालून भिंतीवर टांगीत. अशाप्रकारे त्यांना चित्रकलेच्या जगतात मोठी कीर्ती व मान मिळाला.

आपली कला त्यांनी नवीन चित्रकारांना आवडीने शिकविली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अनेक नवे चित्रकार नावारूपाला आले.

या महान चित्रकाराला 'इंडियन ॲकॅडमी ऑफ फाईन आर्ट' या संस्थेतर्फे सुवर्णपदक बहाल करून गौरविण्यात आले. वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी १५ जानेवारी १९७१ रोजी चित्रकार दलाल यांचे निधन झाले.



मुख्याध्यापकांनी बाबांना का बरे बोलावले असेल? आपले मुख्याध्यापक बाबांकडे कोणती तक्रार करणार कुणास ठाऊक, वर्गशिक्षकांनी ते चित्र मुख्याध्यापकांना दाखवले की काय? आपले चित्र पाहून त्यांना राग तर आला नसेल? वर्गशिक्षकांनी तर आपणास त्या चित्राबद्दल शाबासकी दिली. दीनाच्या मनात विचारचक्र सुरू झाले.

दुसऱ्या दिवशी दीनाचे वडील मुख्याध्यापकांना भेटले. मुख्याध्यापकांनी दीनाच्या चित्रकलेची प्रशंसा केली. त्याच्या या कलागुणांकडे अधिक लक्ष द्यायला सांगितले. तसेच चित्रकलेचे पुढील शिक्षण घेण्यासाठी दीनाला मुंबईला पाठविण्यास सुचविले.

दीना शाळेतून घरी गेल्यावर वडिलांकडून त्याला सारे समजले. त्याच्या मनातील भीती दूर झाली.

पुढे दीना पोर्तुगीज फायनल परीक्षा उत्तीर्ण झाला. त्यानंतर तो पुढील शिक्षणाकरिता मुंबईला गेला. तेथे नोकरी करत त्याने आपले पुढील शिक्षण पूर्ण केले. वेळ फुकट घालविणे त्याला आवडत नसे. फावल्या वेळेत तो चित्रे काढीत असे.

त्याने काढलेली चित्रे वेगवेगळ्या नियतकालिकांतून येऊ लागली. ती लोकांना आवडू लागली. थोड्याच काळात लोक दीनाला 'चित्रकार दीनानाथ दलाल' या नावाने ओळखू लागले.

या प्रसिद्ध चित्रकाराचा जन्म गोव्यातील मडगाव शहरात झाला. ३० मे १९१६ हा त्यांचा जन्मदिन. बालपणापासूनच त्यांना चित्रकलेची आवड होती. सुंदर सुंदर चित्रे काढून ते सर्वांकडून शाबासकी मिळवित.

गोव्यातील निसर्ग, मंदिरे, चर्चेस हे त्यांच्या चित्रांचे प्रमुख विषय असत. ऐतिहासिक व पौराणिक प्रसंगांवरही त्यांनी आकर्षक चित्रे रेखाटली. ती चित्रे दिनानाथ अशा कौशल्याने रेखाटत की पाहणाऱ्याला त्यातील व्यक्ती जिवंत वाटत असत. अनेक प्रसिद्ध लेखक आपल्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांकरिता दलालांच्याच चित्रांचा आग्रह धरीत. त्यांनी रेखाटलेल्या मनोवेधक चित्रांनी कित्येक दिवाळी अंक सजत. दिनदर्शिकांवरही त्यांचीच चित्रे असत. ही चित्रे लोकांना एवढी आवडत की लोक ती चौकटीत घालून भिंतीवर टांगीत. अशाप्रकारे त्यांना चित्रकलेच्या जगतात मोठी कीर्ती व मान मिळाला.

आपली कला त्यांनी नवीन चित्रकारांना आवडीने शिकविली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अनेक नवे चित्रकार नावारूपाला आले.

या महान चित्रकाराला 'इंडियन ॲकॅडमी ऑफ फाईन आर्ट' या संस्थेतर्फे सुवर्णपदक बहाल करून गौरविण्यात आले. वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी १५ जानेवारी १९७१ रोजी चित्रकार दलाल यांचे निधन झाले.

३०

**शब्दार्थ**

**न्याहाळणे–** निरखणे

**वाक्प्रचार**

**का कू करणे–** टाळाटाळ करणे
**नावारुपाला येणे –** प्रसिद्धीला येणे

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) चित्र दाखवित दामूने वर्गशिक्षकांना काय सांगितले?
२) मुख्याध्यापकांनी दीनाच्या वडिलांना काय सुचविले?
३) दीनानाथ दलालांचा जन्म कोणत्या शहरात झाला?
४) दलालांनी काढलेली चित्रे लोकांना का आवडत असत?
५) दलालांचा कोणत्या संस्थेतर्फे गौरव करण्यात आला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) मुख्याध्यापकांचा निरोप ऐकून दीनाच्या मनात कोणते विचार आले?
२) दीनानाथ दलाल कोणकोणत्या विषयावर चित्रे काढीत?
३) दलालांनी काढलेल्या चित्रांचा कोणकोणत्या कारणासाठी वापर होत असे?

**व्यवसाय**

**१. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचा काळ बदलून लिहा.**

(क) विद्याधर अभ्यास करतो. (भूतकाळ)
(ख) सहलीची बस शाळेजवळ आली. (भविष्यकाळ)
(ग) अमिताने उंच उडी मारली. (वर्तमानकाळ)
(घ) कायतान लाडूचा डबा फळीवर ठेवेल. (भूतकाळ)
(च) मी गाणे गाते. (भविष्यकाळ)
(छ) हत्तीने सोंडेने मुजरा केला. (वर्तमानकाळ)

**उपक्रम**

काही प्रसिद्ध खेळाडूंची चित्रे जमवून त्यांच्या नावांची यादी तयार करा.

●●●



**शब्दार्थ**

**न्याहाळणे–** निरखणे

**वाक्प्रचार**

**का कू करणे–** टाळाटाळ करणे
**नावारुपाला येणे –** प्रसिद्धीला येणे

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) चित्र दाखवित दामूने वर्गशिक्षकांना काय सांगितले?
२) मुख्याध्यापकांनी दीनाच्या वडिलांना काय सुचविले?
३) दीनानाथ दलालांचा जन्म कोणत्या शहरात झाला?
४) दलालांनी काढलेली चित्रे लोकांना का आवडत असत?
५) दलालांचा कोणत्या संस्थेतर्फे गौरव करण्यात आला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) मुख्याध्यापकांचा निरोप ऐकून दीनाच्या मनात कोणते विचार आले?
२) दीनानाथ दलाल कोणकोणत्या विषयावर चित्रे काढीत?
३) दलालांनी काढलेल्या चित्रांचा कोणकोणत्या कारणासाठी वापर होत असे?

**व्यवसाय**

**१. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचा काळ बदलून लिहा.**

(क) विद्याधर अभ्यास करतो. (भूतकाळ)
(ख) सहलीची बस शाळेजवळ आली. (भविष्यकाळ)
(ग) अमिताने उंच उडी मारली. (वर्तमानकाळ)
(घ) कायतान लाडूचा डबा फळीवर ठेवेल. (भूतकाळ)
(च) मी गाणे गाते. (भविष्यकाळ)
(छ) हत्तीने सोंडेने मुजरा केला. (वर्तमानकाळ)

**उपक्रम**

काही प्रसिद्ध खेळाडूंची चित्रे जमवून त्यांच्या नावांची यादी तयार करा.

●●●

३१

# १०. हिरवी स्वप्ने आकारू

सुजला सुफला या मातीतून हिरवी स्वप्ने आकारू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

वृक्ष आमुचे सगे सोयरे फुला-फळांचे शेजारी
वरकरणी वागणे कधीही नसे दिखावू बाजारी
फुलत राहुनी फुलवत जाती असे सोबती जवळ करू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

वृक्षापोटी याच आमुचे उभे राहते घरदार
खांद्यावरती यांच्या होतो खोपा सुंदर साकार
उपयोगाला आमुच्या होतो या वृक्षाचा जन्म सुरू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

प्रत्येकाच्या हाताहाताने वृक्ष उद्याचे लावू या
आज पेरल्या बीजापोटी फळे गोमटी पाहू या
वृक्ष वाढवूं, गगना भिडवू, वृक्षाचे जीवन तारू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

●●●




# १०. हिरवी स्वप्ने आकारू

सुजला सुफला या मातीतून हिरवी स्वप्ने आकारू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

वृक्ष आमुचे सगे सोयरे फुला-फळांचे शेजारी
वरकरणी वागणे कधीही नसे दिखावू बाजारी
फुलत राहुनी फुलवत जाती असे सोबती जवळ करू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

वृक्षापोटी याच आमुचे उभे राहते घरदार
खांद्यावरती यांच्या होतो खोपा सुंदर साकार
उपयोगाला आमुच्या होतो या वृक्षाचा जन्म सुरू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

प्रत्येकाच्या हाताहाताने वृक्ष उद्याचे लावू या
आज पेरल्या बीजापोटी फळे गोमटी पाहू या
वृक्ष वाढवूं, गगना भिडवू, वृक्षाचे जीवन तारू
वृक्ष आमुची छाया माया वृक्ष आमुचा कल्पतरू

●●●

३२

# ११. शर्थीची झुंज

आपला भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर थोडे दिवस लोटतात न लोटतात तोच पाकिस्तानी फौजांनी काश्मीरवर आक्रमण केले. काश्मीरची राजधानी श्रीनगर, चारही बाजूंनी आक्रमक श्रीनगरच्या रोखाने पुढे येऊ लागले. श्रीनगर जिंकले की सारे काश्मीर शत्रूच्या ताब्यात जाणार होते. भारतीय सैनिकांनी शत्रूला श्रीनगरच्या वेशीवर थोपवून धरले. सैनिकांची पुरेशी जमवाजमव झाल्यावर भारतीय फौजांनी शत्रूवर प्रतिहल्ले करण्यास सुरुवात केली.

या प्रतिहल्ल्यात भारतीय फौज नौशेराहून राजोरीकडे आगेकूच करू लागली. मुलूख डोंगराळ होता. रस्ता घाटातून जात होता. घाट ओलांडल्यावर पलीकडे मैदान होते. या मैदानावर पाकिस्तानी फौजांचा निःपात करण्याचा बेत भारतीय अधिकाऱ्यांनी आखला. सशस्त्र रणगाड्यांचे पथक सज्ज ठेवले.

घाट ओलांडून जाणे फारच जिकिरीचे काम होते. एकदा घाटातून भारतीय रणगाडे पुढे आले की, आपली पीछेहाट होणार हे पाकिस्तानी फौजांनी ओळखले. त्यांनी या डोंगरातील अवघड रस्त्यावर अनेक ठिकाणी सुरूंग पेरले. रस्त्यावर झाडे तोडून अडथळे निर्माण केले. मोक्याच्या ठिकाणी उखळी तोफा व मशिनगन्स बसविल्या.

ही योजना भारतीय अधिकाऱ्यांच्या लक्षात आली. रस्त्यातील अडथळे व सुरुंग यामुळे रणगाडे डोंगर ओलांडू शकत नव्हते. याकरिता रस्ता मोकळा करणे आवश्यक होते. सुरुंग निकामी करण्यासाठी खास तज्ज्ञांची आवश्यकता होती. हे काम बॉम्बे इंजिनिअर ग्रुपच्या एका पथकाकडे सोपविण्यात आले. या पथकाचे नेतृत्व सेकंड लेफ्टनंट रामा राघोबा राणे यांच्याकडे होते.

रस्त्यातील सुरुंग काढून रणगाड्यांना पुढे जाऊ देणे आवश्यक होते. सुरुंग काढण्याचे काम अतिशय अवघड असते. हे काम जिवावर उदार होऊनच करावे लागते. सुरुंग उडण्याची तर भीती असतेच; पण त्याचवेळी सुरुंग काढणाऱ्यांवर शत्रूकडून गोळीबारही होत असतो. सर्व सुरुंग एकाच तऱ्हेचे नसतात. त्यांचे अनेक प्रकार असतात. काही सुरुंग नुसत्या धक्क्यानेच उडतात. सुरुंगाचा प्रकार कळल्याशिवाय सुरुंग काढणे अत्यंत धोक्याचे असते. थोडीशी जरी चूक झाली तरी सुरुंग काढणारा जखमी किंवा ठार होऊ शकतो. सुरुंग शोधून काढून ते निकामी करून टाकल्याशिवाय रणगाडे पुढे जाणे शक्यच नव्हते. हे जोखमीचे काम रामा राघोबा राणे यांनी आपल्याकडे घेतले.



# ११. शर्थीची झुंज

आपला भारत देश १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर थोडे दिवस लोटतात न लोटतात तोच पाकिस्तानी फौजांनी काश्मीरवर आक्रमण केले. काश्मीरची राजधानी श्रीनगर, चारही बाजूंनी आक्रमक श्रीनगरच्या रोखाने पुढे येऊ लागले. श्रीनगर जिंकले की सारे काश्मीर शत्रूच्या ताब्यात जाणार होते. भारतीय सैनिकांनी शत्रूला श्रीनगरच्या वेशीवर थोपवून धरले. सैनिकांची पुरेशी जमवाजमव झाल्यावर भारतीय फौजांनी शत्रूवर प्रतिहल्ले करण्यास सुरुवात केली.


या प्रतिहल्ल्यात भारतीय फौज नौशेराहून राजोरीकडे आगेकूच करू लागली. मुलूख डोंगराळ होता. रस्ता घाटातून जात होता. घाट ओलांडल्यावर पलीकडे मैदान होते. या मैदानावर पाकिस्तानी फौजांचा निःपात करण्याचा बेत भारतीय अधिकाऱ्यांनी आखला. सशस्त्र रणगाड्यांचे पथक सज्ज ठेवले.

घाट ओलांडून जाणे फारच जिकिरीचे काम होते. एकदा घाटातून भारतीय रणगाडे पुढे आले की, आपली पीछेहाट होणार हे पाकिस्तानी फौजांनी ओळखले. त्यांनी या डोंगरातील अवघड रस्त्यावर अनेक ठिकाणी सुरूंग पेरले. रस्त्यावर झाडे तोडून अडथळे निर्माण केले. मोक्याच्या ठिकाणी उखळी तोफा व मशिनगन्स बसविल्या.

ही योजना भारतीय अधिकाऱ्यांच्या लक्षात आली. रस्त्यातील अडथळे व सुरुंग यामुळे रणगाडे डोंगर ओलांडू शकत नव्हते. याकरिता रस्ता मोकळा करणे आवश्यक होते. सुरुंग निकामी करण्यासाठी खास तज्ज्ञांची आवश्यकता होती. हे काम बॉम्बे इंजिनिअर ग्रुपच्या एका पथकाकडे सोपविण्यात आले. या पथकाचे नेतृत्व सेकंड लेफ्टनंट रामा राघोबा राणे यांच्याकडे होते.

रस्त्यातील सुरुंग काढून रणगाड्यांना पुढे जाऊ देणे आवश्यक होते. सुरुंग काढण्याचे काम अतिशय अवघड असते. हे काम जिवावर उदार होऊनच करावे लागते. सुरुंग उडण्याची तर भीती असतेच; पण त्याचवेळी सुरुंग काढणाऱ्यांवर शत्रूकडून गोळीबारही होत असतो. सर्व सुरुंग एकाच तऱ्हेचे नसतात. त्यांचे अनेक प्रकार असतात. काही सुरुंग नुसत्या धक्क्यानेच उडतात. सुरुंगाचा प्रकार कळल्याशिवाय सुरुंग काढणे अत्यंत धोक्याचे असते. थोडीशी जरी चूक झाली तरी सुरुंग काढणारा जखमी किंवा ठार होऊ शकतो. सुरुंग शोधून काढून ते निकामी करून टाकल्याशिवाय रणगाडे पुढे जाणे शक्यच नव्हते. हे जोखमीचे काम रामा राघोबा राणे यांनी आपल्याकडे घेतले.


३३



काही सैनिकांना बाजूच्या उतारावर पाठवून त्यांच्याकडे गोळीबाराला प्रत्युत्तर देण्याचे व शत्रूचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचे काम राणे यांनी दिले. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. धडाड् धूम-टट-टट-तड-तड-धुम धुम! राणे यांच्या दिशेनेही गोळ्यांचा मारा चालू होता. तोफांचे गोळे आजूबाजूस फुटत होते; पण राणे गांगरले नाहीत, बावरले नाहीत की भेदरले नाहीत. त्यांनी सावधगिरीने सुरुंग काढण्याचे काम चालूच ठेवले. कोणत्याही क्षणी ते स्वतःच बळी पडण्याचा धोका होता. जसजसे राणे सुरुंग निकामी करीत पुढे जाऊ लागले तसतसे मागील रणगाडे पुढे सरकू लागले.

एके ठिकाणी रस्त्यावर प्रचंड झाडे आडवी टाकली होती. झाडांच्या भोवती शत्रूने सुरुंग पेरून ठेवलेले असणारच अशी राणे यांना खात्री होती. झाडाभोवती असलेले सुरुंग राणे यांनी वेचून काढून निकामी केले. इतक्यात त्यांच्या उजव्या बाजूस तोफेचा एक गोळा फुटला. राणे थोडक्यात बचावले. अद्याप बराच मार्ग मोकळा करावयाचा होता. रस्त्यावरील प्रचंड झाडे बाजूस करणे आवश्यक होते. मशिनगन्स व उखळी तोफांचा मारा चालूच होता. तशातही त्यांच्या पथकाने ती झाडे दोर व साखळदंड बांधून बाजूस हटविली.





काही सैनिकांना बाजूच्या उतारावर पाठवून त्यांच्याकडे गोळीबाराला प्रत्युत्तर देण्याचे व शत्रूचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचे काम राणे यांनी दिले. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. धडाड् धूम-टट-टट-तड-तड-धुम धुम! राणे यांच्या दिशेनेही गोळ्यांचा मारा चालू होता. तोफांचे गोळे आजूबाजूस फुटत होते; पण राणे गांगरले नाहीत, बावरले नाहीत की भेदरले नाहीत. त्यांनी सावधगिरीने सुरुंग काढण्याचे काम चालूच ठेवले. कोणत्याही क्षणी ते स्वतःच बळी पडण्याचा धोका होता. जसजसे राणे सुरुंग निकामी करीत पुढे जाऊ लागले तसतसे मागील रणगाडे पुढे सरकू लागले.

एके ठिकाणी रस्त्यावर प्रचंड झाडे आडवी टाकली होती. झाडांच्या भोवती शत्रूने सुरुंग पेरून ठेवलेले असणारच अशी राणे यांना खात्री होती. झाडाभोवती असलेले सुरुंग राणे यांनी वेचून काढून निकामी केले. इतक्यात त्यांच्या उजव्या बाजूस तोफेचा एक गोळा फुटला. राणे थोडक्यात बचावले. अद्याप बराच मार्ग मोकळा करावयाचा होता. रस्त्यावरील प्रचंड झाडे बाजूस करणे आवश्यक होते. मशिनगन्स व उखळी तोफांचा मारा चालूच होता. तशातही त्यांच्या पथकाने ती झाडे दोर व साखळदंड बांधून बाजूस हटविली.

३४

आता घाटातील मार्ग बराचसा मोकळा झाला होता. सर्व सुरुंगक्षेत्र मोकळे झाले होते. राणे यांनी रणगाड्यांच्या पथकाला पुढे येण्याची खूण केली. क्षणाचाही विलंब न करता रणगाड्यांचे पथक व सैनिकांच्या तुकड्या मैदानात आल्या. भारतीय रणगाड्यांनी शत्रूवर जोरदार हल्ला केला. भारतीय रणगाड्यांपुढे पाकिस्तानी सैन्याचा निभाव लागला नाही. पाकिस्तानी फौजांनी माघार घेतली. भारतीय सेनेचा विजय झाला.

सतत दहा तास तहान–भूक विसरून राणेंनी सुरुंग निकामी करण्याचे काम केले होते. आता त्यांना शारीरिक वेदना जाणवू लागल्या. पण चेहऱ्यावर मात्र कामगिरी यशस्वी झाल्याचे समाधान झळकत होते. से. ले. रामा राघोबा राणे यांच्या या असामान्य शौर्याबद्दल भारत सरकारने त्यांना 'परमवीरचक्र' हे अत्युच्च शौर्यपदक बहाल केले.

**शब्दार्थ**

**आक्रमण–** हल्ला, **फौज–** सैन्य, **आगेकूच करणे –** पुढे जाणे, **नि:पात करणे –** संपूर्ण नाश करणे, **पथक–** तुकडी, **जोखमीचे काम–** जबाबदारीचे काम, **उखळी तोफा–** तोफांचा एक प्रकार, **परमवीरचक्र–** युद्धातील असामान्य पराक्रमाकरिता भारत सरकारकडून सैनिकांना दिले जाणारे अत्युच्च असे सन्मानदर्शक शौर्यपदक.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) भारतीय सैनिकांनी शत्रूला कोठे थोपवून धरले होते?
२) रणगाडे डोंगरावरून नेणे अवघड का होते?
३) सुरुंग निकामी करण्याचे काम कोणत्या पथकाकडे देण्यात आले?
४) से. ले. राणे यांनी स्वत:कडे कोणते काम घेतले?
५) भारत सरकारने से. ले. राणे यांचा गौरव कसा केला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) भारतीय फौज घाट ओलांडू नये यासाठी पाकिस्तानी सैनिकांनी कोणते अडथळे केले?
२) सुरुंग काढण्याचे काम अवघड का असते?
३) से. ले. राणे यांच्या कामगिरीचे वर्णन करा.

**उपक्रम**

युद्धात विविध शौर्यपदके मिळविलेल्या वीरांच्या नावांची यादी करा.



आता घाटातील मार्ग बराचसा मोकळा झाला होता. सर्व सुरुंगक्षेत्र मोकळे झाले होते. राणे यांनी रणगाड्यांच्या पथकाला पुढे येण्याची खूण केली. क्षणाचाही विलंब न करता रणगाड्यांचे पथक व सैनिकांच्या तुकड्या मैदानात आल्या. भारतीय रणगाड्यांनी शत्रूवर जोरदार हल्ला केला. भारतीय रणगाड्यांपुढे पाकिस्तानी सैन्याचा निभाव लागला नाही. पाकिस्तानी फौजांनी माघार घेतली. भारतीय सेनेचा विजय झाला.

सतत दहा तास तहान–भूक विसरून राणेंनी सुरुंग निकामी करण्याचे काम केले होते. आता त्यांना शारीरिक वेदना जाणवू लागल्या. पण चेहऱ्यावर मात्र कामगिरी यशस्वी झाल्याचे समाधान झळकत होते. से. ले. रामा राघोबा राणे यांच्या या असामान्य शौर्याबद्दल भारत सरकारने त्यांना 'परमवीरचक्र' हे अत्युच्च शौर्यपदक बहाल केले.

**शब्दार्थ**

**आक्रमण–** हल्ला, **फौज–** सैन्य, **आगेकूच करणे –** पुढे जाणे, **नि:पात करणे –** संपूर्ण नाश करणे, **पथक–** तुकडी, **जोखमीचे काम–** जबाबदारीचे काम, **उखळी तोफा–** तोफांचा एक प्रकार, **परमवीरचक्र–** युद्धातील असामान्य पराक्रमाकरिता भारत सरकारकडून सैनिकांना दिले जाणारे अत्युच्च असे सन्मानदर्शक शौर्यपदक.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) भारतीय सैनिकांनी शत्रूला कोठे थोपवून धरले होते?
२) रणगाडे डोंगरावरून नेणे अवघड का होते?
३) सुरुंग निकामी करण्याचे काम कोणत्या पथकाकडे देण्यात आले?
४) से. ले. राणे यांनी स्वत:कडे कोणते काम घेतले?
५) भारत सरकारने से. ले. राणे यांचा गौरव कसा केला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) भारतीय फौज घाट ओलांडू नये यासाठी पाकिस्तानी सैनिकांनी कोणते अडथळे केले?
२) सुरुंग काढण्याचे काम अवघड का असते?
३) से. ले. राणे यांच्या कामगिरीचे वर्णन करा.

**उपक्रम**

युद्धात विविध शौर्यपदके मिळविलेल्या वीरांच्या नावांची यादी करा.

३५

**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) मुले क्रीडांगणावर खेळत आहेत.

२) आमच्या शाळेसमोर रस्ता आहे.

३) परीक्षेनंतर मी गावी जाईन.

४) झाडाखाली कुत्रा बसला होता.

५) लोक गाडीकडे चालले होते.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द स्वतंत्र असे लिहिले नसून ते अनुक्रमे क्रीडांगण, शाळा, परीक्षा, झाड, गाडी या शब्दांना जोडून आले आहेत. अशा जोडून येणाऱ्या शब्दाला 'शब्दयोगी अव्यय' असे म्हणतात.

**शब्दयोगी अव्ययाची काही उदाहरणे.**

मागे, पुढे, साठी, करिता, जवळ, पासून, पूर्वी, बरोबर.

**व्यवसाय**

**खालील अव्ययांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य लिहा.**

पूर्वी, मागे, पासून, साठी, खाली, वर, समोर.

●●●



**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) मुले क्रीडांगणावर खेळत आहेत.

२) आमच्या शाळेसमोर रस्ता आहे.

३) परीक्षेनंतर मी गावी जाईन.

४) झाडाखाली कुत्रा बसला होता.

५) लोक गाडीकडे चालले होते.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द स्वतंत्र असे लिहिले नसून ते अनुक्रमे क्रीडांगण, शाळा, परीक्षा, झाड, गाडी या शब्दांना जोडून आले आहेत. अशा जोडून येणाऱ्या शब्दाला 'शब्दयोगी अव्यय' असे म्हणतात.

**शब्दयोगी अव्ययाची काही उदाहरणे.**

मागे, पुढे, साठी, करिता, जवळ, पासून, पूर्वी, बरोबर.

**व्यवसाय**

**खालील अव्ययांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य लिहा.**

पूर्वी, मागे, पासून, साठी, खाली, वर, समोर.

●●●

३६

# १२. बांबूकाम

‘‘छान! किती सुंदर!’’ दादाला त्यांच्या मित्राकडून भेट मिळालेल्या झुंबराकडे पाहत दीपक म्हणाला.

‘‘दादा, कशाचं बनवले रे झुंबर?’’ दीपकने विचारले. ‘‘बांबूचं! माझ्या मित्रानं राघवनं स्वतः बनवलं तें. बांबूपासून तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू बनवता येतात त्याला. त्या कामात तो अगदी पटाईत आहे.’’ दादाने सांगितले.

‘‘मग बरंच झालं तर! तो वस्तू कशा बनवतो ते पाहायचंय मला. मला नेशील त्याच्याकडं?’’ दीपकने विचारले. ‘‘हो. येत्या रविवारी जाऊ. आम्ही येणार असल्याचं आजच कळवतो त्याला.’’ दादाने सांगितले.

दीपकला बरोबर घेऊन दादा रविवारी सकाळी राघवकडे गेला. राघव अंगणातच होता.

‘‘या, मी तुमचीच वाट पाहत होतो.’’ राघवने दोघांचेही स्वागत केले.

‘‘राघव, हा माझा धाकटा भाऊ दीपक. तुझी कला पाहण्यासाठी आला आहे.’’ दादाने दीपकची ओळख करून दिली.

‘‘फक्त पहायची नाही काही. माहिती पण मिळवायची आहे. आणि जमलंच तर शिकायची पण आहे.’’ दीपक घाईघाईत म्हणाला.

‘‘अरे हो. पण एवढी घाई कशाला? आधी न्याहारी करू आणि मग सगळं कांही आरामात पाहू.’’ असे म्हणत राघवने त्याला घरात नेले.

राघवच्या आईने न्याहारीचे गरम गरम पदार्थ आणले. सर्वांनी आवडीने खाल्ले. नंतर ते घराच्या बाजूला असलेल्या झोपडीत गेले. तेथे बांबू ठेवलेले होते. काही वस्तू अर्धवट विणलेल्या होत्या. एका कोपऱ्यात पांढऱ्या पातळ पट्ट्यांचा भारा बांधून ठेवला होता.

‘‘या पट्ट्या कशासाठी आणल्या आहेत?’’ दीपकने विचारले.

‘‘त्या आणल्या नाहीत. आम्हीच तयार केल्या. त्यांना बेळं म्हणतात. बांबूच्या वस्तू बनविण्यासाठी त्यांचा उपयोग होतो.’’ राघवने सांगितले.



# १२. बांबूकाम

‘‘छान! किती सुंदर!’’ दादाला त्यांच्या मित्राकडून भेट मिळालेल्या झुंबराकडे पाहत दीपक म्हणाला.

‘‘दादा, कशाचं बनवले रे झुंबर?’’ दीपकने विचारले. ‘‘बांबूचं! माझ्या मित्रानं राघवनं स्वतः बनवलं तें. बांबूपासून तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू बनवता येतात त्याला. त्या कामात तो अगदी पटाईत आहे.’’ दादाने सांगितले.

‘‘मग बरंच झालं तर! तो वस्तू कशा बनवतो ते पाहायचंय मला. मला नेशील त्याच्याकडं?’’ दीपकने विचारले. ‘‘हो. येत्या रविवारी जाऊ. आम्ही येणार असल्याचं आजच कळवतो त्याला.’’ दादाने सांगितले.

दीपकला बरोबर घेऊन दादा रविवारी सकाळी राघवकडे गेला. राघव अंगणातच होता.

‘‘या, मी तुमचीच वाट पाहत होतो.’’ राघवने दोघांचेही स्वागत केले.

‘‘राघव, हा माझा धाकटा भाऊ दीपक. तुझी कला पाहण्यासाठी आला आहे.’’ दादाने दीपकची ओळख करून दिली.

‘‘फक्त पहायची नाही काही. माहिती पण मिळवायची आहे. आणि जमलंच तर शिकायची पण आहे.’’ दीपक घाईघाईत म्हणाला.

‘‘अरे हो. पण एवढी घाई कशाला? आधी न्याहारी करू आणि मग सगळं कांही आरामात पाहू.’’ असे म्हणत राघवने त्याला घरात नेले.

राघवच्या आईने न्याहारीचे गरम गरम पदार्थ आणले. सर्वांनी आवडीने खाल्ले. नंतर ते घराच्या बाजूला असलेल्या झोपडीत गेले. तेथे बांबू ठेवलेले होते. काही वस्तू अर्धवट विणलेल्या होत्या. एका कोपऱ्यात पांढऱ्या पातळ पट्ट्यांचा भारा बांधून ठेवला होता.

‘‘या पट्ट्या कशासाठी आणल्या आहेत?’’ दीपकने विचारले.

‘‘त्या आणल्या नाहीत. आम्हीच तयार केल्या. त्यांना बेळं म्हणतात. बांबूच्या वस्तू बनविण्यासाठी त्यांचा उपयोग होतो.’’ राघवने सांगितले.

३७

''पण बेळं तयार कशी केलीत?'' दीपकने प्रश्न केला.

''बांबूची बनवलीत ती. अगदी कोवळा नसलेल्या तसंच जास्त जून नसलेल्या बांबूपासून ती बनवावी लागतात.''

''का? तसंच का?'' दीपकने मध्येच शंका विचारली.

''कोवळ्या बांबूची बेळं खूप नाजूक असतात. त्यामुळे त्यापासून बनवलेल्या वस्तूही नाजूक होतात. त्या जास्त काळ टिकत नाहीत. त्यांची किंमतही कमी येते. तसंच जास्त जून असलेल्या बांबूंच्या बेळांना लवचिकपणा नसतो. त्यामुळे वस्तू बनवताना ती मोडतात.'' राघवने माहिती दिली.

''मला बेळं कशी करतात ते शिकव ना?''दीपकने राघवला विनंती केली.

राघवने बांबूचा एक तुकडा उचलला व पातळ धारदार सुरीच्या साहाय्याने त्याच्यापासून अलगद एक बेळ काढले व तासून गुळगुळीत केले. दीपक त्याची ही कृती बारकाईने पाहत होता.

''एवढं गुळगुळीत का केलं?'' बेळावर बोट फिरवीत दीपकने विचारले.

''गुळगुळीत केलं नाही तर वस्तू बनविताना त्याची कड हाताला लागून हात कापण्याची शक्यता असते. तसेच गुळगुळीतपणामुळं कामही जलद होतं?'' राघवने स्पष्टीकरण केले.

''आता मी एक बेळ काढून पाहू का?'' दीपकने विचारले.

राघवने 'हो' म्हणताच दीपकने एक बेळ काढले.

''छान! तुझी कृती अगदी बरोबर. पण बेळ थोडं जाड आलं. सरावाशिवाय कामात सफाई येत नाही.'' राघव म्हणाला.

''मग मी काढलेलं बेळ फुकट गेलं तर?'' दीपक निराशेच्या सुरात म्हणाला.

''नाही. ही टोपली बघ! हिच्या तळाचा भाग जाड बेळांचा बनवलेला आहे. त्यासाठी उपयोगी पडेल ते.'' राघवने समजावले.

त्यानंतर ते तिघे बाजूच्या खोलीत गेले. तेथे वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू मांडून ठेवलेल्या होत्या.

''अरे बाप रे! किती या वस्तू, किती प्रकारच्या आणि किती सुंदर!'' दीपक उद्गारला.



''पण बेळं तयार कशी केलीत?'' दीपकने प्रश्न केला.

''बांबूची बनवलीत ती. अगदी कोवळा नसलेल्या तसंच जास्त जून नसलेल्या बांबूपासून ती बनवावी लागतात.''

''का? तसंच का?'' दीपकने मध्येच शंका विचारली.

''कोवळ्या बांबूची बेळं खूप नाजूक असतात. त्यामुळे त्यापासून बनवलेल्या वस्तूही नाजूक होतात. त्या जास्त काळ टिकत नाहीत. त्यांची किंमतही कमी येते. तसंच जास्त जून असलेल्या बांबूंच्या बेळांना लवचिकपणा नसतो. त्यामुळे वस्तू बनवताना ती मोडतात.'' राघवने माहिती दिली.

''मला बेळं कशी करतात ते शिकव ना?''दीपकने राघवला विनंती केली.

राघवने बांबूचा एक तुकडा उचलला व पातळ धारदार सुरीच्या साहाय्याने त्याच्यापासून अलगद एक बेळ काढले व तासून गुळगुळीत केले. दीपक त्याची ही कृती बारकाईने पाहत होता.

''एवढं गुळगुळीत का केलं?'' बेळावर बोट फिरवीत दीपकने विचारले.

''गुळगुळीत केलं नाही तर वस्तू बनविताना त्याची कड हाताला लागून हात कापण्याची शक्यता असते. तसेच गुळगुळीतपणामुळं कामही जलद होतं?'' राघवने स्पष्टीकरण केले.

''आता मी एक बेळ काढून पाहू का?'' दीपकने विचारले.

राघवने 'हो' म्हणताच दीपकने एक बेळ काढले.

''छान! तुझी कृती अगदी बरोबर. पण बेळ थोडं जाड आलं. सरावाशिवाय कामात सफाई येत नाही.'' राघव म्हणाला.

''मग मी काढलेलं बेळ फुकट गेलं तर?'' दीपक निराशेच्या सुरात म्हणाला.

''नाही. ही टोपली बघ! हिच्या तळाचा भाग जाड बेळांचा बनवलेला आहे. त्यासाठी उपयोगी पडेल ते.'' राघवने समजावले.

त्यानंतर ते तिघे बाजूच्या खोलीत गेले. तेथे वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू मांडून ठेवलेल्या होत्या.

''अरे बाप रे! किती या वस्तू, किती प्रकारच्या आणि किती सुंदर!'' दीपक उद्गारला.

३८

''या वस्तू तयार करायला आमच्या कुटुंबातील सर्वांनी हातभार लावलेला आहे. उद्याच्या बाजाराला नेण्यासाठी त्या तयार केलेल्या आहेत.'' राघवने सांगितले.

''या एवढ्या मोठ्या चटईचा काय उपयोग? राक्षसाला झोपायला केली की काय?'' दीपकने एका मोठ्या चटईकडे पाहत गमतीने विचारले.

''सांगतो. सर्व वस्तूंची नावं सांगतो आणि उपयोगही सांगतो. ही चटई म्हणतोस ना, तिला डाळी म्हणतात. भाताच्या मळणीसाठी व भात सुकविण्यासाठी हिचा उपयोग होतो. ही फुलांची परडी आणि ही संबळी. खेड्यातील काही कुटुंबात हिचा घरगुती औषधे तसेच पूजेचे सामानही ठेवण्यासाठी उपयोग करतात. ही फुलदाणी, हिचा उपयोग तुला माहीत आहेच!'' राघव प्रत्येक वस्तूकडे निर्देश करून माहिती देत होता.

''ही टोपली आणि हे सूप यांचा उपयोग तुला माहीत आहेच.'' दीपक मध्येच थट्टेने म्हणाला.

''याशिवाय कणगी, रोवळी, इरले यासारख्या अनेक प्रकारच्या वस्तू पूर्वी तयार केल्या जायच्या.'' राघव म्हणाला.

''आता का करत नाहीत?'' दीपकने प्रश्न विचारला.

''आजकाल लोक त्या वस्तूंऐवजी प्लॅस्टिकच्या वस्तू वापरतात. त्यामुळे बांबूच्या बऱ्याचशा वस्तूंची बाजारातील मागणी कमी झाली आहे.'' राघवने सांगितले.

''अरे, मग तुमच्या धंद्यावर त्याचा वाईट परिणाम झाला असेल?'' दीपकच्या दादाने विचारले.

''नाही, मुळीच नाही! आम्ही आता वेगळ्याच प्रकारच्या वस्तू तयार करतो. चला माझ्याबरोबर. दाखवतो तुम्हाला.'' असे म्हणून दीपकला व दादाला घेऊन राघव झोपडीच्या आतील भागात गेला. तेथील रंगीबेरंगी वस्तू पाहून दीपकला 'आपण जादूच्या नगरीत तर आलो नाही ना!' असे वाटले. पंखे, पर्स, कमळाकृती वस्तू, फुलदाण्या, झुंबर, टेबल लॅम्प, भिंतीवर टांगावयाच्या शोभिवंत वस्तू व त्यावर फुले, पक्षी, प्राणी यांच्या चित्रांनी केलेली नक्षी पाहून तो चकीत झाला.

''पांढऱ्या बेळांच्या या रंगीत वस्तू कशा तयार केल्या?'' दीपकने शंका विचारली.

''बेळं रंगवायचा बाजारात खास रंग मिळतो. उकळत्या पाण्यात तो तयार करतात. रंग उकळत असतानाच बेळं रंगात बुडवावी लागतात. असं केलं तरच बेळं पक्क्या रंगाची तयार होतात.'' राघवने सांगितले.



''या वस्तू तयार करायला आमच्या कुटुंबातील सर्वांनी हातभार लावलेला आहे. उद्याच्या बाजाराला नेण्यासाठी त्या तयार केलेल्या आहेत.'' राघवने सांगितले.

''या एवढ्या मोठ्या चटईचा काय उपयोग? राक्षसाला झोपायला केली की काय?'' दीपकने एका मोठ्या चटईकडे पाहत गमतीने विचारले.

''सांगतो. सर्व वस्तूंची नावं सांगतो आणि उपयोगही सांगतो. ही चटई म्हणतोस ना, तिला डाळी म्हणतात. भाताच्या मळणीसाठी व भात सुकविण्यासाठी हिचा उपयोग होतो. ही फुलांची परडी आणि ही संबळी. खेड्यातील काही कुटुंबात हिचा घरगुती औषधे तसेच पूजेचे सामानही ठेवण्यासाठी उपयोग करतात. ही फुलदाणी, हिचा उपयोग तुला माहीत आहेच!'' राघव प्रत्येक वस्तूकडे निर्देश करून माहिती देत होता.

''ही टोपली आणि हे सूप यांचा उपयोग तुला माहीत आहेच.'' दीपक मध्येच थट्टेने म्हणाला.

''याशिवाय कणगी, रोवळी, इरले यासारख्या अनेक प्रकारच्या वस्तू पूर्वी तयार केल्या जायच्या.'' राघव म्हणाला.

''आता का करत नाहीत?'' दीपकने प्रश्न विचारला.

''आजकाल लोक त्या वस्तूंऐवजी प्लॅस्टिकच्या वस्तू वापरतात. त्यामुळे बांबूच्या बऱ्याचशा वस्तूंची बाजारातील मागणी कमी झाली आहे.'' राघवने सांगितले.

''अरे, मग तुमच्या धंद्यावर त्याचा वाईट परिणाम झाला असेल?'' दीपकच्या दादाने विचारले.

''नाही, मुळीच नाही! आम्ही आता वेगळ्याच प्रकारच्या वस्तू तयार करतो. चला माझ्याबरोबर. दाखवतो तुम्हाला.'' असे म्हणून दीपकला व दादाला घेऊन राघव झोपडीच्या आतील भागात गेला. तेथील रंगीबेरंगी वस्तू पाहून दीपकला 'आपण जादूच्या नगरीत तर आलो नाही ना!' असे वाटले. पंखे, पर्स, कमळाकृती वस्तू, फुलदाण्या, झुंबर, टेबल लॅम्प, भिंतीवर टांगावयाच्या शोभिवंत वस्तू व त्यावर फुले, पक्षी, प्राणी यांच्या चित्रांनी केलेली नक्षी पाहून तो चकीत झाला.

''पांढऱ्या बेळांच्या या रंगीत वस्तू कशा तयार केल्या?'' दीपकने शंका विचारली.

''बेळं रंगवायचा बाजारात खास रंग मिळतो. उकळत्या पाण्यात तो तयार करतात. रंग उकळत असतानाच बेळं रंगात बुडवावी लागतात. असं केलं तरच बेळं पक्क्या रंगाची तयार होतात.'' राघवने सांगितले.


३९

''अशा रंगीत वस्तूंना गिऱ्हाईक कुठं मिळतं?'' दादाने विचारले.

''हस्तकला वस्तू विक्रीकेंद्रावर आम्ही या वस्तू ठेवतो. तेथून पर्यटक या वस्तू खरेदी करतात. पर्यटकांना या वस्तू फार आवडतात. दिवसेंदिवस या वस्तूंची मागणी वाढत आहे.

जितकी वस्तू सुंदर तितकी तिची किंमतही जास्त. यापुढे या धंद्यात भरपूर फायदा मिळणं शक्य आहे, पण हा व्यवसाय मात्र टिकवला पाहिजे.'' राघवने माहिती पुरविली. बोलता बोलता दुपार झाली.

दुपारचे जेवण आटोपल्यावर दादा व दीपक घरी जायला निघाले तेव्हा राघवने दीपकला एक सुंदर फुलदाणी भेट दिली.






''अशा रंगीत वस्तूंना गिऱ्हाईक कुठं मिळतं?'' दादाने विचारले.

''हस्तकला वस्तू विक्रीकेंद्रावर आम्ही या वस्तू ठेवतो. तेथून पर्यटक या वस्तू खरेदी करतात. पर्यटकांना या वस्तू फार आवडतात. दिवसेंदिवस या वस्तूंची मागणी वाढत आहे.

जितकी वस्तू सुंदर तितकी तिची किंमतही जास्त. यापुढे या धंद्यात भरपूर फायदा मिळणं शक्य आहे, पण हा व्यवसाय मात्र टिकवला पाहिजे.'' राघवने माहिती पुरविली. बोलता बोलता दुपार झाली.

दुपारचे जेवण आटोपल्यावर दादा व दीपक घरी जायला निघाले तेव्हा राघवने दीपकला एक सुंदर फुलदाणी भेट दिली.



### शब्दार्थ

**कणगी–** धान्य साठविण्यासाठी बेळांचे बनवलेले साधन, **इरले–** पावसात भिजू नये म्हणून बेळांचे बनविलेले आच्छादन, **रोवळी –** तांदूळ किंवा भाजी धुण्यासाठी बेळांबे बनविलेले साधन.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) झुंबराकडे पाहत दीपकने कोणते उद्गार काढले?
२) राघव कोणते काम करण्यात पटाईत आहे?
३) दीपकने काढलेले बेळ जाड का आले?
४) संबळीचा उपयोग कशासाठी करतात?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) दादा दीपकला घेऊन राघवकडे का गेला?
२) झोपडीच्या आतील भागात दीपकला काय काय दिसले?
३) अगदी कोवळ्या किंवा जास्त जून बांबूचा बेळे का काढत नाहीत?
४) राघवने दीपकला बेळ काढावयास कसे शिकविले?
५) बेळांचा रंग पक्का होण्यासाठी काय काय करावे लागते?
६) बेळापासून कोणकोणत्या शोभेच्या वस्तू बनवितात?

### व्यवसाय

**कंसातील शब्दाची विशेषणे बनवून मोकळ्या जागी लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१) दुकानात..........वस्तू मांडून ठेवल्या होत्या. (लाकूड)
२) गौरीने...........मण्याची माळ गळ्यात घातली. (रंग)
३) प्रदर्शनात.........तक्ते लावले होते. (इतिहास)
४) त्याने...........बनावटीच्या घड्याळाचा आग्रह धरला. (देश)

### उपक्रम

लाकडापासून तयार केल्या जाणाऱ्या काही वस्तूंची चित्रे जमा करून त्यांची नावे लिहा व त्याचा प्रत्येकी एकेक उपयोग लिहा.

●●●



### शब्दार्थ

**कणगी–** धान्य साठविण्यासाठी बेळांचे बनवलेले साधन, **इरले–** पावसात भिजू नये म्हणून बेळांचे बनविलेले आच्छादन, **रोवळी –** तांदूळ किंवा भाजी धुण्यासाठी बेळांबे बनविलेले साधन.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१) झुंबराकडे पाहत दीपकने कोणते उद्गार काढले?
२) राघव कोणते काम करण्यात पटाईत आहे?
३) दीपकने काढलेले बेळ जाड का आले?
४) संबळीचा उपयोग कशासाठी करतात?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) दादा दीपकला घेऊन राघवकडे का गेला?
२) झोपडीच्या आतील भागात दीपकला काय काय दिसले?
३) अगदी कोवळ्या किंवा जास्त जून बांबूचा बेळे का काढत नाहीत?
४) राघवने दीपकला बेळ काढावयास कसे शिकविले?
५) बेळांचा रंग पक्का होण्यासाठी काय काय करावे लागते?
६) बेळापासून कोणकोणत्या शोभेच्या वस्तू बनवितात?

### व्यवसाय

**कंसातील शब्दाची विशेषणे बनवून मोकळ्या जागी लिहून वाक्ये पूर्ण करा.**

१) दुकानात..........वस्तू मांडून ठेवल्या होत्या. (लाकूड)
२) गौरीने...........मण्याची माळ गळ्यात घातली. (रंग)
३) प्रदर्शनात.........तक्ते लावले होते. (इतिहास)
४) त्याने...........बनावटीच्या घड्याळाचा आग्रह धरला. (देश)

### उपक्रम

लाकडापासून तयार केल्या जाणाऱ्या काही वस्तूंची चित्रे जमा करून त्यांची नावे लिहा व त्याचा प्रत्येकी एकेक उपयोग लिहा.

●●●

४१

# १३. प्रजाहितदक्ष अहिल्याबाई



'सिरोज' हे इंदूर संस्थानातील एक छोटेसे गाव. या गावात खेमदास नावाचा एक धनिक रहात होता. वाडवडिलांनी मिळविलेली भरपूर संपत्ती होती. शिवाय त्याचा कामधंदाही चांगला चालत होता. पण तरीही तो दुःखी होता. कारण तो निपुत्रिक होता. संतानप्राप्तीसाठी दोघेही पतीपत्नी लोक सांगतील ते उपाय करीत होते; पण फळ मात्र मिळत नव्हते. शेवटी ईश्वरावर हवाला ठेवून तो आपला व्यवसाय करू लागला. एकदा तो खूप आजारी पडला व त्या आजारात मरण पावला.

खेमदासच्या अकस्मात निधनाने त्याची पत्नी एकाकी झाली. वंशाला दिवा नाही. पतीची सोबत नाही म्हणून ती निराश झाली. त्या गावच्या कमाविसदाराचा खेमदासच्या संपत्तीवर डोळा होता. खेमदासच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी कमाविसदार त्याच्या घरी आला व तिला म्हणाला, ''खेमदास गेला, खूप वाईट वाटलं. एवढी मोठी संपत्ती पण वारस नाही. आता ही सगळी संपत्ती सरकारजमा करावी लागणार.''

कमाविसदाराचे हे बोलणे ऐकताच खेमदासची पत्नी घाबरली. 'ही संपत्ती सरकारच्या ताब्यात गेली तर आपले कसे होणार?' या विचाराने ती अस्वस्थ झाली. तिने गयावया करीत कमाविसदाराला तसे न करण्याबद्दल विनविले. तेव्हा कमाविसदाराने तिला हळूच सांगितले, ''तुम्ही मला तीन लक्ष मोहोरा द्याल तर मी काहीतरी उपाय करेन.''



# १३. प्रजाहितदक्ष अहिल्याबाई



'सिरोज' हे इंदूर संस्थानातील एक छोटेसे गाव. या गावात खेमदास नावाचा एक धनिक रहात होता. वाडवडिलांनी मिळविलेली भरपूर संपत्ती होती. शिवाय त्याचा कामधंदाही चांगला चालत होता. पण तरीही तो दुःखी होता. कारण तो निपुत्रिक होता. संतानप्राप्तीसाठी दोघेही पतीपत्नी लोक सांगतील ते उपाय करीत होते; पण फळ मात्र मिळत नव्हते. शेवटी ईश्वरावर हवाला ठेवून तो आपला व्यवसाय करू लागला. एकदा तो खूप आजारी पडला व त्या आजारात मरण पावला.

खेमदासच्या अकस्मात निधनाने त्याची पत्नी एकाकी झाली. वंशाला दिवा नाही. पतीची सोबत नाही म्हणून ती निराश झाली. त्या गावच्या कमाविसदाराचा खेमदासच्या संपत्तीवर डोळा होता. खेमदासच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी कमाविसदार त्याच्या घरी आला व तिला म्हणाला, ''खेमदास गेला, खूप वाईट वाटलं. एवढी मोठी संपत्ती पण वारस नाही. आता ही सगळी संपत्ती सरकारजमा करावी लागणार.''

कमाविसदाराचे हे बोलणे ऐकताच खेमदासची पत्नी घाबरली. 'ही संपत्ती सरकारच्या ताब्यात गेली तर आपले कसे होणार?' या विचाराने ती अस्वस्थ झाली. तिने गयावया करीत कमाविसदाराला तसे न करण्याबद्दल विनविले. तेव्हा कमाविसदाराने तिला हळूच सांगितले, ''तुम्ही मला तीन लक्ष मोहोरा द्याल तर मी काहीतरी उपाय करेन.''

४२

कमाविसदाराच्या या उत्तराने तिला दिलासा मिळाला. तिने थोड्या दिवसांची मुदत मागून घेतली. कमाविसदाराने होकार दिला व तो निघून गेला.

खेमदासच्या पत्नीने तिच्या नातेवाईकांना ही गोष्ट सांगितली. त्या नातलगांनाही खेमदासच्या संपत्तीचा मोह होताच. त्यांनी तिला दत्तक घेण्याचा सल्ला दिला. दत्तकपुत्र घेतला तर सर्व संपत्ती आपल्याकडेच राहील म्हणून तिने दत्तकपुत्र घेण्याचे ठरविले. ही बातमी कमाविसदाराच्या कानावर आली. तो ताबडतोब त्या बाईकडे गेला. तो येताच खेमदासच्या पत्नीने आपला विचार त्याला बोलून दाखविला. पण कमाविसदार होता महावस्ताद!

तो पैसा सोडायला तयार नव्हता. त्याने जरा जरबेनेच तिला सांगितले, ''हे बघ, तू दत्तक घ्यायचे ठरवलंस. पण त्यालाही परवानगी घ्यावी लागते. तू जर मी सांगतलेली रक्कम दिलीस तरच तुला परवानगी देईन.'' कमाविसदाराने मागितलेली रक्कम मोठी होती. ती रक्कम कमी करण्याबद्दल तिने खूप विनवणी केली; पण कमाविसदार आपला हेका सोडण्यास तयार नव्हता.

इंदूर संस्थानच्या राणी अहिल्याबाई न्यायी, दानशूर व दयाळू होत्या. त्यांना जर हे सांगितले तर त्या नक्कीच मदत करतील हे जाणून खेमदासच्या पत्नीच्या वडिलांनी तिला घेऊन राजधानीला जायचे ठरविले, खेमदासच्या पत्नीने आपला दत्तकपुत्र निश्चित केला व त्याला घेऊन ती वडिलांसह लगेच महेश्वरला गेली.

महेश्वरला राजवाड्यात जाऊन त्यांनी अहिल्याबाईंच्या भेटीची परवानगी घेतली. अहिल्याबाईंना भेटण्यास खेमदासची पत्नी उत्सुक होती. अहिल्याबाई दिवाणखान्यात आल्या. त्यांचा शांत, प्रसन्न चेहरा मनाला सुखवीत होता. त्यांच्या बोलण्यात मार्दव होते. त्यांना पहाताच खेमदासच्या पत्नीने त्यांना नमस्कार केला. आपल्या मुलाला त्यांच्या पायांवर घातले. तिच्या वडिलांनी नमस्कार करून सर्व हकीकत राणीसरकारांच्या कानावर घातली. त्या काय निर्णय देतात हे ऐकायला खेमदासची पत्नी आसुसली होती. इतक्यात अहिल्याबाईंचा हाताचा मायेचा स्पर्श तिला जाणवला. त्या म्हणाल्या, ''हे बघ बाय! तू आम्हाला मुलीसारखी! तुझी संपत्ती तुझ्याकडेच राहील हो! याला तू दत्तक घे व आनंदाने राहा. आमच्या राज्यात सर्वांनी समाधानानं व निर्भयतेनं रहावं हीच आमची इच्छा! प्रजेवर कुणाकडूनही जुलूम झालेला आम्हाला खपणार नाही. आम्ही त्या लोभी कमाविसदाराचा योग्य बंदोबस्त करू.'' अहिल्याबाईंच्या बोलण्यातील तडफदारपणा, आत्मविश्वास, प्रजेवरील प्रेम पाहून खेमदासची पत्नी भारावून गेली. तिने त्यांच्याकडे कृतज्ञतेने पाहत त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले. स्वतःबरोबर आणलेला नजराणा अहिल्याबाईंना देऊ केला. पण त्यांनी तो स्वीकारला नाही. अहिल्याबाईंनी त्या दत्तकपुत्राला आपल्या मांडीवर घेऊन त्याला उंची वस्त्रे बहाल केली. तिला पालखीतून



कमाविसदाराच्या या उत्तराने तिला दिलासा मिळाला. तिने थोड्या दिवसांची मुदत मागून घेतली. कमाविसदाराने होकार दिला व तो निघून गेला.

खेमदासच्या पत्नीने तिच्या नातेवाईकांना ही गोष्ट सांगितली. त्या नातलगांनाही खेमदासच्या संपत्तीचा मोह होताच. त्यांनी तिला दत्तक घेण्याचा सल्ला दिला. दत्तकपुत्र घेतला तर सर्व संपत्ती आपल्याकडेच राहील म्हणून तिने दत्तकपुत्र घेण्याचे ठरविले. ही बातमी कमाविसदाराच्या कानावर आली. तो ताबडतोब त्या बाईकडे गेला. तो येताच खेमदासच्या पत्नीने आपला विचार त्याला बोलून दाखविला. पण कमाविसदार होता महावस्ताद!

तो पैसा सोडायला तयार नव्हता. त्याने जरा जरबेनेच तिला सांगितले, ''हे बघ, तू दत्तक घ्यायचे ठरवलंस. पण त्यालाही परवानगी घ्यावी लागते. तू जर मी सांगतलेली रक्कम दिलीस तरच तुला परवानगी देईन.'' कमाविसदाराने मागितलेली रक्कम मोठी होती. ती रक्कम कमी करण्याबद्दल तिने खूप विनवणी केली; पण कमाविसदार आपला हेका सोडण्यास तयार नव्हता.

इंदूर संस्थानच्या राणी अहिल्याबाई न्यायी, दानशूर व दयाळू होत्या. त्यांना जर हे सांगितले तर त्या नक्कीच मदत करतील हे जाणून खेमदासच्या पत्नीच्या वडिलांनी तिला घेऊन राजधानीला जायचे ठरविले, खेमदासच्या पत्नीने आपला दत्तकपुत्र निश्चित केला व त्याला घेऊन ती वडिलांसह लगेच महेश्वरला गेली.

महेश्वरला राजवाड्यात जाऊन त्यांनी अहिल्याबाईंच्या भेटीची परवानगी घेतली. अहिल्याबाईंना भेटण्यास खेमदासची पत्नी उत्सुक होती. अहिल्याबाई दिवाणखान्यात आल्या. त्यांचा शांत, प्रसन्न चेहरा मनाला सुखवीत होता. त्यांच्या बोलण्यात मार्दव होते. त्यांना पहाताच खेमदासच्या पत्नीने त्यांना नमस्कार केला. आपल्या मुलाला त्यांच्या पायांवर घातले. तिच्या वडिलांनी नमस्कार करून सर्व हकीकत राणीसरकारांच्या कानावर घातली. त्या काय निर्णय देतात हे ऐकायला खेमदासची पत्नी आसुसली होती. इतक्यात अहिल्याबाईंचा हाताचा मायेचा स्पर्श तिला जाणवला. त्या म्हणाल्या, ''हे बघ बाय! तू आम्हाला मुलीसारखी! तुझी संपत्ती तुझ्याकडेच राहील हो! याला तू दत्तक घे व आनंदाने राहा. आमच्या राज्यात सर्वांनी समाधानानं व निर्भयतेनं रहावं हीच आमची इच्छा! प्रजेवर कुणाकडूनही जुलूम झालेला आम्हाला खपणार नाही. आम्ही त्या लोभी कमाविसदाराचा योग्य बंदोबस्त करू.'' अहिल्याबाईंच्या बोलण्यातील तडफदारपणा, आत्मविश्वास, प्रजेवरील प्रेम पाहून खेमदासची पत्नी भारावून गेली. तिने त्यांच्याकडे कृतज्ञतेने पाहत त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले. स्वतःबरोबर आणलेला नजराणा अहिल्याबाईंना देऊ केला. पण त्यांनी तो स्वीकारला नाही. अहिल्याबाईंनी त्या दत्तकपुत्राला आपल्या मांडीवर घेऊन त्याला उंची वस्त्रे बहाल केली. तिला पालखीतून

४३

सन्मानाने तिच्या गावी परत पाठविले.

आपल्या राज्यातील अधिकाऱ्याने लोभी वृत्तीने लोकांना त्रास दिला हे पाहून त्यांना मनस्वी दुःख झाले. त्यांनी लगेच कमाविसदाराला बोलावून त्याची कानउघाडणी केली व प्रजेला सतावल्याबद्दल शिक्षा म्हणून याला कामावून काढून टाकले.

अशा होत्या प्रजाहितदक्ष अहिल्याबाई होळकर!

---

**शब्दार्थ**

**धनिक–** श्रीमंत, **निपुत्रिक–** मुलबाळ नसलेला, **निधन–** मृत्यू, **कमाविसदार–** मुख्य वसुलीअधिकारी, **जरब–** धाक, **दिलासा देणे–** धीर देणे, **मार्दव–** गोडवा, **प्रजाहितदक्ष–** प्रजेच्या हिताची काळजी घेणारी

**वाक्प्रचार–**

**गयावया करणे–** कळकळीणे सांगणे,

**कानउघाडणी करणे–** चुकीची जाणीव करून देणे, समज देणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) खेमदास दुःखी का होता?
२) कमाविसदाराने संपत्तीविषयी कोणता निर्णय खेमदासच्या पत्नीला ऐकवला?
३) कमाविसदाराने खेमदासाच्या पत्नीकडे कोणती मागणी केली?
४) खेमदासाच्या पत्नीला तिच्या नातलगांनी कोणता सल्ला दिला?
५) खेमदासच्या पत्नीला वडिलांनी कुणाची भेट घेण्याचे ठरवले?
६) अहिल्याबाईंना कोणत्या गोष्टीचे दुःख वाटले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) खेमदासची पत्नी महेश्वरला का गेली?
२) अहिल्याबाईंबद्दल खेमदासच्या पत्नीला कृतज्ञता का वाटली?
३) अहिल्याबाईंच्या गुणांचे वर्णन करणारी वाक्ये शोधा व लिहा.

**उपक्रम**

भारतातील काही थोर स्त्रियांची चित्रे जमवा व प्रत्येकी पाच वाक्यांत त्यांची कार्ये लिहा.



सन्मानाने तिच्या गावी परत पाठविले.

आपल्या राज्यातील अधिकाऱ्याने लोभी वृत्तीने लोकांना त्रास दिला हे पाहून त्यांना मनस्वी दुःख झाले. त्यांनी लगेच कमाविसदाराला बोलावून त्याची कानउघाडणी केली व प्रजेला सतावल्याबद्दल शिक्षा म्हणून याला कामावून काढून टाकले.

अशा होत्या प्रजाहितदक्ष अहिल्याबाई होळकर!

---

**शब्दार्थ**

**धनिक–** श्रीमंत, **निपुत्रिक–** मुलबाळ नसलेला, **निधन–** मृत्यू, **कमाविसदार–** मुख्य वसुलीअधिकारी, **जरब–** धाक, **दिलासा देणे–** धीर देणे, **मार्दव–** गोडवा, **प्रजाहितदक्ष–** प्रजेच्या हिताची काळजी घेणारी

**वाक्प्रचार–**

**गयावया करणे–** कळकळीणे सांगणे,

**कानउघाडणी करणे–** चुकीची जाणीव करून देणे, समज देणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) खेमदास दुःखी का होता?
२) कमाविसदाराने संपत्तीविषयी कोणता निर्णय खेमदासच्या पत्नीला ऐकवला?
३) कमाविसदाराने खेमदासाच्या पत्नीकडे कोणती मागणी केली?
४) खेमदासाच्या पत्नीला तिच्या नातलगांनी कोणता सल्ला दिला?
५) खेमदासच्या पत्नीला वडिलांनी कुणाची भेट घेण्याचे ठरवले?
६) अहिल्याबाईंना कोणत्या गोष्टीचे दुःख वाटले?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) खेमदासची पत्नी महेश्वरला का गेली?
२) अहिल्याबाईंबद्दल खेमदासच्या पत्नीला कृतज्ञता का वाटली?
३) अहिल्याबाईंच्या गुणांचे वर्णन करणारी वाक्ये शोधा व लिहा.

**उपक्रम**

भारतातील काही थोर स्त्रियांची चित्रे जमवा व प्रत्येकी पाच वाक्यांत त्यांची कार्ये लिहा.

४४

**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) बागेच्या आसपास बरीच घाण होती.
२) सायंकाळी पक्षी घराकडे परतले.
३) घर गाठण्यासाठी दिनू भरभर चालू लागला.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द क्रिया कोठे, कशी, केव्हा घडली याविषयी माहिती देतात. अशाप्रकारे क्रियेविषयी अधिक माहिती देणाऱ्या शब्दांना 'क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात.

उदा. चटकन, पलीकडे, येथे, आत, बाहेर, काल, उद्या कमी

**व्यवसाय**

**खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये ओळखून ती अधोरेखित करा.**

१) खेमदासची पत्नी दत्तक पुत्राला घेऊन लगेच महेश्वरला गेली.
२) शेतकरी दिवसभर शेतात काम करायचा.
३) प्रदर्शनातील सर्व वस्तू सरपंचांनी बारकाईने बघितल्या.
४) कारंज्याचे पाणी वर उडू लागले.
५) महर्षींनी गावोगावी शिक्षणसंस्था सुरू केल्या.

●●●



**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) बागेच्या आसपास बरीच घाण होती.
२) सायंकाळी पक्षी घराकडे परतले.
३) घर गाठण्यासाठी दिनू भरभर चालू लागला.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द क्रिया कोठे, कशी, केव्हा घडली याविषयी माहिती देतात. अशाप्रकारे क्रियेविषयी अधिक माहिती देणाऱ्या शब्दांना 'क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात.

उदा. चटकन, पलीकडे, येथे, आत, बाहेर, काल, उद्या कमी

**व्यवसाय**

**खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये ओळखून ती अधोरेखित करा.**

१) खेमदासची पत्नी दत्तक पुत्राला घेऊन लगेच महेश्वरला गेली.
२) शेतकरी दिवसभर शेतात काम करायचा.
३) प्रदर्शनातील सर्व वस्तू सरपंचांनी बारकाईने बघितल्या.
४) कारंज्याचे पाणी वर उडू लागले.
५) महर्षींनी गावोगावी शिक्षणसंस्था सुरू केल्या.

●●●

४५

# १४. थोर गणिती



एकदा एका शाळेत एक शिक्षणाधिकारी गेले होते. ते एका वर्गात गेले. विद्यार्थ्यांची गणित विषयातील प्रगती बघण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना गणिताचे एक उदाहरण सोडवायला दिले.

‘एका वर्गात शंभर मुले आहेत. जर पहिल्या मुलाला १०० रुपये. दुसऱ्याला ९९ रुपये, तिसऱ्याला ९८ रुपये याप्रमाणे शेवटच्याला १ रुपया अशी बक्षिसे द्यावयाची ठरविली, तर एकूण किती रुपये लागतील?’

मुले विचार करू लागली. त्यांनी आपापल्या पाटीवर आकडेमोड सुरू केली. शेवटच्या बाकावर बसलेल्या एका मुलाकडे अधिकाऱ्यांचे लक्ष गेले. काळासावळा असा तो मुलगा हात दुमडून बसला होता. इतर मुले गणित सोडविण्याचा प्रयत्न करत होती. मात्र तो मुलगा स्वस्थ बसला होता; हे पाहून त्यांना नवल वाटले.

अधिकारी त्या मुलाजवळ गेले. मुलाने आपली पाटी पालथी करून ठेवली होती. अधिकाऱ्यांनी त्या मुलाला विचारले, ‘‘तू गणित का सोडवत नाहीस?’’

‘‘मी तर केव्हाच सोडवलंय सर!’’ मुलगा शांतपणे उद्गारला. अशक्त वाटणाऱ्या त्या मुलाच्या डोळ्यांत विलक्षण तेज दिसत होते.

‘‘काय आलं तुझं उत्तर?’’ अधिकाऱ्यांनी विचारले.

‘‘५०५० रुपये सर!’’ पाटी दाखवित तो आत्मविश्वासाने म्हणाला. त्याच्या उत्तराने



# १४. थोर गणिती



एकदा एका शाळेत एक शिक्षणाधिकारी गेले होते. ते एका वर्गात गेले. विद्यार्थ्यांची गणित विषयातील प्रगती बघण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना गणिताचे एक उदाहरण सोडवायला दिले.

‘एका वर्गात शंभर मुले आहेत. जर पहिल्या मुलाला १०० रुपये. दुसऱ्याला ९९ रुपये, तिसऱ्याला ९८ रुपये याप्रमाणे शेवटच्याला १ रुपया अशी बक्षिसे द्यावयाची ठरविली, तर एकूण किती रुपये लागतील?’

मुले विचार करू लागली. त्यांनी आपापल्या पाटीवर आकडेमोड सुरू केली. शेवटच्या बाकावर बसलेल्या एका मुलाकडे अधिकाऱ्यांचे लक्ष गेले. काळासावळा असा तो मुलगा हात दुमडून बसला होता. इतर मुले गणित सोडविण्याचा प्रयत्न करत होती. मात्र तो मुलगा स्वस्थ बसला होता; हे पाहून त्यांना नवल वाटले.

अधिकारी त्या मुलाजवळ गेले. मुलाने आपली पाटी पालथी करून ठेवली होती. अधिकाऱ्यांनी त्या मुलाला विचारले, ‘‘तू गणित का सोडवत नाहीस?’’

‘‘मी तर केव्हाच सोडवलंय सर!’’ मुलगा शांतपणे उद्गारला. अशक्त वाटणाऱ्या त्या मुलाच्या डोळ्यांत विलक्षण तेज दिसत होते.

‘‘काय आलं तुझं उत्तर?’’ अधिकाऱ्यांनी विचारले.

‘‘५०५० रुपये सर!’’ पाटी दाखवित तो आत्मविश्वासाने म्हणाला. त्याच्या उत्तराने

अधिकारी खूष झाले. त्यांनी मुलाची पाट थोपटली.

तामिळनाडूमधील एरोड गावातील ही घटना.

कुंभकोणम शहराजवळ कावेरी आणि भवानी या नद्यांच्या संगमाजवळ हे एरोड गाव वसले आहे. याच गावात हा मुलगा २२ डिसेंबर १८८७ रोजी जन्मला.

आपल्या विलक्षण हुशारीमुळे व शांत स्वभावामुळे तो शिक्षकांचा आवडता बनला होता. गणित हा त्याचा अत्यंत आवडता विषय होता. गणिते सोडविण्याचा त्याला छंदच जडला होता. अगदी अवघड गणितेही तो चुटकीसरशी सोडवायचा. त्याची स्मरणशक्ती तीव्र होती.

कधी कधी वरच्या वर्गातली मुलेही गणितातील एखादी समस्या त्याला विचारीत आणि तो सहज सोडवून दाखवीत असे. या त्याच्या हुशारीमुळे तो इतर विद्यार्थ्यांत चमकू लागला.

गणित विषयाचे वेड त्याला स्वस्थ बसू देत नसे. गणित विषयाची वेगवेगळी पुस्तके मिळवून तो त्यांचा अभ्यास करीत बसे. त्यामुळे गणित विषयात तो इतका तरबेज बनला की, परीक्षेत दिलेल्या वेळेच्या अर्ध्या वेळेतच तो गणिताची प्रश्नपत्रिका पूर्णपणे सोडवित असे.

अशा या गणितप्रेमी मुलाचे नाव होते श्रीनिवास रामानुजन्. त्याच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. पोटापाण्याचा प्रशन सोडविण्यासाठी त्याने नोकरी पत्करली, पण ही नोकरी करतानाही त्याने आपला गणिताचा छंद सोडला नाही. त्याने फावल्या वेळेत स्वतंत्रपणे गणिताचा अभ्यास चालू ठेवला. या विषयाच्या विविध पुस्तकांतील महत्त्वाच्या नोंदी तो वहीत लिहून ठेवीत असे एके दिवशी या वह्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दृष्टीस पडल्या. त्यातील नोंदी पाहून त्यांना मोठे कौतुक वाटले. त्यांनी रामानुजन् यांना गणित विषयावर लेख लिहिण्यास सांगितले व तो प्राध्यापक हार्डी यांच्याकडे पाठविण्याचा सल्ला दिला. प्रा. हार्डी हे लंडनमधील केंब्रिज विद्यापीठात गणित विषयाचे तज्ञ होते.

रामानुजन्ना प्रा. हार्डी यांच्या प्रयत्नामुळेच इंग्लंडला जायची संधी मिळाली. केंब्रिज विद्यापीठात सतत चार वर्षे त्यांनी गणित विषयावर संशोधन केले. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. त्यांचे गणित विषयावरील लेख प्रसिद्ध झाले. त्यातील आश्चर्यकारक सिद्धांतामुळे त्यांना जगभर प्रसिद्धी मिळाली. यावेळी त्यांचे वय अवघे ३० वर्षांचे होते.

ज्ञान आणि किर्ती मिळवून १९१९ मध्ये ते भारतात परतले. त्यांनी आपल्या मायभूमीत



अधिकारी खूष झाले. त्यांनी मुलाची पाट थोपटली.

तामिळनाडूमधील एरोड गावातील ही घटना.

कुंभकोणम शहराजवळ कावेरी आणि भवानी या नद्यांच्या संगमाजवळ हे एरोड गाव वसले आहे. याच गावात हा मुलगा २२ डिसेंबर १८८७ रोजी जन्मला.

आपल्या विलक्षण हुशारीमुळे व शांत स्वभावामुळे तो शिक्षकांचा आवडता बनला होता. गणित हा त्याचा अत्यंत आवडता विषय होता. गणिते सोडविण्याचा त्याला छंदच जडला होता. अगदी अवघड गणितेही तो चुटकीसरशी सोडवायचा. त्याची स्मरणशक्ती तीव्र होती.

कधी कधी वरच्या वर्गातली मुलेही गणितातील एखादी समस्या त्याला विचारीत आणि तो सहज सोडवून दाखवीत असे. या त्याच्या हुशारीमुळे तो इतर विद्यार्थ्यांत चमकू लागला.

गणित विषयाचे वेड त्याला स्वस्थ बसू देत नसे. गणित विषयाची वेगवेगळी पुस्तके मिळवून तो त्यांचा अभ्यास करीत बसे. त्यामुळे गणित विषयात तो इतका तरबेज बनला की, परीक्षेत दिलेल्या वेळेच्या अर्ध्या वेळेतच तो गणिताची प्रश्नपत्रिका पूर्णपणे सोडवित असे.

अशा या गणितप्रेमी मुलाचे नाव होते श्रीनिवास रामानुजन्. त्याच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. पोटापाण्याचा प्रशन सोडविण्यासाठी त्याने नोकरी पत्करली, पण ही नोकरी करतानाही त्याने आपला गणिताचा छंद सोडला नाही. त्याने फावल्या वेळेत स्वतंत्रपणे गणिताचा अभ्यास चालू ठेवला. या विषयाच्या विविध पुस्तकांतील महत्त्वाच्या नोंदी तो वहीत लिहून ठेवीत असे एके दिवशी या वह्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दृष्टीस पडल्या. त्यातील नोंदी पाहून त्यांना मोठे कौतुक वाटले. त्यांनी रामानुजन् यांना गणित विषयावर लेख लिहिण्यास सांगितले व तो प्राध्यापक हार्डी यांच्याकडे पाठविण्याचा सल्ला दिला. प्रा. हार्डी हे लंडनमधील केंब्रिज विद्यापीठात गणित विषयाचे तज्ञ होते.

रामानुजन्ना प्रा. हार्डी यांच्या प्रयत्नामुळेच इंग्लंडला जायची संधी मिळाली. केंब्रिज विद्यापीठात सतत चार वर्षे त्यांनी गणित विषयावर संशोधन केले. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. त्यांचे गणित विषयावरील लेख प्रसिद्ध झाले. त्यातील आश्चर्यकारक सिद्धांतामुळे त्यांना जगभर प्रसिद्धी मिळाली. यावेळी त्यांचे वय अवघे ३० वर्षांचे होते.

ज्ञान आणि किर्ती मिळवून १९१९ मध्ये ते भारतात परतले. त्यांनी आपल्या मायभूमीत

४७

राहून गणित विषयात अधिक संशोधन करायचे ठरविले होते; पण २६ एप्रिल १९२० रोजी मद्रासजवळच्या चेटपूट या गावी त्यांचे निधन झाले.

प्रा. हार्डी यांनी त्यांच्याविषयी म्हटले आहे, ''रामानुजन्‌ला मी शिकविले असे जगाला वाटते; पण खरे पाहता तो माझ्याजवळ जितका शिकला त्यापेक्षा कितीतरी अधिक मीच त्याच्याजवळ शिकलो. त्याच्या तोडीच्या गणिती पुन्हा होणे कठीण दिसते!''

---

**शब्दार्थ**

**तरबेज–** पटाईत, **संगम–** जेथे दोन नद्या एकमेकांना मिळतात ती जागा,
**तोडीचा असणे–** बरोबरीचा असणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) श्रीनिवासकडे पाहिल्यावर शिक्षणाधिकाऱ्यांना नवल का वाटले?
२) शिक्षणाधिकाऱ्यांनी श्रीनिवासला शाबासकी का दिली?
३) रामानुजन्‌च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याला कोणता सल्ला दिला?
४) रामानुजन् यांना जगभर प्रसिद्धी कशामुळे मिळाली?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) श्रीनिवास शाळेत सर्वांचा आवडता का होता?
२) प्रा. हार्डी यांनी रामानुजन् यांच्याबद्दल कोणते उद्गार काढले?

**व्यवसाय**

**१ः खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे त्याखालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचा विरुद्ध अर्थ वापरून वाक्याचा अर्थ न बदलता वाक्य लिहा.**

**उदाहरण :** राजेश मूर्ख नव्हता.
राजेश शहाणा होता.

१) मोती दूर बसला होता.
२) त्याने आज जुने बूट घातले होते.
३) रहिमपेक्षा शौकत ठेंगणा नाही.
४) श्रीहरी श्रीमंत आहे.
५) बटव्यात जड वस्तू आहे.
६) पेल्यातील दूध थंड नाही.

**२ः पाठातील आलेल्या अंकसंख्या अक्षरी लिहा.**

**उपक्रम**

काही शास्त्रज्ञ व त्यांनी लावलेले शोध यांची यादी करा.

●●●



राहून गणित विषयात अधिक संशोधन करायचे ठरविले होते; पण २६ एप्रिल १९२० रोजी मद्रासजवळच्या चेटपूट या गावी त्यांचे निधन झाले.

प्रा. हार्डी यांनी त्यांच्याविषयी म्हटले आहे, ''रामानुजन्‌ला मी शिकविले असे जगाला वाटते; पण खरे पाहता तो माझ्याजवळ जितका शिकला त्यापेक्षा कितीतरी अधिक मीच त्याच्याजवळ शिकलो. त्याच्या तोडीच्या गणिती पुन्हा होणे कठीण दिसते!''

**शब्दार्थ**

**तरबेज–** पटाईत, **संगम–** जेथे दोन नद्या एकमेकांना मिळतात ती जागा,
**तोडीचा असणे–** बरोबरीचा असणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) श्रीनिवासकडे पाहिल्यावर शिक्षणाधिकाऱ्यांना नवल का वाटले?
२) शिक्षणाधिकाऱ्यांनी श्रीनिवासला शाबासकी का दिली?
३) रामानुजन्‌च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याला कोणता सल्ला दिला?
४) रामानुजन् यांना जगभर प्रसिद्धी कशामुळे मिळाली?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) श्रीनिवास शाळेत सर्वांचा आवडता का होता?
२) प्रा. हार्डी यांनी रामानुजन् यांच्याबद्दल कोणते उद्गार काढले?

**व्यवसाय**

**१ः खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे त्याखालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचा विरुद्ध अर्थ वापरून वाक्याचा अर्थ न बदलता वाक्य लिहा.**

**उदाहरण :** राजेश मूर्ख नव्हता.
राजेश शहाणा होता.

१) मोती दूर बसला होता.
२) त्याने आज जुने बूट घातले होते.
३) रहिमपेक्षा शौकत ठेंगणा नाही.
४) श्रीहरी श्रीमंत आहे.
५) बटव्यात जड वस्तू आहे.
६) पेल्यातील दूध थंड नाही.

**२ः पाठातील आलेल्या अंकसंख्या अक्षरी लिहा.**

**उपक्रम**

काही शास्त्रज्ञ व त्यांनी लावलेले शोध यांची यादी करा.

●●●

४८

# १५. घडवू महान हिंदुस्तान

युगा युगांच्या युगान्तरानी
कितीक सत्तान्तरे पाहिली
तरिही परंतु अखंड आहे माझा हिंदुस्थान
जयाचा सार्थ मला अभिमान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

भूमातेच्या प्रांगणातली
बाग सुवर्णी भारत भूमी
घराघरातून आपण गाऊ समानतेचे गान
घडवू महान हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

पुण्यवान जे इथे जन्मले
जिथे जन्मले कृष्ण-रामजी
कबीर, नानक, बुद्ध, जैन या साऱ्यांचे निजधाम
असा हा एकच हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

कितीक भाषा, धर्मही किती
तरी संस्कृती एक भारती
जगात आहे तरीही माझे जग हे हिंदुस्तान
जयाचा हिमालयी महिमा
तयाला शतशः नम्र प्रणाम!

प्राणाहुनिही प्रिय भूमी ही
कधी न येवो संकट तिजवरी
शांती अमुचा मंत्र असे परि प्रसंगी उठवू रान
अमुचा महान हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

•••



# १५. घडवू महान हिंदुस्तान

युगा युगांच्या युगान्तरानी
कितीक सत्तान्तरे पाहिली
तरिही परंतु अखंड आहे माझा हिंदुस्थान
जयाचा सार्थ मला अभिमान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

भूमातेच्या प्रांगणातली
बाग सुवर्णी भारत भूमी
घराघरातून आपण गाऊ समानतेचे गान
घडवू महान हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

पुण्यवान जे इथे जन्मले
जिथे जन्मले कृष्ण-रामजी
कबीर, नानक, बुद्ध, जैन या साऱ्यांचे निजधाम
असा हा एकच हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

कितीक भाषा, धर्मही किती
तरी संस्कृती एक भारती
जगात आहे तरीही माझे जग हे हिंदुस्तान
जयाचा हिमालयी महिमा
तयाला शतशः नम्र प्रणाम!

प्राणाहुनिही प्रिय भूमी ही
कधी न येवो संकट तिजवरी
शांती अमुचा मंत्र असे परि प्रसंगी उठवू रान
अमुचा महान हिंदुस्तान
तयाला शतशः नम्र प्रणाम!

•••

४९

# १६. विज्ञानाची कास

गुलाबीची आई आजारी होती. उठल्या उठल्या गुलाबीने घरातील कामाची आवराआवर केली. शाळेला उशीर होऊ नये म्हणून फक्त चहा पिऊन ती शाळेकडे निघाली, बरोबरच्या मैत्रिणी निघून गेल्या होत्या. प्रार्थनेला उपस्थित राहता यावे म्हणून तिने जवळच्या आडवाटेने जायचे ठरवले. ती भरभर चालू लागली. वाटेत अनेक चढ-उतार होते. समोरच्या झाडीतून पलीकडे गेले की ती डांबरी रस्त्यावर पोहोचणार होती. तारेचे कुंपण ओलांडताना तिचा तोल गेला व ती एका खडकावर पडली. तिने मोठ्याने किंकाळी मारली. किंकाळी ऐकून जवळच्याच गोठ्यात काम करणारी एक बाई धावत आली. गुलाबीच्या डोक्याला मोठी जखम झाली होती. रक्त वाहत होते. तिच्या पायालाही खरचटले होते. बाईने आरडाओरड केली. लोक जमा झाले. दोघा-चौघांनी उचलून गुलाबीला तिच्या घरी नेले.

झाडीतील ती जागा बाधक आहे. तिथे पडलेल्यांना पिशाच्चबाधा होतेच असे काही लोक अतिरंजित करून सांगत होते. प्रत्येक जण आपलेच खरे आहे हे पटवून सांगत होता. हे सगळे ऐकून गुलाबीची आई भयभीत झाली.

गुलाबी बेशुद्ध होती. ती काहीतरी बरळत होती. बऱ्याच वेळानंतर ती शुद्धीवर आली. घरातील गर्दी पाहून ती कावरीबावरी झाली. भेदरलेल्या नजरेने पाहू लागली. जमलेले लोक तिला नाना प्रश्न विचारू लागले. त्यामुळे ती फारच गोंधळली व रडू लागली. तिचे हातपाय थरथर कापू लागले.तिच्या प्रत्येक हालचालीचा अर्थ लोक आपापल्या परीने लावू लागले. आपापले उपाय करू लागले. कुणी अंगारा लावला. कुणी मिरच्या आगीत टाकून धूर केला तर कुणी चामड्याचे चप्पल तिच्या नाकाजवळ धरले. कुणी काय तर कुणी काय! अशा अनेक उपायांमुळे गुलाबी कासावीस झाली. काहीजणांच्या आग्रहास्तव आईने तिची मीठमोहरीने दृष्टही काढली.

दुसऱ्या दिवशी गुलाबीला खूप ताप आला. ती असंबद्ध बडबडू लागली. घरातील माणसे आणि शेजारीपाजारी मात्र तिच्या बडबडींचा संबंध पिशाच्चबाधेशी जोडत व वेगवेगळे उपाय सुचवत. लोकांच्या इच्छेनुसार गुलाबीचे आईवडील ते ते उपाय करू लागले. गंडे, दोरे बांधणे, उतारा करणे सुरू होते. उतारा झाल्यावर तिला थंड पाण्याची आंघोळ घालीत. बराच वेळ ओलेल्याने तिला उभी करून ठेवीत. अशाने तिचा ताप अधिक वाढे.

गुलाबी शाळेत गैरहजर होती. वर्गशिक्षकाने गुलाबीबद्दल इतर मुलींकडे चौकशी



# १६. विज्ञानाची कास

गुलाबीची आई आजारी होती. उठल्या उठल्या गुलाबीने घरातील कामाची आवराआवर केली. शाळेला उशीर होऊ नये म्हणून फक्त चहा पिऊन ती शाळेकडे निघाली, बरोबरच्या मैत्रिणी निघून गेल्या होत्या. प्रार्थनेला उपस्थित राहता यावे म्हणून तिने जवळच्या आडवाटेने जायचे ठरवले. ती भरभर चालू लागली. वाटेत अनेक चढ-उतार होते. समोरच्या झाडीतून पलीकडे गेले की ती डांबरी रस्त्यावर पोहोचणार होती. तारेचे कुंपण ओलांडताना तिचा तोल गेला व ती एका खडकावर पडली. तिने मोठ्याने किंकाळी मारली. किंकाळी ऐकून जवळच्याच गोठ्यात काम करणारी एक बाई धावत आली. गुलाबीच्या डोक्याला मोठी जखम झाली होती. रक्त वाहत होते. तिच्या पायालाही खरचटले होते. बाईने आरडाओरड केली. लोक जमा झाले. दोघा-चौघांनी उचलून गुलाबीला तिच्या घरी नेले.

झाडीतील ती जागा बाधक आहे. तिथे पडलेल्यांना पिशाच्चबाधा होतेच असे काही लोक अतिरंजित करून सांगत होते. प्रत्येक जण आपलेच खरे आहे हे पटवून सांगत होता. हे सगळे ऐकून गुलाबीची आई भयभीत झाली.

गुलाबी बेशुद्ध होती. ती काहीतरी बरळत होती. बऱ्याच वेळानंतर ती शुद्धीवर आली. घरातील गर्दी पाहून ती कावरीबावरी झाली. भेदरलेल्या नजरेने पाहू लागली. जमलेले लोक तिला नाना प्रश्न विचारू लागले. त्यामुळे ती फारच गोंधळली व रडू लागली. तिचे हातपाय थरथर कापू लागले.तिच्या प्रत्येक हालचालीचा अर्थ लोक आपापल्या परीने लावू लागले. आपापले उपाय करू लागले. कुणी अंगारा लावला. कुणी मिरच्या आगीत टाकून धूर केला तर कुणी चामड्याचे चप्पल तिच्या नाकाजवळ धरले. कुणी काय तर कुणी काय! अशा अनेक उपायांमुळे गुलाबी कासावीस झाली. काहीजणांच्या आग्रहास्तव आईने तिची मीठमोहरीने दृष्टही काढली.

दुसऱ्या दिवशी गुलाबीला खूप ताप आला. ती असंबद्ध बडबडू लागली. घरातील माणसे आणि शेजारीपाजारी मात्र तिच्या बडबडींचा संबंध पिशाच्चबाधेशी जोडत व वेगवेगळे उपाय सुचवत. लोकांच्या इच्छेनुसार गुलाबीचे आईवडील ते ते उपाय करू लागले. गंडे, दोरे बांधणे, उतारा करणे सुरू होते. उतारा झाल्यावर तिला थंड पाण्याची आंघोळ घालीत. बराच वेळ ओलेल्याने तिला उभी करून ठेवीत. अशाने तिचा ताप अधिक वाढे.

गुलाबी शाळेत गैरहजर होती. वर्गशिक्षकाने गुलाबीबद्दल इतर मुलींकडे चौकशी

५०

केली. शाळा सुटल्यावर शिक्षक गुलाबीच्या घरी गेले. तेथील वातावरण पाहून ते अचंबित झाले. स्वतःला मांत्रिक समजणारा एकजण अंगात आल्यासारखे करून वेगवेगळ्या आज्ञा करी. त्याचे दोघे साथीदार आज्ञेनुसार कृती करीत, अधूनमधून गुलाबीच्या केसांना पकडून मारझोड करीत. गुलाबीच्या आईवडिलांना ही मारझोड बघवत नव्हती. तरी ते विरोध करू शकत नव्हते. हे दृश्य पाहून शिक्षकांना खूप वाईट वाटले. गुलाबीला यातून सोडवायला हवे असे त्यांनी ठरविले.

मांत्रिक व त्याचे साथीदार गेल्यावर शिक्षकांनी गुलाबीच्या आई-वडिलांकडून सर्व हकीकत विचारून घेतली. ''गुलाबीला कोणत्याही प्रकारची पिशाच्चबाधा झालेली नाही. तो लोकांचा गैरसमज आहे. तापामुळे ती बडबडते. जखमेतून रक्त गेल्याने ती अशक्त झाली आहे. अघोरी उपायांमुळे ती अतिशय घाबरलेली आहे. अशा प्रकारच्या उपायांचा काही उपयोग होणार नाही. उलट तिला अधिकच त्रास होईल. तिच्यावर डॉक्टरीच उपाय केले पाहिजेत.'' शिक्षकांनी पटवून दिले. गुलाबीच्या आईवडिलांनी आपली चूक कबूल केली.

शिक्षक डॉक्टरांना घेऊन आले. डॉक्टरांनी गुलाबीची तपासणी केली. ''डोक्याची व पायाची जखम बरीच चिघळली आहे. यापूर्वीच तिला प्रतिबंधक इंजेक्शन द्यायला हवं होतं. तिला धनुर्वात झाला आहे. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेली नाही तर तिच्या जीविताला धोका आहे.'' डॉक्टर म्हणाले.

त्वरित धावपळ करून गुलाबीला हॉस्पिटलमध्ये दाखल केली. तेथील डॉक्टरांनी तिच्यावर योग्य उपचार सुरू केले.

दोन दिवसांच्या उपचारांनी गुलाबीची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. गुलाबीच्या वडिलांनी शिक्षकांचे आभार मानले. ''अज्ञान आणि चुकीच्या उपायांमुळे आमच्या मुलीचा बळी जाणार होता. तुम्ही आम्हाला योग्य मार्गदर्शन केलं. ज्ञान दिलं, तुमचे उपकार आम्ही कधीच विसरणार नाही.''

---

**शब्दार्थ**

**गर्द–** दाट, **असंबद्ध–** विसंगत, **अचंबित–** आश्चर्यचकित, **कावरीबावरी–** भयभीत.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गुलाबीने जवळच्या पायवाटेने शाळेला जायचे का ठरविले?

२) गुलाबी असंबद्ध बडबड का करीत होती?



केली. शाळा सुटल्यावर शिक्षक गुलाबीच्या घरी गेले. तेथील वातावरण पाहून ते अचंबित झाले. स्वतःला मांत्रिक समजणारा एकजण अंगात आल्यासारखे करून वेगवेगळ्या आज्ञा करी. त्याचे दोघे साथीदार आज्ञेनुसार कृती करीत, अधूनमधून गुलाबीच्या केसांना पकडून मारझोड करीत. गुलाबीच्या आईवडिलांना ही मारझोड बघवत नव्हती. तरी ते विरोध करू शकत नव्हते. हे दृश्य पाहून शिक्षकांना खूप वाईट वाटले. गुलाबीला यातून सोडवायला हवे असे त्यांनी ठरविले.

मांत्रिक व त्याचे साथीदार गेल्यावर शिक्षकांनी गुलाबीच्या आई-वडिलांकडून सर्व हकीकत विचारून घेतली. ''गुलाबीला कोणत्याही प्रकारची पिशाच्चबाधा झालेली नाही. तो लोकांचा गैरसमज आहे. तापामुळे ती बडबडते. जखमेतून रक्त गेल्याने ती अशक्त झाली आहे. अघोरी उपायांमुळे ती अतिशय घाबरलेली आहे. अशा प्रकारच्या उपायांचा काही उपयोग होणार नाही. उलट तिला अधिकच त्रास होईल. तिच्यावर डॉक्टरीच उपाय केले पाहिजेत.'' शिक्षकांनी पटवून दिले. गुलाबीच्या आईवडिलांनी आपली चूक कबूल केली.

शिक्षक डॉक्टरांना घेऊन आले. डॉक्टरांनी गुलाबीची तपासणी केली. ''डोक्याची व पायाची जखम बरीच चिघळली आहे. यापूर्वीच तिला प्रतिबंधक इंजेक्शन द्यायला हवं होतं. तिला धनुर्वात झाला आहे. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेली नाही तर तिच्या जीविताला धोका आहे.'' डॉक्टर म्हणाले.

त्वरित धावपळ करून गुलाबीला हॉस्पिटलमध्ये दाखल केली. तेथील डॉक्टरांनी तिच्यावर योग्य उपचार सुरू केले.

दोन दिवसांच्या उपचारांनी गुलाबीची प्रकृती हळूहळू सुधारू लागली. गुलाबीच्या वडिलांनी शिक्षकांचे आभार मानले. ''अज्ञान आणि चुकीच्या उपायांमुळे आमच्या मुलीचा बळी जाणार होता. तुम्ही आम्हाला योग्य मार्गदर्शन केलं. ज्ञान दिलं, तुमचे उपकार आम्ही कधीच विसरणार नाही.''

**शब्दार्थ**

**गर्द–** दाट, **असंबद्ध–** विसंगत, **अचंबित–** आश्चर्यचकित, **कावरीबावरी–** भयभीत.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) गुलाबीने जवळच्या पायवाटेने शाळेला जायचे का ठरविले?

२) गुलाबी असंबद्ध बडबड का करीत होती?

५१

प्रश्न २ : **खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) गुलाबीची आई भयभीत का झाली होती?
२) लोकांनी गुलाबीवर कोणकोणते उपाय केले?
३) गुलाबीचा ताप का वाढत होता?
४) गुलाबीच्या घरचे कोणते दृश्य पाहून शिक्षकांना आश्चर्य वाटले?
५) डॉक्टरांनी गुलाबीला हॉस्पिटलमध्ये नेण्याचा सल्ला का दिला?
६) गुलाबीच्या वडिलांनी शिक्षकांचे आभार का मानले?

**वाचा व लिहा**

**शब्दसमूहाबद्दल एक शब्द :**

जाणण्याची इच्छा– जिज्ञासा
ठराविक कालानंतर प्रसिद्ध होणारे– नियतकालिक
देशाची सेवा करणारा– देशसेवक
ज्याला भीती नाही असा – निर्भय
सभेत भाषण करणारा– वक्ता
कोणाचाही आधार नसलेला– निराधार
केवळ पाण्यात राहणारा– जलचर
वनात राहणारे लोक– वनवासी
खूप दानधर्म करणारा– दानशूर
केलेले उपकार जाणणारा– कृतज्ञ
केलेल्या उपकाराची जाणीव न ठेवणारा– कृतघ्न.

●●●



प्रश्न २ : **खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) गुलाबीची आई भयभीत का झाली होती?
२) लोकांनी गुलाबीवर कोणकोणते उपाय केले?
३) गुलाबीचा ताप का वाढत होता?
४) गुलाबीच्या घरचे कोणते दृश्य पाहून शिक्षकांना आश्चर्य वाटले?
५) डॉक्टरांनी गुलाबीला हॉस्पिटलमध्ये नेण्याचा सल्ला का दिला?
६) गुलाबीच्या वडिलांनी शिक्षकांचे आभार का मानले?

**वाचा व लिहा**

**शब्दसमूहाबद्दल एक शब्द :**

जाणण्याची इच्छा– जिज्ञासा
ठराविक कालानंतर प्रसिद्ध होणारे– नियतकालिक
देशाची सेवा करणारा– देशसेवक
ज्याला भीती नाही असा – निर्भय
सभेत भाषण करणारा– वक्ता
कोणाचाही आधार नसलेला– निराधार
केवळ पाण्यात राहणारा– जलचर
वनात राहणारे लोक– वनवासी
खूप दानधर्म करणारा– दानशूर
केलेले उपकार जाणणारा– कृतज्ञ
केलेल्या उपकाराची जाणीव न ठेवणारा– कृतघ्न.

●●●


५२

# १७. साप आपला मित्र!

साप हा एक सरपटणारा प्राणी आहे. साप संपूर्ण जगभर पहायला मिळतात. ते जमिनीवर तसेच पाण्यातही आढळतात. काही साप झाडावरदेखील वास्तव्य करतात. पाण्यात राहणाऱ्यांपैकी गोड्या पाण्यातील सर्व साप बिनविषारी असतात. मात्र समुद्राच्या पाण्यातील बहुतेक साप हे जहाल विषारी असतात. जमिनीवर आढळणारे अजगर, धामण, डुरक्या घोणस, मंडोळ, उडता सोनसाप, नानेटी, हरणटोळ वगैरे साप बिनविषारी असतात. तर फुरसे, घोणस, मण्यार, नाग, नागराज हे विषारी साप आहेत.

उंदीर व घुशी हे सापाचे प्रमुख अन्न आहे. साप अडगळीच्या ठिकाणी किंवा उंदीर, घुशी, तसेच अन्य प्राण्यांनी केलेल्या बिळात राहतो; म्हणूनच म्हणतात 'आयत्या बिळात नागोबा.'

बहुधा सापाचा रंग त्याच्या अवतीभवतीच्या परिसराशी मिळता जुळता असतो. मातीत राहणारे साप तांबूसतपकिरी रंगाचे; तर वृक्षावर आढळणारे साप हे हिरव्या रंगाचे असतात. अंधारात भटकणारी मण्यार ही काळपट रंगाची असते.



सापाला हात, पाय, पंख नसतात. एवढेच नव्हे तर कानही नसतात. पुंगीच्या आवाजाने साप डोलतो हा एक गैरसमज आहे. सापाच्या शरीरातील मणक्यांची संख्या तीनशे ते चारशे असते. त्यामुळे त्याला आपले शरीर पाहिजे तसे वळवता येते. साप हा अतिशय चपळ आणि सावधपणे फिरणारा प्राणी आहे. तो सरळ न जाता वेडीवाकडी वळणे घेत पुढे जातो. त्याची ही चाल म्हणजेच 'नागमोडी चाल.' त्याच्या चालण्याचा वेग कमी असतो. मात्र शत्रूपासून आपला बचाव करण्याकरिता चपळाईने धावतो.




# १७. साप आपला मित्र!

साप हा एक सरपटणारा प्राणी आहे. साप संपूर्ण जगभर पहायला मिळतात. ते जमिनीवर तसेच पाण्यातही आढळतात. काही साप झाडावरदेखील वास्तव्य करतात. पाण्यात राहणाऱ्यांपैकी गोड्या पाण्यातील सर्व साप बिनविषारी असतात. मात्र समुद्राच्या पाण्यातील बहुतेक साप हे जहाल विषारी असतात. जमिनीवर आढळणारे अजगर, धामण, डुरक्या घोणस, मंडोळ, उडता सोनसाप, नानेटी, हरणटोळ वगैरे साप बिनविषारी असतात. तर फुरसे, घोणस, मण्यार, नाग, नागराज हे विषारी साप आहेत.

उंदीर व घुशी हे सापाचे प्रमुख अन्न आहे. साप अडगळीच्या ठिकाणी किंवा उंदीर, घुशी, तसेच अन्य प्राण्यांनी केलेल्या बिळात राहतो; म्हणूनच म्हणतात 'आयत्या बिळात नागोबा.'

बहुधा सापाचा रंग त्याच्या अवतीभवतीच्या परिसराशी मिळता जुळता असतो. मातीत राहणारे साप तांबूसतपकिरी रंगाचे; तर वृक्षावर आढळणारे साप हे हिरव्या रंगाचे असतात. अंधारात भटकणारी मण्यार ही काळपट रंगाची असते.



सापाला हात, पाय, पंख नसतात. एवढेच नव्हे तर कानही नसतात. पुंगीच्या आवाजाने साप डोलतो हा एक गैरसमज आहे. सापाच्या शरीरातील मणक्यांची संख्या तीनशे ते चारशे असते. त्यामुळे त्याला आपले शरीर पाहिजे तसे वळवता येते. साप हा अतिशय चपळ आणि सावधपणे फिरणारा प्राणी आहे. तो सरळ न जाता वेडीवाकडी वळणे घेत पुढे जातो. त्याची ही चाल म्हणजेच 'नागमोडी चाल.' त्याच्या चालण्याचा वेग कमी असतो. मात्र शत्रूपासून आपला बचाव करण्याकरिता चपळाईने धावतो.

सापाच्या शरीराची वाढ होते. पण शरीराबरोबर बाह्यत्वचेची वाढ होत नाही. त्यामुळे त्याच्या हालचालींना अडथळा येतो. त्यावेळी तो बाह्यत्वचा काढून टाकतो. यालाच 'कात टाकणे' असे म्हणतात. कात टाकण्यापूर्वी सापाच्या शरीरातून एक तेलकट पदार्थ स्रवतो. त्यामुळे बाह्यत्वचा शरीरापासून अलग होते. त्यानंतर तो खाचेचा शोध घेतो. त्यातून बाहेर पडण्यापूर्वी तोंडाकडची बाजू खडबडीत पृष्ठभागावर घासतो व डोक्याकडची कात अलग करतो. तो खाचेतून पुढे सरकताना त्याची कात मागेच अडकून राहते.

सापाला जिभेमुळे वास व तापमान यांचे ज्ञान होते. जिभेच्या स्पर्शाने तो सजीव, निर्जीव ओळखतो. सापाचे आयुर्मान निश्चितपणे सांगता येत नाही. त्यांचे आयुष्य वीस ते पंचवीस वर्षे असावे असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

साप खाणे ही कल्पना सर्वसामान्यपणे लोकांना भयावह वाटते. पण चीन, अमेरिका, जपान, इटली या देशांतील लोक सापाचा उपयोग एक रुचकर अन्न म्हणून करतात. भारतातही काही जमातीतील लोक सापाचा खाण्यासाठी म्हणून उपयोग करतात. सापाच्या विषाचा औषध तयार करण्यासाठी उपयोग केला जातो. त्याच्या कातडीचा उपयोग पट्टे, पर्स इत्यादी वस्तू सुशोभित करण्यासाठी करतात. साप उंदीर व घुशी खातो. त्यामुळे शेतातील पिकांचे रक्षण होण्यास मदत होते.

सापाबद्दलच्या अज्ञानामुळे लोकांमध्ये काही गैरसमज आहेत. उदाहरणार्थ, दुखावलेला साप डूक धरून दंश करतो; पण आज सापाबद्दल बरेच शास्त्रीय ज्ञान उपलब्ध झाले आहे. त्यामुळे हे सर्व गैरसमज हळूहळू दूर होत आहेत. सापाची उपयुक्तता पाहून लोकांना पटू लागले आहे की, साप आपला 'शत्रू' नसून तो आपला 'मित्र' आहे.

---

**शब्दार्थ**

**स्रवणे**– पाझरणे, **आयुर्मान**– जीवनकाल, **जहाल**– जळजळीत, तीव्र

**म्हण**

**आयत्या बिळात नागोबा** – दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा घेणारा.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) साप कोठे कोठे राहतात?

२) विषारी सापांची नावे लिहा.

३) सापाचे प्रमुख अन्न कोणते?

४) शेतकऱ्याला सापाचा उपयोग कसा होतो?



सापाच्या शरीराची वाढ होते. पण शरीराबरोबर बाह्यत्वचेची वाढ होत नाही. त्यामुळे त्याच्या हालचालींना अडथळा येतो. त्यावेळी तो बाह्यत्वचा काढून टाकतो. यालाच 'कात टाकणे' असे म्हणतात. कात टाकण्यापूर्वी सापाच्या शरीरातून एक तेलकट पदार्थ स्रवतो. त्यामुळे बाह्यत्वचा शरीरापासून अलग होते. त्यानंतर तो खाचेचा शोध घेतो. त्यातून बाहेर पडण्यापूर्वी तोंडाकडची बाजू खडबडीत पृष्ठभागावर घासतो व डोक्याकडची कात अलग करतो. तो खाचेतून पुढे सरकताना त्याची कात मागेच अडकून राहते.

सापाला जिभेमुळे वास व तापमान यांचे ज्ञान होते. जिभेच्या स्पर्शाने तो सजीव, निर्जीव ओळखतो. सापाचे आयुर्मान निश्चितपणे सांगता येत नाही. त्यांचे आयुष्य वीस ते पंचवीस वर्षे असावे असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

साप खाणे ही कल्पना सर्वसामान्यपणे लोकांना भयावह वाटते. पण चीन, अमेरिका, जपान, इटली या देशांतील लोक सापाचा उपयोग एक रुचकर अन्न म्हणून करतात. भारतातही काही जमातीतील लोक सापाचा खाण्यासाठी म्हणून उपयोग करतात. सापाच्या विषाचा औषध तयार करण्यासाठी उपयोग केला जातो. त्याच्या कातडीचा उपयोग पट्टे, पर्स इत्यादी वस्तू सुशोभित करण्यासाठी करतात. साप उंदीर व घुशी खातो. त्यामुळे शेतातील पिकांचे रक्षण होण्यास मदत होते.

सापाबद्दलच्या अज्ञानामुळे लोकांमध्ये काही गैरसमज आहेत. उदाहरणार्थ, दुखावलेला साप डूक धरून दंश करतो; पण आज सापाबद्दल बरेच शास्त्रीय ज्ञान उपलब्ध झाले आहे. त्यामुळे हे सर्व गैरसमज हळूहळू दूर होत आहेत. सापाची उपयुक्तता पाहून लोकांना पटू लागले आहे की, साप आपला 'शत्रू' नसून तो आपला 'मित्र' आहे.

**शब्दार्थ**

**स्रवणे**– पाझरणे, **आयुर्मान**– जीवनकाल, **जहाल**– जळजळीत, तीव्र

**म्हण**

**आयत्या बिळात नागोबा** – दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा घेणारा.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) साप कोठे कोठे राहतात?

२) विषारी सापांची नावे लिहा.

३) सापाचे प्रमुख अन्न कोणते?

४) शेतकऱ्याला सापाचा उपयोग कसा होतो?

५४

**प्रश्न २ :** **खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) सापाचे उपयोग कोणकोणते सांगितले आहेत?

२) साप कात कशी टाकतो?

३) सापाबद्दल कोणते गैरसमज पसरले आहेत?

**व्यवसाय**

खाली दिलेल्या विधानासमोर प्रत्येकी तीन पर्याय दिलेले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून लिहा.

**१) समुद्राच्या पाण्यातील बहुतांशी साप हे...**

१) बिनविषारी असतात.

२) विषारी असतात.

३) जहाल विषारी असतात.

**२) मातीत राहणारे साप..........**

१) तांबूसतपकिरी रंगाचे असतात.

२) हिरव्या रंगाचे असतात.

३) काळपट रंगाचे असतात.

**३) साप खाणे ही कल्पना सर्वसामान्यपणे लोकांना....**

१) रम्य वाटते.

२) भयावह वाटते.

३) कशीतरी वाटते.

**उपक्रम**

सापांची चित्रे जमा करा. त्यांचे विषारी व बिनविषारी साप असे वर्गीकरण करा.

●●●



**प्रश्न २ :** **खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) सापाचे उपयोग कोणकोणते सांगितले आहेत?

२) साप कात कशी टाकतो?

३) सापाबद्दल कोणते गैरसमज पसरले आहेत?

**व्यवसाय**

खाली दिलेल्या विधानासमोर प्रत्येकी तीन पर्याय दिलेले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून लिहा.

**१) समुद्राच्या पाण्यातील बहुतांशी साप हे...**

१) बिनविषारी असतात.

२) विषारी असतात.

३) जहाल विषारी असतात.

**२) मातीत राहणारे साप..........**

१) तांबूसतपकिरी रंगाचे असतात.

२) हिरव्या रंगाचे असतात.

३) काळपट रंगाचे असतात.

**३) साप खाणे ही कल्पना सर्वसामान्यपणे लोकांना....**

१) रम्य वाटते.

२) भयावह वाटते.

३) कशीतरी वाटते.

**उपक्रम**

सापांची चित्रे जमा करा. त्यांचे विषारी व बिनविषारी साप असे वर्गीकरण करा.

●●●

५५

# १८. निघाली सहल

शाळेच्या सभागृहात आम्ही सर्व विद्यार्थी जमलो. सर्वजण उत्साहात. सहलीचा कार्यक्रम निश्चित करायचा होता. प्रत्येक गटाला शिक्षकांनी कामांची विभागणी करून दिली होती. आमच्या जागृती गटावर सहलीची जबाबदारी सोपविली होती. दहावीतील विश्वास हा आमचा गटप्रमुख.

सहलीबाबत माहिती देता देता विश्वास म्हणाला, ''सहलीची सर्व तयारी आम्हां विद्यार्थ्यांनाच करावयाची आहे. सहलीचे ठिकाण ठरविणे, गाडी ठरविणे, पैसे गोळा करणे हे सर्व आपल्याला इथे ठरवायचे आहसे. प्रत्येकाने आपले विचार मांडावेत.''

इतक्यात जॉनीफ्राने सूचना केली, ''गाडी ठरविणे व पैसे जमविणे हे आपण नंतर ठरवू. सहल कुठे न्यायची ते प्रथम ठरवू या.''

''गेल्या वर्षी आपण मुरगाव बंदर व दाबोळी विमानतळ पाहिला. खूप मजा आली. पाण्यावरून चालणाऱ्या बोटी व हवेतून उडणारी विमान पाहून खूप मजा वाखली.'' प्रमिलाने जुन्या आठवणींना उजाळा देत म्हटले.

शांती उत्साहाने म्हणाली, ''आपण यावर्षी दूधसागरचा धबधबा पहायला जाऊ. आपणास आगगाडीच्या प्रवासाचा आनंद लुटता येईल.''

दूधसागर म्हटल्याबरोबर नीलम चटकन म्हणाली, ''काल दूरदर्शनवर आम्ही दूधसागरचा धबधबा पाहिला. रमणीय निसर्गसौंदर्य, घाटातून जाणारा नागमोडी रेल्वेमार्ग, उंचावरून पडणारे दुधासारखे पाणी या अनेक गोष्टी पाहिल्या. खूप आवडले आपल्याला हे ठिकाण! आपण यावर्षी सहलीसाठी दूधसागरलाच जाऊ या.

चर्चा करता करता सर्वानुमते दूधसागरला सहल न्यायची ठरले.

दुसऱ्या दिवशी शरद व विश्वास शिक्षकांना भेटले. शिक्षकांना दूधसागर सहलीची कल्पना फार आवडली. ते म्हणाले, ''आपल्याला दूधसागरला जाता येईल. सहलीसाठी बस ठरवावी लागेल. कुळेपर्यंत बसने जायचे व कुळे ते दूधसागर रेल्वेने जावं लागेल. रेल्वेप्रवासासाठी रेल्वेचे वेळापत्रक पहावं लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पर्यटनखात्याकडून प्रवाससवलतीबाबत चौकशी करावी लागेल. आपण या खात्याला पत्र पाठवू व चौकशी करू. पर्यटनखात्याची कचेरी पणजीला आहे.''

''सर, आपण पणजीला जाऊन चौकशी करू आणि लवकर माहिती मिळवू.'' शरद म्हणाला.

''हे पहा. तिथे जाण्याची जरूरी नाही. आपण त्यांना पत्र पाठवू. आपणाला अजून



# १८. निघाली सहल

शाळेच्या सभागृहात आम्ही सर्व विद्यार्थी जमलो. सर्वजण उत्साहात. सहलीचा कार्यक्रम निश्चित करायचा होता. प्रत्येक गटाला शिक्षकांनी कामांची विभागणी करून दिली होती. आमच्या जागृती गटावर सहलीची जबाबदारी सोपविली होती. दहावीतील विश्वास हा आमचा गटप्रमुख.

सहलीबाबत माहिती देता देता विश्वास म्हणाला, ''सहलीची सर्व तयारी आम्हां विद्यार्थ्यांनाच करावयाची आहे. सहलीचे ठिकाण ठरविणे, गाडी ठरविणे, पैसे गोळा करणे हे सर्व आपल्याला इथे ठरवायचे आहसे. प्रत्येकाने आपले विचार मांडावेत.''

इतक्यात जॉनीफ्राने सूचना केली, ''गाडी ठरविणे व पैसे जमविणे हे आपण नंतर ठरवू. सहल कुठे न्यायची ते प्रथम ठरवू या.''

''गेल्या वर्षी आपण मुरगाव बंदर व दाबोळी विमानतळ पाहिला. खूप मजा आली. पाण्यावरून चालणाऱ्या बोटी व हवेतून उडणारी विमान पाहून खूप मजा वाखली.'' प्रमिलाने जुन्या आठवणींना उजाळा देत म्हटले.

शांती उत्साहाने म्हणाली, ''आपण यावर्षी दूधसागरचा धबधबा पहायला जाऊ. आपणास आगगाडीच्या प्रवासाचा आनंद लुटता येईल.''

दूधसागर म्हटल्याबरोबर नीलम चटकन म्हणाली, ''काल दूरदर्शनवर आम्ही दूधसागरचा धबधबा पाहिला. रमणीय निसर्गसौंदर्य, घाटातून जाणारा नागमोडी रेल्वेमार्ग, उंचावरून पडणारे दुधासारखे पाणी या अनेक गोष्टी पाहिल्या. खूप आवडले आपल्याला हे ठिकाण! आपण यावर्षी सहलीसाठी दूधसागरलाच जाऊ या.

चर्चा करता करता सर्वानुमते दूधसागरला सहल न्यायची ठरले.

दुसऱ्या दिवशी शरद व विश्वास शिक्षकांना भेटले. शिक्षकांना दूधसागर सहलीची कल्पना फार आवडली. ते म्हणाले, ''आपल्याला दूधसागरला जाता येईल. सहलीसाठी बस ठरवावी लागेल. कुळेपर्यंत बसने जायचे व कुळे ते दूधसागर रेल्वेने जावं लागेल. रेल्वेप्रवासासाठी रेल्वेचे वेळापत्रक पहावं लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पर्यटनखात्याकडून प्रवाससवलतीबाबत चौकशी करावी लागेल. आपण या खात्याला पत्र पाठवू व चौकशी करू. पर्यटनखात्याची कचेरी पणजीला आहे.''

''सर, आपण पणजीला जाऊन चौकशी करू आणि लवकर माहिती मिळवू.'' शरद म्हणाला.

''हे पहा. तिथे जाण्याची जरूरी नाही. आपण त्यांना पत्र पाठवू. आपणाला अजून

५६

दोन महिन्यांचा अवधी आहे. आपण पत्रातून सर्व गोष्टींची चौकशी करू.'' शिक्षकांनी दोघांनाही समजावून सांगितले.

विश्वास व शरदने पत्र लवकर पाठविण्याची शिक्षकांना विनंती केली. त्यावेळी शिक्षक म्हणाले, ''विश्वास, हे पत्र तूच लिही. उद्या ते दाखव मला. आपण नंतर ते पोष्टाने पाठवून देऊ.''

शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे विश्वासने पत्र लिहिलं. ते असे होते.

आदर्श विद्यालय,
सोनाळ, ता. सत्तरी.
गोवा.
दि. २५ सप्टेंबर १९९६.

प्रति,

माननीय संचालक,
पर्यटन खाते, गोवा शासन,
पणजी-गोवा

**विषय : शैक्षणिक सहल**

महोदय,

आमच्या विद्यालयाची शैक्षणिक सहल दूधसागर धबधबा येथे न्यायची ठरविले आहे. डिसेंबर महिन्यात सहल न्यायचा विचार आहे. सहलीत शंभर ते सव्वाशे विद्यार्थी सहभागी आहेत.

आम्हाला सोनाळ ते कुळे हा प्रवास बसने करावयाचा आहे व त्यापुढील प्रवास रेल्वेने करावयाचा आहे. आपल्या खात्याकडून शैक्षणिक सहलीसाठी सवलत देण्याची योजना आहे काय? असल्यास त्याबाबत सविस्तर कळवावे.

तसेच सोनाळ ते कुळे या मार्गात असणाऱ्या प्रेक्षणीय स्थळांची माहितीही सोबत पाठवावी.

आपल्या माहितीनुसार सहलीची आखणी करणे सुलभ होईल. कृपया आम्हाला त्वरित माहिती पुरवावी. सोबत माहितीपुस्तिका व गोवा पर्यटन नकाशाही पाठवावा.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

विश्वास गांवकर
विद्यार्थीप्रमुख



दोन महिन्यांचा अवधी आहे. आपण पत्रातून सर्व गोष्टींची चौकशी करू.'' शिक्षकांनी दोघांनाही समजावून सांगितले.

विश्वास व शरदने पत्र लवकर पाठविण्याची शिक्षकांना विनंती केली. त्यावेळी शिक्षक म्हणाले, ''विश्वास, हे पत्र तूच लिही. उद्या ते दाखव मला. आपण नंतर ते पोष्टाने पाठवून देऊ.''

शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे विश्वासने पत्र लिहिलं. ते असे होते.

आदर्श विद्यालय,
सोनाळ, ता. सत्तरी.
गोवा.
दि. २५ सप्टेंबर १९९६.

प्रति,

माननीय संचालक,
पर्यटन खाते, गोवा शासन,
पणजी-गोवा

**विषय : शैक्षणिक सहल**

महोदय,

आमच्या विद्यालयाची शैक्षणिक सहल दूधसागर धबधबा येथे न्यायची ठरविले आहे. डिसेंबर महिन्यात सहल न्यायचा विचार आहे. सहलीत शंभर ते सव्वाशे विद्यार्थी सहभागी आहेत.

आम्हाला सोनाळ ते कुळे हा प्रवास बसने करावयाचा आहे व त्यापुढील प्रवास रेल्वेने करावयाचा आहे. आपल्या खात्याकडून शैक्षणिक सहलीसाठी सवलत देण्याची योजना आहे काय? असल्यास त्याबाबत सविस्तर कळवावे.

तसेच सोनाळ ते कुळे या मार्गात असणाऱ्या प्रेक्षणीय स्थळांची माहितीही सोबत पाठवावी.

आपल्या माहितीनुसार सहलीची आखणी करणे सुलभ होईल. कृपया आम्हाला त्वरित माहिती पुरवावी. सोबत माहितीपुस्तिका व गोवा पर्यटन नकाशाही पाठवावा.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

विश्वास गांवकर
विद्यार्थीप्रमुख

५७

विश्वासने लिहिलेले पत्र शिक्षकांना आवडले. त्यांनी हे पत्र सातवीच्या वर्गात वाचून दाखविले. वर्गातील एका विद्यार्थ्याने शिक्षकांना विचारले, ''सर, हे पत्र वेगळेच वाटते. आपण मित्रांना, नातेवाईकांना किंवा आईवडिलांना पत्र लिहितो त्याची सुरुवात वेगळीच असते नाही का?''

दुसरा विद्यार्थी म्हणाला, ''या पत्राचा शेवटही वेगळाच वाटतो.''

शिक्षक म्हणाले, '' तुमचे म्हणणे एकदम बरोबर आहे. या पत्रास आपण व्यवसाय पत्र असे म्हणतो. विश्वासने पत्र कसे लिहिले आहे ते नीट पहा. आपण अशा प्रकारची पत्रे सरपंच, मुख्याध्यापक, तलाठी, ग्रामसेवक, मामलेदार किंवा अन्य अधिकाऱ्यांनाही लिहू शकतो. विश्वासच्या या पत्राप्रमाणे तुम्हालाही अशी पत्रे लिहिता येतील.''

---

**व्यवसाय**

**पुढे दिलेल्या प्रत्येक गटातील उदाहरणानुसार त्या त्या गटातील शब्दांची विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कल्याण | × | अकल्याण | कळा | × | अवकळा | पसंत | × | नापसंत |
| प्रामाणिक | × | ------ | गुण | × | ------ | मंजूर | × | ----- |
| ज्ञान | × | ------ | कृपा | × | ------ | इलाज | × | ----- |
| न्याय | × | ------ | लक्षण | × | ------ | उमेद | × | ----- |
| हित | × | ------ | मान | × | ------ | पास | × | ----- |

**उपक्रम**

१. तुमच्या शाळेला लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांची मागणी करण्यासाठी पुढील पत्त्यावर पत्र लिहा.

भांडार व्यवस्थापक, सांबारी बुक हाऊस, मडगाव- गोवा.

२. विद्यार्थ्यांनी वरील विषयावर लिहिलेली काही पत्रे वर्गातील अन्य विद्यार्थ्यांकडून वाचून घ्या.

●●●



विश्वासने लिहिलेले पत्र शिक्षकांना आवडले. त्यांनी हे पत्र सातवीच्या वर्गात वाचून दाखविले. वर्गातील एका विद्यार्थ्याने शिक्षकांना विचारले, ''सर, हे पत्र वेगळेच वाटते. आपण मित्रांना, नातेवाईकांना किंवा आईवडिलांना पत्र लिहितो त्याची सुरुवात वेगळीच असते नाही का?''

दुसरा विद्यार्थी म्हणाला, ''या पत्राचा शेवटही वेगळाच वाटतो.''

शिक्षक म्हणाले, '' तुमचे म्हणणे एकदम बरोबर आहे. या पत्रास आपण व्यवसाय पत्र असे म्हणतो. विश्वासने पत्र कसे लिहिले आहे ते नीट पहा. आपण अशा प्रकारची पत्रे सरपंच, मुख्याध्यापक, तलाठी, ग्रामसेवक, मामलेदार किंवा अन्य अधिकाऱ्यांनाही लिहू शकतो. विश्वासच्या या पत्राप्रमाणे तुम्हालाही अशी पत्रे लिहिता येतील.''

---

**व्यवसाय**

**पुढे दिलेल्या प्रत्येक गटातील उदाहरणानुसार त्या त्या गटातील शब्दांची विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कल्याण | × | अकल्याण | कळा | × | अवकळा | पसंत | × | नापसंत |
| प्रामाणिक | × | ------ | गुण | × | ------ | मंजूर | × | ----- |
| ज्ञान | × | ------ | कृपा | × | ------ | इलाज | × | ----- |
| न्याय | × | ------ | लक्षण | × | ------ | उमेद | × | ----- |
| हित | × | ------ | मान | × | ------ | पास | × | ----- |

**उपक्रम**

१. तुमच्या शाळेला लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांची मागणी करण्यासाठी पुढील पत्त्यावर पत्र लिहा.

भांडार व्यवस्थापक, सांबारी बुक हाऊस, मडगाव- गोवा.

२. विद्यार्थ्यांनी वरील विषयावर लिहिलेली काही पत्रे वर्गातील अन्य विद्यार्थ्यांकडून वाचून घ्या.

●●●

# १९. कायापालट

रात्रीची वेळ. एका झोपडीत काही माणसे बसली होती. अजूनही लोक येत होते. जागा मिळेल तेथे बसत होते.

''मंडळी आपण सुरुवात करायची काय?'' उठून उभा राहत एका तरुणाने विचारले. त्याचे नाव होते दिगंबर.

''करा सुरुवात.'' म्हादबा म्हणाला.

दिगंबरने एक वेळ सगळ्यांकडे बघितले. जागा अपुरी. त्यामुळे ते दाटीवाटीने बसले होते. सगळेच किडकिडीत. त्यांची खपाटीला गेलेली पोटं नजरेत भरत होती.

''मी इथं का आलो हे तुम्हाला कदाचित माहीत नसेल. तुमच्या गावात शाळा सुरू करावी असा माझा विचार आहे. त्या शाळेत तुमची मुलं शिकतील, शहाणी होतील, आजच्या काळात शिकलंच पाहिजे. म्हणून मी सुरू करत असलेल्या शाळेत तुमच्या मुलांना पाठवा.'' दिगंबर म्हणाला.

''मुलांना शाळेत पाठवलं तर शेळ्या-मेंढ्या राखण्याचे काम कोण करेल?'' एकाने शंका काढली.

''ते कम तुम्ही करा.''

''मग शेताची कामं कुणी करायची? कामं केली नाहीत तर पोटं कशी भरणार? तुमच्या या शाळेपायी आम्ही उपाशी मरू.'' दुसरा एकजण म्हणाला. बाकीच्यांनी तोच सूर लावला. दिगंबरने त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्यांचे समाधान झाले नाही. आपल्याला मुलांना शाळेत पाठवणे झेपणार नाही म्हणून काहीजण उठून गेले. फक्त चार-पाचजण राहिले,'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं.' पण दिगंबर निराश झाला नाही. शाळा सुरू करण्याचा त्याने चंग बांधला.

दिगंबर समाजशास्त्र घेऊन बी. ए. झाला होता. आपण नोकरी करायची नाही असा त्याने निश्चय केला. वनवासी भागात जाऊन जेथे शाळा नाही तेथे शाळा सुरू करायची. वनवासी मुलांना चांगले शिक्षण द्यायचे असा त्याने विचार केला. 'स्वत:साठी जगला तो मेला इतरांसाठी जगला तो जगला' या विचाराने तो भारावून गेला होता.

डोंगराळ भागात वनवासी समाज खूप होता. पिढ्यान् पिढ्या हा समाज रानावनात



# १९. कायापालट

रात्रीची वेळ. एका झोपडीत काही माणसे बसली होती. अजूनही लोक येत होते. जागा मिळेल तेथे बसत होते.

''मंडळी आपण सुरुवात करायची काय?'' उठून उभा राहत एका तरुणाने विचारले. त्याचे नाव होते दिगंबर.

''करा सुरुवात.'' म्हादबा म्हणाला.

दिगंबरने एक वेळ सगळ्यांकडे बघितले. जागा अपुरी. त्यामुळे ते दाटीवाटीने बसले होते. सगळेच किडकिडीत. त्यांची खपाटीला गेलेली पोटं नजरेत भरत होती.

''मी इथं का आलो हे तुम्हाला कदाचित माहीत नसेल. तुमच्या गावात शाळा सुरू करावी असा माझा विचार आहे. त्या शाळेत तुमची मुलं शिकतील, शहाणी होतील, आजच्या काळात शिकलंच पाहिजे. म्हणून मी सुरू करत असलेल्या शाळेत तुमच्या मुलांना पाठवा.'' दिगंबर म्हणाला.

''मुलांना शाळेत पाठवलं तर शेळ्या-मेंढ्या राखण्याचे काम कोण करेल?'' एकाने शंका काढली.

''ते कम तुम्ही करा.''

''मग शेताची कामं कुणी करायची? कामं केली नाहीत तर पोटं कशी भरणार? तुमच्या या शाळेपायी आम्ही उपाशी मरू.'' दुसरा एकजण म्हणाला. बाकीच्यांनी तोच सूर लावला. दिगंबरने त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्यांचे समाधान झाले नाही. आपल्याला मुलांना शाळेत पाठवणे झेपणार नाही म्हणून काहीजण उठून गेले. फक्त चार-पाचजण राहिले,'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं.' पण दिगंबर निराश झाला नाही. शाळा सुरू करण्याचा त्याने चंग बांधला.

दिगंबर समाजशास्त्र घेऊन बी. ए. झाला होता. आपण नोकरी करायची नाही असा त्याने निश्चय केला. वनवासी भागात जाऊन जेथे शाळा नाही तेथे शाळा सुरू करायची. वनवासी मुलांना चांगले शिक्षण द्यायचे असा त्याने विचार केला. 'स्वत:साठी जगला तो मेला इतरांसाठी जगला तो जगला' या विचाराने तो भारावून गेला होता.

डोंगराळ भागात वनवासी समाज खूप होता. पिढ्यान् पिढ्या हा समाज रानावनात

५९

जगत होता. शहरी सुधारणा अजून तेथे पोहोचल्या नव्हत्या. त्यांची घरे म्हणजे कुडाच्या झोपड्या. घरात गरिबी, पोट कसे भरेल याचीच काळजी. अजून तेथे शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नव्हते. तेथे शाळा सुरू करणे हे मोठे कठीण काम आहे हे माहित असूनही दिगंबर कामाला लागला.

'केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे' या वचनावर त्याचा विश्वास होता.

दिगंबरने सरकारची रितसर परवानगी घेऊन नवीन शाळा सुरू केली. वनवासी गरीब असल्यामुळे मुलांसाठी पाटी पेन्सिल आणणे त्यांना शक्य नव्हते. त्याची सोय दिगंबरनेच केली. मुलांना बसण्यासाठी म्हादबाने आपल्या झोपडीत जागा दिल्यामुळे जागेचा प्रश्न सुटला.



सर्व मुले शाळेत यावीत म्हणून दिगंबर प्रत्येकाच्या घरी गेला. तेथील लोकांना त्याने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिकल्यानंतर नोकरी मिळेल. गरिबी दूर होईल असे त्यांना पटवून दिले. त्यामुळे मुलांची संख्या वाढली. झोपडीतील जागा कमी पडू लागली. आता शाळेसाठी नवी इमारत बांधणे भाग होते. पण त्यासाठी पैशांची गरज होती. वनवासी लोक वर्गणी देऊ शकत नव्हते. शहरात दिगंबरचे मित्र तसेच नातेवाईकही होते. त्यांच्याकडून त्याने काही रक्कम जमा केली. तो धनिक लोकांना भेटला. आपल्या



जगत होता. शहरी सुधारणा अजून तेथे पोहोचल्या नव्हत्या. त्यांची घरे म्हणजे कुडाच्या झोपड्या. घरात गरिबी, पोट कसे भरेल याचीच काळजी. अजून तेथे शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नव्हते. तेथे शाळा सुरू करणे हे मोठे कठीण काम आहे हे माहित असूनही दिगंबर कामाला लागला.

'केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे' या वचनावर त्याचा विश्वास होता.

दिगंबरने सरकारची रितसर परवानगी घेऊन नवीन शाळा सुरू केली. वनवासी गरीब असल्यामुळे मुलांसाठी पाटी पेन्सिल आणणे त्यांना शक्य नव्हते. त्याची सोय दिगंबरनेच केली. मुलांना बसण्यासाठी म्हादबाने आपल्या झोपडीत जागा दिल्यामुळे जागेचा प्रश्न सुटला.



सर्व मुले शाळेत यावीत म्हणून दिगंबर प्रत्येकाच्या घरी गेला. तेथील लोकांना त्याने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिकल्यानंतर नोकरी मिळेल. गरिबी दूर होईल असे त्यांना पटवून दिले. त्यामुळे मुलांची संख्या वाढली. झोपडीतील जागा कमी पडू लागली. आता शाळेसाठी नवी इमारत बांधणे भाग होते. पण त्यासाठी पैशांची गरज होती. वनवासी लोक वर्गणी देऊ शकत नव्हते. शहरात दिगंबरचे मित्र तसेच नातेवाईकही होते. त्यांच्याकडून त्याने काही रक्कम जमा केली. तो धनिक लोकांना भेटला. आपल्या

६०

कामाचे महत्त्व त्यांना पटविले आणि त्यांच्यकडून देणग्या गोळा केल्या. या सगळ्यांच्या मदतीने शाळेची इमारत उभी राहू लागली. अनेक अडचणी आल्या. त्या दूर करत शेवटी इमारत उभी केली. शेळ्या-मेंढ्यांमागे धावणारी मुले शाळेत रमू लागली. पाढे म्हणू लागली. कविता पाठ करू लागली.

एवढे करूनही दिगंबरला समाधान नव्हते. एका गावात शाळा सुरू झाली तरी अजून आजुबाजूच्या गावात शाळा नव्हत्या. त्याच्या डोक्यात एक नवीन कल्पना आली. एके दिवशी तो आपल्या काही विद्यार्थ्यांना म्हणाला, ''आपण शेजारच्या गावी जाऊ या.''

''कशाला गुरुजी?'' एकाने विचारले.

''तुम्ही जसे शाळेत येता तसे त्या गावातील मुलांना शाळेत आणायला.'' गुरुजींनी सांगितले.

मुले उत्सहाने गुरुजींबरोबर जायला तयार झाली.

तो गाव म्हणजे डोंगराळ भाग, चढउतार मोठे, पल्ला लांबचा. दहा-बारा घरांची वस्ती, दिगंबर आपल्या विद्यार्थ्यांसह त्या गावात पोहोचला. त्याने गावातल्या मुलांना व लोकांना जमविले.

''तुमच्या शेजारच्या गावी ही मुलं शाळेत जातात. त्यांना लिहायला, वाचायला येतं. तुम्हीही तुमच्या मुलांना शाळेत पाठवा. त्यांना शिकू दे. त्यांना शहाणी होऊ दे.'' दिगंबरने समजावून सांगितले.

मुलांनीही त्या सर्वांना आपण काय काय शिकलो याची माहिती दिली, शाळेतील गमतीजमती सांगितल्या.

काही दिवसातच दिगंबरच्या या प्रयत्नांना यश आले. त्या गावचीही मुले शाळेत येऊ लागली.

वनवासी मुले शिकावीत म्हणून दिगंबरचे प्रयत्न चालूच होते. लोक गरीब, अज्ञानी होते. व्यसनामुळे त्यांची परिस्थिती हलाखीची झाली होती. दिगंबरने प्रथम त्यांना व्यसनमुक्त करण्याचे प्रयत्न केले. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी सरकारी सवलती मिळवून देण्याकरिता तो झटू लागला. त्यांना वेगवेगळ्या कामात मार्गदर्शन करू लागला. त्यामुळे सुरुवातीस परका वाटणारा दिगंबर हळूहळू सर्वांना आपला वाटू लागला.



कामाचे महत्त्व त्यांना पटविले आणि त्यांच्यकडून देणग्या गोळा केल्या. या सगळ्यांच्या मदतीने शाळेची इमारत उभी राहू लागली. अनेक अडचणी आल्या. त्या दूर करत शेवटी इमारत उभी केली. शेळ्या-मेंढ्यांमागे धावणारी मुले शाळेत रमू लागली. पाढे म्हणू लागली. कविता पाठ करू लागली.

एवढे करूनही दिगंबरला समाधान नव्हते. एका गावात शाळा सुरू झाली तरी अजून आजुबाजूच्या गावात शाळा नव्हत्या. त्याच्या डोक्यात एक नवीन कल्पना आली. एके दिवशी तो आपल्या काही विद्यार्थ्यांना म्हणाला, ''आपण शेजारच्या गावी जाऊ या.''

''कशाला गुरुजी?'' एकाने विचारले.

''तुम्ही जसे शाळेत येता तसे त्या गावातील मुलांना शाळेत आणायला.'' गुरुजींनी सांगितले.

मुले उत्सहाने गुरुजींबरोबर जायला तयार झाली.

तो गाव म्हणजे डोंगराळ भाग, चढउतार मोठे, पल्ला लांबचा. दहा-बारा घरांची वस्ती, दिगंबर आपल्या विद्यार्थ्यांसह त्या गावात पोहोचला. त्याने गावातल्या मुलांना व लोकांना जमविले.

''तुमच्या शेजारच्या गावी ही मुलं शाळेत जातात. त्यांना लिहायला, वाचायला येतं. तुम्हीही तुमच्या मुलांना शाळेत पाठवा. त्यांना शिकू दे. त्यांना शहाणी होऊ दे.'' दिगंबरने समजावून सांगितले.

मुलांनीही त्या सर्वांना आपण काय काय शिकलो याची माहिती दिली, शाळेतील गमतीजमती सांगितल्या.

काही दिवसातच दिगंबरच्या या प्रयत्नांना यश आले. त्या गावचीही मुले शाळेत येऊ लागली.

वनवासी मुले शिकावीत म्हणून दिगंबरचे प्रयत्न चालूच होते. लोक गरीब, अज्ञानी होते. व्यसनामुळे त्यांची परिस्थिती हलाखीची झाली होती. दिगंबरने प्रथम त्यांना व्यसनमुक्त करण्याचे प्रयत्न केले. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी सरकारी सवलती मिळवून देण्याकरिता तो झटू लागला. त्यांना वेगवेगळ्या कामात मार्गदर्शन करू लागला. त्यामुळे सुरुवातीस परका वाटणारा दिगंबर हळूहळू सर्वांना आपला वाटू लागला.

६१

**वाक्‌प्रचार**

**चंग बांधणे–** निश्चय करणे.

**म्हण**

**नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं –** एखाद्या कठीण कार्याला अनेक अडचणी निर्माण होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) झोपडीत बसलेल्या लोकांपुढे दिगंबरने कोणती इच्छा व्यक्त केली?
२) दिगंबरने कोणता निश्चय केला?
३) दिगंबरने कुणासाठी शाळा सुरू केली?
४) शाळेच्या जागेचा प्रश्न कसा सुटला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) वनवासी लोक मुलांना शाळेत पाठवायला तयार का नव्हते?
२) वनवासी लोकांची स्थिति कशी होती?
३) दिगंबरने शाळेची इमारत उभी करण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले?
४) वनवासी लोकांना दिगंबर आपलासा का वाटू लागला?

**व्यवसाय**

**खालील म्हणी पूर्ण करून लिहा.**

१) नाचता येईना---------
२) --------- गावाला वळसा.
३) ------- लावली टाळ्याला.
४) ऐकावे जनाचे----------
५) -------- भाराभार चिंध्या.

**उपक्रम**

म्हणींचा संग्रह करा.



**वाक्‌प्रचार**

**चंग बांधणे–** निश्चय करणे.

**म्हण**

**नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं –** एखाद्या कठीण कार्याला अनेक अडचणी निर्माण होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) झोपडीत बसलेल्या लोकांपुढे दिगंबरने कोणती इच्छा व्यक्त केली?
२) दिगंबरने कोणता निश्चय केला?
३) दिगंबरने कुणासाठी शाळा सुरू केली?
४) शाळेच्या जागेचा प्रश्न कसा सुटला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) वनवासी लोक मुलांना शाळेत पाठवायला तयार का नव्हते?
२) वनवासी लोकांची स्थिति कशी होती?
३) दिगंबरने शाळेची इमारत उभी करण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले?
४) वनवासी लोकांना दिगंबर आपलासा का वाटू लागला?

**व्यवसाय**

**खालील म्हणी पूर्ण करून लिहा.**

१) नाचता येईना---------
२) --------- गावाला वळसा.
३) ------- लावली टाळ्याला.
४) ऐकावे जनाचे----------
५) -------- भाराभार चिंध्या.

**उपक्रम**

म्हणींचा संग्रह करा.

६२

**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) ''अरे वा! बऱ्याच दिवसांनी आलास.''

२) ''छे, छे! तुम्ही असल्याशिवाय वारीला शोभा नाही.''

३) ''छान! तुझी कृती अगदी बरोबर!''

४) ''वा! वा! तू तर खूपच चांगले चित्र काढलेस?''

५) ''बाप रे! किती खोल विहीर!''

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द काळजीपूर्वक वाचा. हे शब्द वाक्याच्या अर्थाशी संबंध दाखवीत नाहीत. पण बोलणाऱ्यांच्या मनातील भाव, वृत्ती मात्र दाखवितात. अशा शब्दांना केवलप्रयोगी अव्यय म्हणतात.

**उदाहरणार्थ** : अहाहा, अरेरे, अबब, हट्, मग, आई ग.

**व्यवसाय**

वरील केवलप्रयोगी अव्यये वापरून नवीन वाक्ये तयार करा.

●●●



**व्याकरण**

**खालील वाक्ये वाचा.**

१) ''अरे वा! बऱ्याच दिवसांनी आलास.''

२) ''छे, छे! तुम्ही असल्याशिवाय वारीला शोभा नाही.''

३) ''छान! तुझी कृती अगदी बरोबर!''

४) ''वा! वा! तू तर खूपच चांगले चित्र काढलेस?''

५) ''बाप रे! किती खोल विहीर!''

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द काळजीपूर्वक वाचा. हे शब्द वाक्याच्या अर्थाशी संबंध दाखवीत नाहीत. पण बोलणाऱ्यांच्या मनातील भाव, वृत्ती मात्र दाखवितात. अशा शब्दांना केवलप्रयोगी अव्यय म्हणतात.

**उदाहरणार्थ** : अहाहा, अरेरे, अबब, हट्, मग, आई ग.

**व्यवसाय**

वरील केवलप्रयोगी अव्यये वापरून नवीन वाक्ये तयार करा.

●●●

# २०. मुले आम्ही या भारतभूची

मुले आम्ही या भारतभूची असू शक्तिशाली
मने आमुची आज नव्याने जागृत ही झाली।।
पहा उगवली नवी पहाट
उजळुन आली पुढची वाट
पुढचे पाउल पुढेच राहिल जाणीव ही आली
मने आमुची आज नव्याने जागृत ही झाली ।।
सत्य शिवाचे आम्ही पाईक
कर्तव्याचे नित्य उपासक
शर्थ करूनी देश आमुचा करू भाग्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।
वर्तमान हे आम्ही लढवू
भविष्य उज्ज्वल त्यातुन घडवू
श्रम शौर्याची कास करूनी होऊ सौख्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।
लाथ हाणता काढू पाणी
जगू न आता दुबळ्यावाणी
मनगटातला जोर दावुनी बनू शौर्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।

●●●



# २०. मुले आम्ही या भारतभूची

मुले आम्ही या भारतभूची असू शक्तिशाली
मने आमुची आज नव्याने जागृत ही झाली।।
पहा उगवली नवी पहाट
उजळुन आली पुढची वाट
पुढचे पाउल पुढेच राहिल जाणीव ही आली
मने आमुची आज नव्याने जागृत ही झाली ।।
सत्य शिवाचे आम्ही पाईक
कर्तव्याचे नित्य उपासक
शर्थ करूनी देश आमुचा करू भाग्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।
वर्तमान हे आम्ही लढवू
भविष्य उज्ज्वल त्यातुन घडवू
श्रम शौर्याची कास करूनी होऊ सौख्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।
लाथ हाणता काढू पाणी
जगू न आता दुबळ्यावाणी
मनगटातला जोर दावुनी बनू शौर्यशाली
मने आमची आज नव्याने जागृत ही झाली ।।

●●●

६४

# २१. नवी दिशा

सकाळी चहा पीत असताना वर्तमानपत्राच्या पहिल्याच पानावरील ठळक बातमी मला वाचायला मिळाली. ''प्रतिभाताईंना 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान.'' शेजारीच त्यांचा फोटो हाता व त्यांच्या कार्याचा थोडासा परिचय होता. तो वाचल्यावर त्यांच्याबद्दल माझे कुतूहल जागृत झाले. त्यांना भेटायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्या गावी गेले. गाव म्हणजे खेडेगावच ते! रहदारी जास्त नव्हती. रस्त्यावर काही मुले खेळत होती. त्यांना मी प्रतिभाताईंचे घर विचारताच एकाने मला त्यांच्या वाड्यावर नेले. ''मोठी आई. कुणी आलंय बघा!'' असं सांगून तो निघून गेला.

चिऱ्यांनी बांधलेला तो प्रचंड वाडा प्रतिभाताईंच्या वैभवाची साक्ष देत होता. मोठ्या दरवाज्यातून मी आत शिरले. प्रतिभाताई एका छोट्या बाळाला मांडीवर घेऊन खेळवत होत्या. एवढ्या श्रीमंत पण राहणी फारच साधी होती त्यांची! मला पाहताच बाळाला घेऊन त्या पुढे आल्या. माझं स्वागत केलं. साखरपाणी दिलं. मी त्यांचे अभिनंदन केले. माझा परिचय करू दिला व त्यांचे काम पाहिण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही बोलत बोलत एका खोलीपाशी पोहोचलो. त्या खोलीत लहान मुले खेळत होती. काहीजण खाऊ खात होती. एका मुलाला एक बाई मांडीवर घेऊन थोपटत होती. ह्या मुलांबद्दल चौकशी करता कळले की, ती गावातील शेतकऱ्यांची मुले होती. जे नवरा-बायको शेतात दिवसभर कामे करतात. त्यांच्या त्या छोट्या बालकांना सांभाळणारे घरी कोणी नव्हते. प्रतिभाताईंनी ती जबाबदारी स्वीकारली. सकाळी त्या मुलांचे आईवडील त्यांना तिथे सोडून जातात व संध्याकाळी येऊन घेऊन जातात. आम्ही खोलीत प्रवेश करताच ती छोटी मुले प्रतिभाताईंकडे धावत आली. त्यावरूनच प्रतिभाताईंनी मुलांना लावलेला लळा जाणवला. मी कौतुकाने ते सर्व पहात होते.

प्रतिभाताईने त्या छोट्यांना तेथील बाईच्या हवाली केले आणि मला दुसऱ्या खोलीत नेले. ती खोली भरतकामाच्या विविध नमुन्यांनी सजवलेली होती. गावातील दहा बारा मुली तिथे हसत, गप्पा मारत आपले विणकाम, भरतकाम, शिवणकाम करत बसल्या होत्या. प्रतिभाताईंनी त्यांच्याशी ओळख करून दिली. त्या मुलींशी बोलत बोलत त्यांनी केलेले कलाकुसरीचे काम मी पाहत होते. त्यांच्यापैकी काही मुली दहावीची परीक्षासुद्धा उत्तीर्ण झालेल्या होत्या; पण आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्या पुढचे शिक्षण घेऊ शकल्या नव्हत्या. इतर मुलांबरोबर त्यांनाही प्रतिभाताईंनी शिवणकाम, भरतकाम, विणकाम शिकविले. गावातील ज्या बायकांना ही कला अवगत होती, त्यांचीही मदत



# २१. नवी दिशा

सकाळी चहा पीत असताना वर्तमानपत्राच्या पहिल्याच पानावरील ठळक बातमी मला वाचायला मिळाली. ''प्रतिभाताईंना 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान.'' शेजारीच त्यांचा फोटो हाता व त्यांच्या कार्याचा थोडासा परिचय होता. तो वाचल्यावर त्यांच्याबद्दल माझे कुतूहल जागृत झाले. त्यांना भेटायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्या गावी गेले. गाव म्हणजे खेडेगावच ते! रहदारी जास्त नव्हती. रस्त्यावर काही मुले खेळत होती. त्यांना मी प्रतिभाताईंचे घर विचारताच एकाने मला त्यांच्या वाड्यावर नेले. ''मोठी आई. कुणी आलंय बघा!'' असं सांगून तो निघून गेला.

चिऱ्यांनी बांधलेला तो प्रचंड वाडा प्रतिभाताईंच्या वैभवाची साक्ष देत होता. मोठ्या दरवाज्यातून मी आत शिरले. प्रतिभाताई एका छोट्या बाळाला मांडीवर घेऊन खेळवत होत्या. एवढ्या श्रीमंत पण राहणी फारच साधी होती त्यांची! मला पाहताच बाळाला घेऊन त्या पुढे आल्या. माझं स्वागत केलं. साखरपाणी दिलं. मी त्यांचे अभिनंदन केले. माझा परिचय करू दिला व त्यांचे काम पाहिण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही बोलत बोलत एका खोलीपाशी पोहोचलो. त्या खोलीत लहान मुले खेळत होती. काहीजण खाऊ खात होती. एका मुलाला एक बाई मांडीवर घेऊन थोपटत होती. ह्या मुलांबद्दल चौकशी करता कळले की, ती गावातील शेतकऱ्यांची मुले होती. जे नवरा-बायको शेतात दिवसभर कामे करतात. त्यांच्या त्या छोट्या बालकांना सांभाळणारे घरी कोणी नव्हते. प्रतिभाताईंनी ती जबाबदारी स्वीकारली. सकाळी त्या मुलांचे आईवडील त्यांना तिथे सोडून जातात व संध्याकाळी येऊन घेऊन जातात. आम्ही खोलीत प्रवेश करताच ती छोटी मुले प्रतिभाताईंकडे धावत आली. त्यावरूनच प्रतिभाताईंनी मुलांना लावलेला लळा जाणवला. मी कौतुकाने ते सर्व पहात होते.

प्रतिभाताईने त्या छोट्यांना तेथील बाईच्या हवाली केले आणि मला दुसऱ्या खोलीत नेले. ती खोली भरतकामाच्या विविध नमुन्यांनी सजवलेली होती. गावातील दहा बारा मुली तिथे हसत, गप्पा मारत आपले विणकाम, भरतकाम, शिवणकाम करत बसल्या होत्या. प्रतिभाताईंनी त्यांच्याशी ओळख करून दिली. त्या मुलींशी बोलत बोलत त्यांनी केलेले कलाकुसरीचे काम मी पाहत होते. त्यांच्यापैकी काही मुली दहावीची परीक्षासुद्धा उत्तीर्ण झालेल्या होत्या; पण आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्या पुढचे शिक्षण घेऊ शकल्या नव्हत्या. इतर मुलांबरोबर त्यांनाही प्रतिभाताईंनी शिवणकाम, भरतकाम, विणकाम शिकविले. गावातील ज्या बायकांना ही कला अवगत होती, त्यांचीही मदत

६५

घेतली. अशाप्रकारे त्यांच्या फुरसतीचा वेळ सत्कारणी लावला व त्यांना उत्पन्नाचा मार्ग दाखवून दिला. आता प्रतिभाताई शहरात जाऊन तेथील काही दुकानदारांना त्यांच्या मागणीनुसार वस्तू तयार करून माफक किंमतीत पुरवतात. आलेल्या रकमेची वाटणी करून त्या मुलींच्या नावे ते पैसे बँकेत त्यांच्या खात्यावर भरतात. प्रतिभाताईंबद्दल हे सांगत असताना त्यांच्याबद्दलची कृतज्ञता मुलींच्या बोलण्यातून जाणवत होती. प्रतिभाताईंच्या या कल्पकतेचे मला फार नवल वाटले.

त्या वस्तू पाहत असतानाच खमंग पदार्थांचा वास आला आणि तोंडाला पाणी सुटले. इतक्यात प्रतिभाताईंचे बोलावणे आले. म्हणून मी स्वयंपाकघरात गेले. स्वयंपाकघरातील बायकांना प्रतिभाताई सूचना देत होत्या. मला पाहताच त्यांनी काही गरम गरम खाद्यपदार्थ माझ्यासमोर ठेवले. त्या बायकांची चौकशी केली असता प्रतिभाताईंनी सांगितले की, त्याही गावातील शिक्षित पण नोकरी न करणाऱ्या बायका होत्या. त्या बायकांनाही एकत्र आणून प्रतिभाताईंनी निरनिराळे खाद्यपदार्थ शिकवले. आता त्या बायका गावातील इस्पितळांना, शाळांना हे पदार्थ पुरवतात. शिवाय परगावातून नोकरीसाठी येणाऱ्या लोकांनाही जेवणाचे डबे पाठवतात.

एवढ्या मोठ्या घराण्यातील सुशिक्षित अशा या प्रतिभाताईंनी आल्या शिक्षणाचा व वेळेचा किती चांगला उपयोग केला. मीसुद्धा सुशिक्षित, मलाही पुरेसा वेळ असतो, पण असं काही करण्याचा विचार मला कधी सुचलाच नाही. प्रतिभाताईंनी मला दिशा दाखवली.

प्रतिभाताईंचा निरोप घेऊन त्या छोट्या मुलाने मघाशी घातलेली साद मला आठवली. 'मोठी आई.'

---

**शब्दार्थ**

**माफक किंमत–** योग्य किंमत

**वाक्प्रचार**

**तोंडाला पाणी सुटणे –** खाण्याची इच्छा होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वर्तमानपत्रामध्ये लेखिकेने कोणती बातमी वाचली?
२) प्रतिभाताईंच्या वाड्यात गावातील मुली कोणते काम करतात?
३) गावातील स्त्रिया तयार केलेले पदार्थ कुणाकुणाला पुरवितात?
४) प्रतिभाताईंचा निरोप घेताना लेखिकेला कोणती आठवण झाली?



घेतली. अशाप्रकारे त्यांच्या फुरसतीचा वेळ सत्कारणी लावला व त्यांना उत्पन्नाचा मार्ग दाखवून दिला. आता प्रतिभाताई शहरात जाऊन तेथील काही दुकानदारांना त्यांच्या मागणीनुसार वस्तू तयार करून माफक किंमतीत पुरवतात. आलेल्या रकमेची वाटणी करून त्या मुलींच्या नावे ते पैसे बँकेत त्यांच्या खात्यावर भरतात. प्रतिभाताईंबद्दल हे सांगत असताना त्यांच्याबद्दलची कृतज्ञता मुलींच्या बोलण्यातून जाणवत होती. प्रतिभाताईंच्या या कल्पकतेचे मला फार नवल वाटले.

त्या वस्तू पाहत असतानाच खमंग पदार्थांचा वास आला आणि तोंडाला पाणी सुटले. इतक्यात प्रतिभाताईंचे बोलावणे आले. म्हणून मी स्वयंपाकघरात गेले. स्वयंपाकघरातील बायकांना प्रतिभाताई सूचना देत होत्या. मला पाहताच त्यांनी काही गरम गरम खाद्यपदार्थ माझ्यासमोर ठेवले. त्या बायकांची चौकशी केली असता प्रतिभाताईंनी सांगितले की, त्याही गावातील शिक्षित पण नोकरी न करणाऱ्या बायका होत्या. त्या बायकांनाही एकत्र आणून प्रतिभाताईंनी निरनिराळे खाद्यपदार्थ शिकवले. आता त्या बायका गावातील इस्पितळांना, शाळांना हे पदार्थ पुरवतात. शिवाय परगावातून नोकरीसाठी येणाऱ्या लोकांनाही जेवणाचे डबे पाठवतात.

एवढ्या मोठ्या घराण्यातील सुशिक्षित अशा या प्रतिभाताईंनी आल्या शिक्षणाचा व वेळेचा किती चांगला उपयोग केला. मीसुद्धा सुशिक्षित, मलाही पुरेसा वेळ असतो, पण असं काही करण्याचा विचार मला कधी सुचलाच नाही. प्रतिभाताईंनी मला दिशा दाखवली.

प्रतिभाताईंचा निरोप घेऊन त्या छोट्या मुलाने मघाशी घातलेली साद मला आठवली. 'मोठी आई.'

---

**शब्दार्थ**

**माफक किंमत–** योग्य किंमत

**वाक्प्रचार**

**तोंडाला पाणी सुटणे –** खाण्याची इच्छा होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वर्तमानपत्रामध्ये लेखिकेने कोणती बातमी वाचली?
२) प्रतिभाताईंच्या वाड्यात गावातील मुली कोणते काम करतात?
३) गावातील स्त्रिया तयार केलेले पदार्थ कुणाकुणाला पुरवितात?
४) प्रतिभाताईंचा निरोप घेताना लेखिकेला कोणती आठवण झाली?

६६

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) लेखिकेला प्रतिभाताईंबद्दल कुतूहल का वाटले?
२) प्रतिभाताई लहान मुलांना का सांभाळतात?
३) गावातील मुलींना प्रतिभाताईंनी उत्पन्नाचा मार्ग कसा दाखवला?
४) प्रतिभाताईंचे कार्य पाहून लेखिकेच्या मनात कोणते विचार आले?

**व्यवसाय**

**खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(का कू करणे, नावारुपाला येणे, कानउघाडणी करणे, नाक घासणे, आकाश ठेंगणे होणे)

१) माणसांनी आपल्या सत्कर्माने........
२) विद्यार्थ्यांनी अभ्यास करायला.........
३) वडिलांनी............मुळे सतीश व्यवस्थित वागू लागला.
४) पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय फौजेपुढे...........
५) वार्षिक परीक्षेत पहिला क्रमांक मिळाल्यामुळे मीनलला.......

●●●



**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) लेखिकेला प्रतिभाताईंबद्दल कुतूहल का वाटले?
२) प्रतिभाताई लहान मुलांना का सांभाळतात?
३) गावातील मुलींना प्रतिभाताईंनी उत्पन्नाचा मार्ग कसा दाखवला?
४) प्रतिभाताईंचे कार्य पाहून लेखिकेच्या मनात कोणते विचार आले?

**व्यवसाय**


**खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(का कू करणे, नावारुपाला येणे, कानउघाडणी करणे, नाक घासणे, आकाश ठेंगणे होणे)

१) माणसांनी आपल्या सत्कर्माने........
२) विद्यार्थ्यांनी अभ्यास करायला.........
३) वडिलांनी............मुळे सतीश व्यवस्थित वागू लागला.
४) पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय फौजेपुढे...........
५) वार्षिक परीक्षेत पहिला क्रमांक मिळाल्यामुळे मीनलला.......

●●●

# २२. युगपुरुष



महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'आंबावडे' हे एक गाव. गावाबाहेर गरीब लोकांची छोटीशी वस्ती. त्यातील एका कुटुंबात १४ एप्रिल १८९१ रोजी भीमराव आंबेडकरांचा जन्म मध्य प्रदेशातील 'महू' गावी झाला. लहानपणापासून ते कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांना शिक्षणाची आवड होती.


असाच एक प्रसंग. त्या दिवशी धो-धो पाऊस सुरू झाला. अशा पावसात बाहेर पडणे मुश्कील होते. भीमरावांना तर शाळेला जायचे होते. पण छत्री होती कुठे त्यांच्याजवळ? तशा पावसात ते भिजतच गेले.

बालपणापासून भीमरावांना वाचनाचे वेड होते. त्यांचे वडील रामजी त्यांना पुस्तके विकत आणून देत. त्यासाठी कधी कधी घरची एखादी वस्तू गहाण ठेवावी लागे. अशा प्रकारे त्याचे वडील त्यांच्या वाचनाची भूक शमवीत. मोठेपणीसुद्धा त्यांच्या वाचनाचे हे वेड कमी झाले नाही. ज्ञान संपादन करण्यात ते नेहमी दंग असत. विविध पुस्तकांच्या ते शोधात असत. पुढे मोठेपणीसुद्धा वेळात वेळ काढून ते ठिकठिकाणच्या पुस्तकालयांना भेटी देत. पुस्तके चाळता चाळता कधी कधी तेथेच एखादे पुस्तक वाचण्यात ते रमत.

आंबेडकरांनी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांची पुढील शिक्षणासाठी




# २२. युगपुरुष


महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'आंबावडे' हे एक गाव. गावाबाहेर गरीब लोकांची छोटीशी वस्ती. त्यातील एका कुटुंबात १४ एप्रिल १८९१ रोजी भीमराव आंबेडकरांचा जन्म मध्य प्रदेशातील 'महू' गावी झाला. लहानपणापासून ते कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांना शिक्षणाची आवड होती.

असाच एक प्रसंग. त्या दिवशी धो-धो पाऊस सुरू झाला. अशा पावसात बाहेर पडणे मुश्कील होते. भीमरावांना तर शाळेला जायचे होते. पण छत्री होती कुठे त्यांच्याजवळ? तशा पावसात ते भिजतच गेले.

बालपणापासून भीमरावांना वाचनाचे वेड होते. त्यांचे वडील रामजी त्यांना पुस्तके विकत आणून देत. त्यासाठी कधी कधी घरची एखादी वस्तू गहाण ठेवावी लागे. अशा प्रकारे त्याचे वडील त्यांच्या वाचनाची भूक शमवीत. मोठेपणीसुद्धा त्यांच्या वाचनाचे हे वेड कमी झाले नाही. ज्ञान संपादन करण्यात ते नेहमी दंग असत. विविध पुस्तकांच्या ते शोधात असत. पुढे मोठेपणीसुद्धा वेळात वेळ काढून ते ठिकठिकाणच्या पुस्तकालयांना भेटी देत. पुस्तके चाळता चाळता कधी कधी तेथेच एखादे पुस्तक वाचण्यात ते रमत.

आंबेडकरांनी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांची पुढील शिक्षणासाठी

६८

अमेरिकेला जायची खूप इच्छा. अडचणी तर फार. पण म्हणतात ना, ''इच्छा असेल तर मार्ग दिसेल.'' घडलेही तसेच. त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांकडून व कोल्हापूरच्या शाहू महाराजांकडून आर्थिक मदत मिळाली. त्या मदतीवरच पोटाला चिमटा काढून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

मायदेशी परतल्यानंतर बडोद्याला ते नोकरीला राहिले. पण तेथील नोकरीत त्यांना कटू अनुभव आले. दलित म्हणून त्यांना कोणी सहकार्य देत नव्हते. अखेर कंटाळून त्यांनी त्या नोकरीवर पाणी सोडले.

त्याकाळी उच्चवर्णीयांकडून दलितांना अन्यायकारक वागणूक मिळत असे. ते पाहून डॉ. आंबेडकरांना चीड येई. आपल्या दलित बांधवांना न्याय मिळवून देण्याचा त्यांना निर्धार केला. दलितांवरील अत्याचार व अन्यायाविरुद्ध ते सतत लढले. त्यांनी दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. त्यांचे अज्ञान दूर केले. त्यांच्यात एकजूट निर्माण केली. दीनदलितांचे दुःख सर्वांना कळावे म्हणून त्यांनी 'मूकनायक' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. त्यातूनच त्यांनी साऱ्या दलित बांधवांना अन्यायाविरुद्ध लढवण्यासाठी जागृत केले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

लोकांच्या आत्मविश्वासावरच आंबेडकरांनी 'चवदार तळ्याचा' सत्याग्रह केला. ते तळे महाड येथे आहे. लोक त्या तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेऊ देत नसत. ते मिळविण्यासाठी आंबेडकरांनी अस्पृश्यांना सत्याग्रहासाठी तयार केले. एके दिवशी सर्व सत्याग्रहींसह तळ्यात उतरून त्यांनी पाण्याला स्पर्श केला. सर्वजण पाणी प्याले. चवदार तळ्याचा सत्याग्रह यशस्वी झाला. दलितांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या डॉ. आंबेडकरांना लोक आदराने 'बाबासाहेब' म्हणू लागले.

आपला भारतदेश पारतंत्र्यात होता. भारतात इंग्रजांची राजवट होती. बाबासाहेबांसारख्या अनेक थोर नेत्यांच्या प्रयत्नाने देश स्वतंत्र झाला. आपल्या देशातील जनतेने देशाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालवायचा असे ठरविले. ''लोकांचे, लोकांनी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही.'' आपल्या देशाने लोकशाही राज्यपद्धतीचा अवलंब केला. देशाचा राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी राज्यघटना तयार करण्यात आली. ती तयार करण्याच्या कामामध्ये डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता. म्हणून तर त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हणतात.'

देशात लोकशाही यशस्वी होण्यासाठी तसेच दलितांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अखेरपर्यंत झटले. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' ही सर्वश्रेष्ठ मानाची पदवी देऊन त्यांच्या कार्याबद्दल गौरव केला आहे.



अमेरिकेला जायची खूप इच्छा. अडचणी तर फार. पण म्हणतात ना, ''इच्छा असेल तर मार्ग दिसेल.'' घडलेही तसेच. त्यांना बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांकडून व कोल्हापूरच्या शाहू महाराजांकडून आर्थिक मदत मिळाली. त्या मदतीवरच पोटाला चिमटा काढून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

मायदेशी परतल्यानंतर बडोद्याला ते नोकरीला राहिले. पण तेथील नोकरीत त्यांना कटू अनुभव आले. दलित म्हणून त्यांना कोणी सहकार्य देत नव्हते. अखेर कंटाळून त्यांनी त्या नोकरीवर पाणी सोडले.

त्याकाळी उच्चवर्णीयांकडून दलितांना अन्यायकारक वागणूक मिळत असे. ते पाहून डॉ. आंबेडकरांना चीड येई. आपल्या दलित बांधवांना न्याय मिळवून देण्याचा त्यांना निर्धार केला. दलितांवरील अत्याचार व अन्यायाविरुद्ध ते सतत लढले. त्यांनी दलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. त्यांचे अज्ञान दूर केले. त्यांच्यात एकजूट निर्माण केली. दीनदलितांचे दुःख सर्वांना कळावे म्हणून त्यांनी 'मूकनायक' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. त्यातूनच त्यांनी साऱ्या दलित बांधवांना अन्यायाविरुद्ध लढवण्यासाठी जागृत केले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

लोकांच्या आत्मविश्वासावरच आंबेडकरांनी 'चवदार तळ्याचा' सत्याग्रह केला. ते तळे महाड येथे आहे. लोक त्या तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेऊ देत नसत. ते मिळविण्यासाठी आंबेडकरांनी अस्पृश्यांना सत्याग्रहासाठी तयार केले. एके दिवशी सर्व सत्याग्रहींसह तळ्यात उतरून त्यांनी पाण्याला स्पर्श केला. सर्वजण पाणी प्याले. चवदार तळ्याचा सत्याग्रह यशस्वी झाला. दलितांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या डॉ. आंबेडकरांना लोक आदराने 'बाबासाहेब' म्हणू लागले.

आपला भारतदेश पारतंत्र्यात होता. भारतात इंग्रजांची राजवट होती. बाबासाहेबांसारख्या अनेक थोर नेत्यांच्या प्रयत्नाने देश स्वतंत्र झाला. आपल्या देशातील जनतेने देशाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालवायचा असे ठरविले. ''लोकांचे, लोकांनी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही.'' आपल्या देशाने लोकशाही राज्यपद्धतीचा अवलंब केला. देशाचा राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी राज्यघटना तयार करण्यात आली. ती तयार करण्याच्या कामामध्ये डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता. म्हणून तर त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हणतात.'

देशात लोकशाही यशस्वी होण्यासाठी तसेच दलितांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अखेरपर्यंत झटले. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' ही सर्वश्रेष्ठ मानाची पदवी देऊन त्यांच्या कार्याबद्दल गौरव केला आहे.

६९

**शब्दार्थ**

**कुशाग्र–** तीक्ष्ण, **शमविणे–** शांत करणे

**वाक्प्रचार**

**पोटाला चिमटा काढणे –** काटकसरीने जगणे, **पाणी सोडणे–** त्याग करणे, **सिंहाचा वाटा असणे–** एखाद्या कार्यात महत्त्वाचा सहभाग असणे, **प्राणज्योत मालवणे–** मरण येणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी आंबेडकरांना कोणी कोणी मदत केली?
२) आंबेडकरांना कोणत्या गोष्टीची चीड येई?
३) आंबेडकरांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे का म्हणतात?
४) लोकशाही म्हणजे काय?
५) भारत सरकारने आंबेडकरांच्या कार्याचा गौरव कसा केला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) आंबेडकरांनी वाचनाची हौस पुरविण्यासाठी त्यांच्या वडिलांनी काय काय केले?
२) आंबेडकरांनी बडोद्यातील नोकरी का सोडली?
३) आंबेडकरांनी 'मूकनायक' वर्तमानपत्र का सुरू केले?

**व्यवसाय**

**कंसात दिलेले शब्द निवडून खालील उताऱ्यातील रिकाम्या जागा भरा.**

(माणूस, बाबासाहेब, शिल्पकार, आत्मविश्वास, सिंहाचा वाटा, कुशाग्र, जागृत, वाचनालयांना)
डॉ. आंबेडकर लहानपणापासून................बुद्धिमत्तेचे होते. ते वेळात वेळ काढून ठिकठिकाणच्या ........भेटी देत. त्यांनी साऱ्या दलित बांधवांना अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ............ केले. आपल्या कार्याद्वारे त्यांनी दलितांमध्ये............म्हणून जगण्याचा......निर्माण केला. लोक आता त्यांना आदराने आणि प्रेमाने...........म्हणून ओळखू लागले. देशाची राज्यघटना तयार करण्याच्या कामामध्ये आंबेडकरांचा.........होता. म्हणून तर त्यांना 'भारतीय राज्य घटनेचे...........' असे म्हणतात.

**उपक्रम**

'आंबेडकरांचे जीवन कार्य' या विषयावर दहा वाक्ये लिहा.



**शब्दार्थ**

**कुशाग्र–** तीक्ष्ण, **शमविणे–** शांत करणे

**वाक्प्रचार**

**पोटाला चिमटा काढणे –** काटकसरीने जगणे, **पाणी सोडणे–** त्याग करणे, **सिंहाचा वाटा असणे–** एखाद्या कार्यात महत्त्वाचा सहभाग असणे, **प्राणज्योत मालवणे–** मरण येणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी आंबेडकरांना कोणी कोणी मदत केली?
२) आंबेडकरांना कोणत्या गोष्टीची चीड येई?
३) आंबेडकरांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे का म्हणतात?
४) लोकशाही म्हणजे काय?
५) भारत सरकारने आंबेडकरांच्या कार्याचा गौरव कसा केला?

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) आंबेडकरांनी वाचनाची हौस पुरविण्यासाठी त्यांच्या वडिलांनी काय काय केले?
२) आंबेडकरांनी बडोद्यातील नोकरी का सोडली?
३) आंबेडकरांनी 'मूकनायक' वर्तमानपत्र का सुरू केले?

**व्यवसाय**

**कंसात दिलेले शब्द निवडून खालील उताऱ्यातील रिकाम्या जागा भरा.**

(माणूस, बाबासाहेब, शिल्पकार, आत्मविश्वास, सिंहाचा वाटा, कुशाग्र, जागृत, वाचनालयांना)
डॉ. आंबेडकर लहानपणापासून................बुद्धिमत्तेचे होते. ते वेळात वेळ काढून ठिकठिकाणच्या ........भेटी देत. त्यांनी साऱ्या दलित बांधवांना अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ............ केले. आपल्या कार्याद्वारे त्यांनी दलितांमध्ये............म्हणून जगण्याचा......निर्माण केला. लोक आता त्यांना आदराने आणि प्रेमाने...........म्हणून ओळखू लागले. देशाची राज्यघटना तयार करण्याच्या कामामध्ये आंबेडकरांचा.........होता. म्हणून तर त्यांना 'भारतीय राज्य घटनेचे...........' असे म्हणतात.

**उपक्रम**

'आंबेडकरांचे जीवन कार्य' या विषयावर दहा वाक्ये लिहा.

७०

# २३. दक्षिण गंगोत्री

आपल्या पृथ्वीचे दक्षिणे टोक म्हणजे दक्षिणध्रुव. त्याच्या सभोवतालच्या प्रदेशाला 'अंटार्क्टिका' म्हणतात. आपल्या देशापासून हा प्रदेश सुमारे अकरा हजार किलोमीटर अंतरावर आहे. अंटार्क्टिका सर्वात जास्त थंड असून तेथे सर्वात जास्त वादळी वारे वाहतात. सगळीकडे बर्फच बर्फ पसरलेला असतो. शास्त्रज्ञ येथील बर्फाच्या थराखाली असलेल्या समुद्राचा अभ्यास करून फार उपयुक्त अशी माहिती मिळवितात. हवामानाचा अचूक अंदाज करावयाचा असेल तर अंटार्क्टिका हे उपयुक्त असे ठिकाण आहे. शिवाय येथे नैसगिरक संपत्ती विपुल प्रमाणात आहे.

अंटार्क्टिकावर पोहोचणे अतिशय अवघड. वाटेत खवळलेला समुद्र लागतो. येथील लाटा दहा-पंधरा मीटर उंचीच्या असतात. वेगवान वारे वाहत असतात. हा समुद्र पार केल्यावर शांत समुद्रातील प्रवास सुरू होतो. येथून पुढे कडक थंडीला सुरुवात होते. येथील थंडीमुळे जहाजांचे इंजिनही बंद पडण्याची शक्यता असते.

अंटार्क्टिकाजवळील शांत समुद्रात पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या टेकड्या दिसतात. या टेकड्यांना 'हिमनग' असे म्हणतात. हिमनग पाण्यावर तरंगत असतात. त्यांचा आकार प्रचंड असतो. हिमनगाचा एक अष्टमांश भाग पाण्यावर व सात अष्टमांश भाग पाण्याखाली असतो. कधी कधी हिमनगांशी टक्कर होऊन जहाजे फुटतात. या हिमनगातून वाट काढत जाणे जहाजांना अवघड असते. अंटार्क्टिकावर जाणाऱ्या प्रत्येक जहाजाला बर्फ फोडत जाणारी यंत्रे बसविलेली असतात.

अंटार्क्टिकावर जिकडे पहावे तिकडे बर्फच बर्फ! बर्फावरून चालतेवेळी फार काळजी घ्यावी लागते. पायाखालच्या बर्फाचा टणकपणा प्रथम ओळखावा लागतो. पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी पुन्हा खात्री करून घ्यावी लागते. बर्फाला काही ठिकाणी भेगा पडलेल्या असतात. या भेगेत जर एखादी वस्तू पडली तर ती तळाला गेलीच म्हणून समजावे.

बर्फ वितळतो त्यावेळी पाण्याचा प्रवाह सुरू होतो. या प्रवाहातून बर्फाचे बारीक तुकडे वाहत जातात. या प्रवाहातून बर्फाचे बारीक तुकडे वाहत जातात. या प्रवाहाला 'हिमनदी' असे म्हणतात. हिमनदीच्या प्रवाहाचा शास्त्रज्ञ संशोधनासाठी उपयोग करतात.

आपल्याकडे रात्र व दिवस चोवीस तासांचा असतो. अंटार्क्टिकावर मात्र सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र असते. मार्च ते ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण काळोख असतो. सप्टेंबर ते फेब्रुवारी या सहा महिन्यात सतत सूर्यदर्शन होत असते.



# २३. दक्षिण गंगोत्री

आपल्या पृथ्वीचे दक्षिणे टोक म्हणजे दक्षिणध्रुव. त्याच्या सभोवतालच्या प्रदेशाला 'अंटार्क्टिका' म्हणतात. आपल्या देशापासून हा प्रदेश सुमारे अकरा हजार किलोमीटर अंतरावर आहे. अंटार्क्टिका सर्वात जास्त थंड असून तेथे सर्वात जास्त वादळी वारे वाहतात. सगळीकडे बर्फच बर्फ पसरलेला असतो. शास्त्रज्ञ येथील बर्फाच्या थराखाली असलेल्या समुद्राचा अभ्यास करून फार उपयुक्त अशी माहिती मिळवितात. हवामानाचा अचूक अंदाज करावयाचा असेल तर अंटार्क्टिका हे उपयुक्त असे ठिकाण आहे. शिवाय येथे नैसगिरक संपत्ती विपुल प्रमाणात आहे.

अंटार्क्टिकावर पोहोचणे अतिशय अवघड. वाटेत खवळलेला समुद्र लागतो. येथील लाटा दहा-पंधरा मीटर उंचीच्या असतात. वेगवान वारे वाहत असतात. हा समुद्र पार केल्यावर शांत समुद्रातील प्रवास सुरू होतो. येथून पुढे कडक थंडीला सुरुवात होते. येथील थंडीमुळे जहाजांचे इंजिनही बंद पडण्याची शक्यता असते.

अंटार्क्टिकाजवळील शांत समुद्रात पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या टेकड्या दिसतात. या टेकड्यांना 'हिमनग' असे म्हणतात. हिमनग पाण्यावर तरंगत असतात. त्यांचा आकार प्रचंड असतो. हिमनगाचा एक अष्टमांश भाग पाण्यावर व सात अष्टमांश भाग पाण्याखाली असतो. कधी कधी हिमनगांशी टक्कर होऊन जहाजे फुटतात. या हिमनगातून वाट काढत जाणे जहाजांना अवघड असते. अंटार्क्टिकावर जाणाऱ्या प्रत्येक जहाजाला बर्फ फोडत जाणारी यंत्रे बसविलेली असतात.

अंटार्क्टिकावर जिकडे पहावे तिकडे बर्फच बर्फ! बर्फावरून चालतेवेळी फार काळजी घ्यावी लागते. पायाखालच्या बर्फाचा टणकपणा प्रथम ओळखावा लागतो. पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी पुन्हा खात्री करून घ्यावी लागते. बर्फाला काही ठिकाणी भेगा पडलेल्या असतात. या भेगेत जर एखादी वस्तू पडली तर ती तळाला गेलीच म्हणून समजावे.

बर्फ वितळतो त्यावेळी पाण्याचा प्रवाह सुरू होतो. या प्रवाहातून बर्फाचे बारीक तुकडे वाहत जातात. या प्रवाहातून बर्फाचे बारीक तुकडे वाहत जातात. या प्रवाहाला 'हिमनदी' असे म्हणतात. हिमनदीच्या प्रवाहाचा शास्त्रज्ञ संशोधनासाठी उपयोग करतात.


आपल्याकडे रात्र व दिवस चोवीस तासांचा असतो. अंटार्क्टिकावर मात्र सहा महिन्यांचा दिवस व सहा महिन्यांची रात्र असते. मार्च ते ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण काळोख असतो. सप्टेंबर ते फेब्रुवारी या सहा महिन्यात सतत सूर्यदर्शन होत असते.

७१

आपल्याकडे सूर्य सकाळी उगवतो. दुपारी माथ्यावर येतो व संध्याकाळी मावळतो; पण अंटार्क्टिकावर तसे नाही. सूर्य क्षितिजाच्या जवळच दिसतो. हे दृश्य नयनमनोहर असते.

अंटार्क्टिकाचा प्रदेश विस्तीर्ण पठारासारखा आहे. काही ठिकाणी बर्फाचे उंचवटे दिसतात. येथे मनुष्यवस्ती नाही. समुद्रात शेवाळासारखी निळसर पाणवनस्पती आढळते. अधूनमधून विविधरंगी सागरपक्ष्यांचे दर्शन होते. हे पक्षी समुद्रात सूर मारून आपले अन्न शोधत असतात. ऋतुमानाप्रमाणे हे पक्षी स्थलांतर करतात.

अंटार्क्टिकावर आढळणारा खास पक्षी म्हणजे पेंग्विन. हा दिसायला अतिशय देखणा. एक ते दीड मीटर उंचीचा असतो. याची पाठ काळी व पोट पांढरे असते. पंख आखूड असतात. पक्षी असूनही याला उडता येत नाही. चालताना लहान मुलासारखा लुटूलुटू चालतो. गटागटाने चालणारे पेंग्विन पाहिले तर सैनिकांचे संचलन चालू आहे असे वाटते. दोन पायांवर उभे असलेले पेंग्विन लांबून पाहिले तर अंगावर कोट चढवलेली माणसेच






आपल्याकडे सूर्य सकाळी उगवतो. दुपारी माथ्यावर येतो व संध्याकाळी मावळतो; पण अंटार्क्टिकावर तसे नाही. सूर्य क्षितिजाच्या जवळच दिसतो. हे दृश्य नयनमनोहर असते.

अंटार्क्टिकाचा प्रदेश विस्तीर्ण पठारासारखा आहे. काही ठिकाणी बर्फाचे उंचवटे दिसतात. येथे मनुष्यवस्ती नाही. समुद्रात शेवाळासारखी निळसर पाणवनस्पती आढळते. अधूनमधून विविधरंगी सागरपक्ष्यांचे दर्शन होते. हे पक्षी समुद्रात सूर मारून आपले अन्न शोधत असतात. ऋतुमानाप्रमाणे हे पक्षी स्थलांतर करतात.

अंटार्क्टिकावर आढळणारा खास पक्षी म्हणजे पेंग्विन. हा दिसायला अतिशय देखणा. एक ते दीड मीटर उंचीचा असतो. याची पाठ काळी व पोट पांढरे असते. पंख आखूड असतात. पक्षी असूनही याला उडता येत नाही. चालताना लहान मुलासारखा लुटूलुटू चालतो. गटागटाने चालणारे पेंग्विन पाहिले तर सैनिकांचे संचलन चालू आहे असे वाटते. दोन पायांवर उभे असलेले पेंग्विन लांबून पाहिले तर अंगावर कोट चढवलेली माणसेच



७२

उभी आहेत असा भास होतो. या पेंग्विन पक्ष्यांना भीती कशी ती माहीतच नसावी. अंटार्क्टिकावर गेलेल्या वैज्ञानिकांशी ते दोस्ती करतात. मात्र त्यांच्या कोणत्याही वस्तूस ते स्पर्श करीत नाहीत.

क्रिल, सील व व्हेल हे जलचर प्राणी इथे आढळतात. हे प्राणी आकाराने मोठे असतात. सील हे पशूंच्या जातीचे प्राणी आहेत. या प्राण्यांचे समुद्राच्या पाण्यातच वास्तव्य असते. थंडीपासून बचाव करण्यासाठी निसर्गाने त्यांच्या अंगावर चरबीचे थर निर्माण केले आहेत.

पृथ्वीवरील अनेक राष्ट्रांना या खंडाचे आकर्षण आहे. भारतीय शास्त्रज्ञांनाही या खंडाविषयी जिज्ञासा होती. म्हणून डिसेंबर १९८१ मध्ये अंटार्क्टिकावर पहिली मोहीम काढली. या मोहिमेसाठी खास बनविलेले जहाज उपयोगात आणले होते. जहाजाचे नाव होते 'पोलर सर्कल', भारताच्या सागर संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. कासिम यांनी शास्त्रज्ञांच्या तुकडीचे नेतृत्व केले होते. पहिली मोहीम फत्ते झाली. भारताचा तिरंगा तेथे फडकविण्यात आला. कायम स्वरूपाचे संशोधन केंद्र उभारण्यात आले. नाव दिले गेले, 'दक्षिण गंगोत्री.'

---

**शब्दार्थ**

**विस्तीर्ण–** पसरलेला, **स्थलांतर–** जागा बदलणे, **मोहीम–** सामुदायिकरीतीने करावयाचे काम.

**वाक्प्रचार–**

**फत्ते होणे–** यशस्वी होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिमनग म्हणजे काय?
२) अंटार्क्टिकावर जाणाऱ्या जहाजाला बर्फातून जाण्यासाठी कोणती सोय केलेली असते?
३) अंटार्क्टिकावर दिवस व रात्र यांचा कालावधी किती असतो?
४) सील या प्राण्याचा थंडीपासून बचाव कसा होतो?
५) भारताने अंटार्क्टिकावर पहिली मोहीम केव्हा काढली?
६) अंटार्क्टिकावरील संशोधन केंद्रास कोणते नाव देण्यात आले आहे?



उभी आहेत असा भास होतो. या पेंग्विन पक्ष्यांना भीती कशी ती माहीतच नसावी. अंटार्क्टिकावर गेलेल्या वैज्ञानिकांशी ते दोस्ती करतात. मात्र त्यांच्या कोणत्याही वस्तूस ते स्पर्श करीत नाहीत.

क्रिल, सील व व्हेल हे जलचर प्राणी इथे आढळतात. हे प्राणी आकाराने मोठे असतात. सील हे पशूंच्या जातीचे प्राणी आहेत. या प्राण्यांचे समुद्राच्या पाण्यातच वास्तव्य असते. थंडीपासून बचाव करण्यासाठी निसर्गाने त्यांच्या अंगावर चरबीचे थर निर्माण केले आहेत.

पृथ्वीवरील अनेक राष्ट्रांना या खंडाचे आकर्षण आहे. भारतीय शास्त्रज्ञांनाही या खंडाविषयी जिज्ञासा होती. म्हणून डिसेंबर १९८१ मध्ये अंटार्क्टिकावर पहिली मोहीम काढली. या मोहिमेसाठी खास बनविलेले जहाज उपयोगात आणले होते. जहाजाचे नाव होते 'पोलर सर्कल', भारताच्या सागर संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. कासिम यांनी शास्त्रज्ञांच्या तुकडीचे नेतृत्व केले होते. पहिली मोहीम फत्ते झाली. भारताचा तिरंगा तेथे फडकविण्यात आला. कायम स्वरूपाचे संशोधन केंद्र उभारण्यात आले. नाव दिले गेले, 'दक्षिण गंगोत्री.'

**शब्दार्थ**

**विस्तीर्ण–** पसरलेला, **स्थलांतर–** जागा बदलणे, **मोहीम–** सामुदायिकरीतीने करावयाचे काम.

**वाक्प्रचार–**

**फत्ते होणे–** यशस्वी होणे.

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिमनग म्हणजे काय?
२) अंटार्क्टिकावर जाणाऱ्या जहाजाला बर्फातून जाण्यासाठी कोणती सोय केलेली असते?
३) अंटार्क्टिकावर दिवस व रात्र यांचा कालावधी किती असतो?
४) सील या प्राण्याचा थंडीपासून बचाव कसा होतो?
५) भारताने अंटार्क्टिकावर पहिली मोहीम केव्हा काढली?
६) अंटार्क्टिकावरील संशोधन केंद्रास कोणते नाव देण्यात आले आहे?

७३

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) अंटार्क्टिकावर जाणे अवघड का असते?

२) पेंग्विन पक्ष्याचे वर्णन करा.

**उपक्रम**

तुम्ही केलेल्या किंवा पाहिलेल्या श्रमदानाचे दहा ओळीत वर्णन करा.

●●●



**प्रश्न २ : खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१) अंटार्क्टिकावर जाणे अवघड का असते?

२) पेंग्विन पक्ष्याचे वर्णन करा.

**उपक्रम**

तुम्ही केलेल्या किंवा पाहिलेल्या श्रमदानाचे दहा ओळीत वर्णन करा.

●●●

७४

# २४. पाच प्रश्न

(स्थळ : अकबर बादशहाचा दरबार. बेगमसाहिबाचा भाऊ शेख हुसेन व इतर सरदार आपापल्या आसनावर बसले आहेत. भालदार चोपदार उभे आहेत. काही सरदार आपापसात गोष्टी करीत आहेत इतक्यात–)

**पहिला सरदार** : तोबा! तोबा!! हा बिरबल आज गेला तरी कुठं? रोज तर दरबार सुरू व्हायच्या आधी हजर असतो. तरी बरे! बादशहा दरबारात अद्याप आले नाहीत.

**शेख हुसेन** : (रागाने) खामोश. बिरबल! बिरबल!! त्याचं नावसुद्धा काढू नका माझ्यासमोर. त्याच्यामुळंच तर बादशहा मला काहीच किंमत देत नाही. आमची मानहानी होते.

**दुसरा सरदार** : हुजूर. त्याच्यामुळे दरबारात आमचीही किंमत कमी झाली आहे.

**तिसरा सरदार** : अगदी बरोबर आहे हुजूर! बादशहा पूर्वीप्रमाणं आमच्याशी सल्लामसलत करीत नाहीत.

**पहिला सरदार** : आणि त्या बिरबलाशिवाय त्यांचं पानदेखील हलत नाही. त्यानं अशी कोणती जादू केली आहे बादशहांवर कोण जाणे.

**शेख हुसेन** : भाईजान, खुद्द बेगमसाहिबांचे मी भाऊ असूनसुद्धा––

**दुसरा सरदार** : हो ना. आपण बेगमसाहिबांचे लाडके बंधू असूनसुद्धा आपली ही हालत केवळ बिरलामुळंच.

**पहिला सरदार** : तो कोण कुठला बिरबल? कानामागून आला आणि तिखट झाला.

**तिसरा सरदार** : हुजूर. एकदम सच! आता असं गप्प बसून चालणार नाही.

**दुसरा सरदार** : बादशहाचीच त्याच्यावरील मर्जी कमी हाईल असं काहीतरी केलं पाहिजे.

**शेख हुसेन** : तोच विचार करतोय मी मघापासून. काय करावं बरं? बादशहाच्या मनातून बिरबल कसा उतरेल?

**पहिला सरदार** : बादशहाच्या नजरेतून बिरबल तर उतरलाच पाहिजे. मलाही तसंच वाटतं!



# २४. पाच प्रश्न

(स्थळ : अकबर बादशहाचा दरबार. बेगमसाहिबाचा भाऊ शेख हुसेन व इतर सरदार आपापल्या आसनावर बसले आहेत. भालदार चोपदार उभे आहेत. काही सरदार आपापसात गोष्टी करीत आहेत इतक्यात–)

**पहिला सरदार** : तोबा! तोबा!! हा बिरबल आज गेला तरी कुठं? रोज तर दरबार सुरू व्हायच्या आधी हजर असतो. तरी बरे! बादशहा दरबारात अद्याप आले नाहीत.

**शेख हुसेन** : (रागाने) खामोश. बिरबल! बिरबल!! त्याचं नावसुद्धा काढू नका माझ्यासमोर. त्याच्यामुळंच तर बादशहा मला काहीच किंमत देत नाही. आमची मानहानी होते.

**दुसरा सरदार** : हुजूर. त्याच्यामुळे दरबारात आमचीही किंमत कमी झाली आहे.

**तिसरा सरदार** : अगदी बरोबर आहे हुजूर! बादशहा पूर्वीप्रमाणं आमच्याशी सल्लामसलत करीत नाहीत.

**पहिला सरदार** : आणि त्या बिरबलाशिवाय त्यांचं पानदेखील हलत नाही. त्यानं अशी कोणती जादू केली आहे बादशहांवर कोण जाणे.

**शेख हुसेन** : भाईजान, खुद्द बेगमसाहिबांचे मी भाऊ असूनसुद्धा––

**दुसरा सरदार** : हो ना. आपण बेगमसाहिबांचे लाडके बंधू असूनसुद्धा आपली ही हालत केवळ बिरलामुळंच.

**पहिला सरदार** : तो कोण कुठला बिरबल? कानामागून आला आणि तिखट झाला.

**तिसरा सरदार** : हुजूर. एकदम सच! आता असं गप्प बसून चालणार नाही.

**दुसरा सरदार** : बादशहाचीच त्याच्यावरील मर्जी कमी हाईल असं काहीतरी केलं पाहिजे.

**शेख हुसेन** : तोच विचार करतोय मी मघापासून. काय करावं बरं? बादशहाच्या मनातून बिरबल कसा उतरेल?

**पहिला सरदार** : बादशहाच्या नजरेतून बिरबल तर उतरलाच पाहिजे. मलाही तसंच वाटतं!

७५

| | | |
|---|---|---|
| **शेख हुसेन** | : | आणि तसं झालं तर बादशहाची मर्जी मग माझ्यावरच. |
| **दुसरा सरदार** | : | (कुर्निसात करत) हुजूर, तेव्हा मात्र आम्हाला विसरू नका हं! |
| **शेख हुसेन** | : | हो हो! पण आधी काही तरी युक्ती शोधा. |
| | | (इतक्यात एक गुप्तहेर दरबारात येतो. शेख हुसेनला सलाम करून त्याच्या कानात काहीतरी सांगतो. शेख हुसेन पहिल्या सरदाराच्या कानात, पहिला दुसऱ्याच्या कानात असे प्रत्येकजण एक दुसऱ्याच्या कानात काहीतरी सांगतात. सर्वजण आनंदी दिसतात.) |
| **तिसरा सरदार** | : | हुजूर, ही चांगलीच संधी चालून आली आहे. ह्या संधीचा आपण फायदा घ्याल तर आपला मान नक्कीच वाढेल. |
| **शेख हुसेन** | : | (मोठ्या खुशीने) आता बघतो तो बिरबल कसा काय बादशहाच्या मर्जीत राहतो ते. |
| **पहिला सरदार** | : | पण हुजूर. याचं सारं श्रेय आपल्या ह्या गुप्तहेरालाच दिलं पाहिजे. |
| **शेख हुसेन** | : | हो तर! (गुप्तहेराकडे वळून) आम्ही अगदी खूश आहोत तुझ्यावर. (गळ्यातील कंठा काढून देत) हे घे बक्षीस. |
| **गुप्तहेर** | : | (कंठा घेत) हुजूर मी आपलाच सेवक. आपल्यासाठीच मी ही कामगिरी पार पडली. अशीच आपली कृपा असू द्या. (गुप्तहेर कुर्निसात करून अदबीने मागे जाऊन उभा राते. इतक्यात 'होशियार, निगाह रखो, सम्राट अकबर बादशहा पधार रहे है!' अशी ललकारी होते. बादशहा दरबारात प्रवशे करतात. त्यावेळी सर्वजण उभे राहून यांना कुर्निसात करतात. बादशा आसनस्थ होतात. बादशहा दरबारात चौफेर नजर टाकतात. बिरबलाचे आसन रिकामे दिसते व सर्व सरदार माना खाली घालून बसलेले दिसतात.) |
| **बादशहा** | : | आज बिरबलाची स्वारी कुठं दिसत नाही? आणि सर्वांच्या माना खाली का? हुसेनमियाँ, काय खबर आहे? |
| **शेख हुसेन** | : | जहाँपनाह, खबर एकदम बुरी आहे. प्रत्यक्ष आपलाच अपमान झाला आहे. |



शेख हुसेन : आणि तसं झालं तर बादशहाची मर्जी मग माझ्यावरच.
दुसरा सरदार : (कुर्निसात करत) हुजूर, तेव्हा मात्र आम्हाला विसरू नका हं!
शेख हुसेन : हो हो! पण आधी काही तरी युक्ती शोधा.
(इतक्यात एक गुप्तहेर दरबारात येतो. शेख हुसेनला सलाम करून त्याच्या कानात काहीतरी सांगतो. शेख हुसेन पहिल्या सरदाराच्या कानात, पहिला दुसऱ्याच्या कानात असे प्रत्येकजण एक दुसऱ्याच्या कानात काहीतरी सांगतात. सर्वजण आनंदी दिसतात.)
तिसरा सरदार : हुजूर, ही चांगलीच संधी चालून आली आहे. ह्या संधीचा आपण फायदा घ्याल तर आपला मान नक्कीच वाढेल.
शेख हुसेन : (मोठ्या खुशीने) आता बघतो तो बिरबल कसा काय बादशहाच्या मर्जीत राहतो ते.
पहिला सरदार : पण हुजूर. याचं सारं श्रेय आपल्या ह्या गुप्तहेरालाच दिलं पाहिजे.
शेख हुसेन : हो तर! (गुप्तहेराकडे वळून) आम्ही अगदी खूश आहोत तुझ्यावर. (गळ्यातील कंठा काढून देत) हे घे बक्षीस.
गुप्तहेर : (कंठा घेत) हुजूर मी आपलाच सेवक. आपल्यासाठीच मी ही कामगिरी पार पडली. अशीच आपली कृपा असू द्या. (गुप्तहेर कुर्निसात करून अदबीने मागे जाऊन उभा राते. इतक्यात 'होशियार, निगाह रखो, सम्राट अकबर बादशहा पधार रहे है!' अशी ललकारी होते. बादशहा दरबारात प्रवशे करतात. त्यावेळी सर्वजण उभे राहून यांना कुर्निसात करतात. बादशा आसनस्थ होतात. बादशहा दरबारात चौफेर नजर टाकतात. बिरबलाचे आसन रिकामे दिसते व सर्व सरदार माना खाली घालून बसलेले दिसतात.)
बादशहा : आज बिरबलाची स्वारी कुठं दिसत नाही? आणि सर्वांच्या माना खाली का? हुसेनमियाँ, काय खबर आहे?
शेख हुसेन : जहाँपनाह, खबर एकदम बुरी आहे. प्रत्यक्ष आपलाच अपमान झाला आहे.

७६

**बादशहा** : (रागाने) अपमान? आणि आमचा? कोणी केला? आत्ताच्या आत्ता आमच्यापुढं हजर करा त्याला.

**तिसरा सरदार** : जहाँपनाह, शांत व्हा. हुसेनमियाँ काय ते सांगतीलच. पण त्यावर आपला विश्वास बसणार नाही.

**बादशहा** : असं कोड्यात बोलू नका. काय ते स्पष्ट बोला.

**शेख हुसेन** : जहाँपनाह, आताच खबर आली आहे. आपल्या लाडक्या बिरबलानं म्हणे इराणच्या बादशहाच्या भेटीत आपली निंदा केली आहे.

**सर्व सरदार** : होय जहाँपनाह, बिरबलनं आपला अपमान केला आहे. आम्ही तो कदापि सहन करणार नाही.

**शेख हुसेन** : बिरबलला आपल्या हुशारीचा खूपच गर्व झाला आहे. त्यानं इराणच्या बादशहाला खूश करण्यासाठी त्याला 'पौर्णिमेचा चंद्र' तर जहाँपनाह, आपल्याला 'द्वितीयेचा चंद्र' म्हटलं आहे.

**पहिला सरदार** : त्याबद्दल त्यानं बादहाकडून मोठं बक्षीससुद्धा मिळविलं आहे.

**तिसरा सरदार** : जहाँपनाह, झाल्या गोष्टीबद्दल त्याला जाब विचारलाच पाहिजे.

**दुसरा सरदार** : आणि या अपराधाबद्दल त्याला 'कडी' सजाही दिली पाहिजे.

**बादशहा** : बस्स! बस्स!! हुसेनमियाँ आत्ताच्या आता बिरबलला दरबारात हजर होण्यास सांगा आम्ही द्वितीयेचा चंद्र काय...!

(इतक्यात बिरबल दरबारात प्रवेश करतो.)

**बिरबल** : (कुर्निसात करून) आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. जहाँपनाह, आपण आमची आठवण काढली आणि आम्ही आपल्या सेवेला हजर आहोत.

**बादशहा** : ये, बिरबल ये. आम्ही आपलीच आठवण काढीत होतो. इराणची यात्रा कशी काय झाली?

**बिरबल** : छानच झाली. जहाँपनाह, इराणच्या बादशहांनी आपल्याला ही भेट दिली आहे. (भेट सादर करतो.)

**बादशहा** : (कुत्सितपणे) इराणच्या बादशहाच्या दरबारात आपण आमची



**बादशहा** : (रागाने) अपमान? आणि आमचा? कोणी केला? आत्ताच्या आत्ता आमच्यापुढं हजर करा त्याला.

**तिसरा सरदार** : जहाँपनाह, शांत व्हा. हुसेनमियाँ काय ते सांगतीलच. पण त्यावर आपला विश्वास बसणार नाही.

**बादशहा** : असं कोड्यात बोलू नका. काय ते स्पष्ट बोला.

**शेख हुसेन** : जहाँपनाह, आताच खबर आली आहे. आपल्या लाडक्या बिरबलानं म्हणे इराणच्या बादशहाच्या भेटीत आपली निंदा केली आहे.

**सर्व सरदार** : होय जहाँपनाह, बिरबलनं आपला अपमान केला आहे. आम्ही तो कदापि सहन करणार नाही.

**शेख हुसेन** : बिरबलला आपल्या हुशारीचा खूपच गर्व झाला आहे. त्यानं इराणच्या बादशहाला खूश करण्यासाठी त्याला 'पौर्णिमेचा चंद्र' तर जहाँपनाह, आपल्याला 'द्वितीयेचा चंद्र' म्हटलं आहे.

**पहिला सरदार** : त्याबद्दल त्यानं बादहाकडून मोठं बक्षीससुद्धा मिळविलं आहे.

**तिसरा सरदार** : जहाँपनाह, झाल्या गोष्टीबद्दल त्याला जाब विचारलाच पाहिजे.

**दुसरा सरदार** : आणि या अपराधाबद्दल त्याला 'कडी' सजाही दिली पाहिजे.

**बादशहा** : बस्स! बस्स!! हुसेनमियाँ आत्ताच्या आता बिरबलला दरबारात हजर होण्यास सांगा आम्ही द्वितीयेचा चंद्र काय...!

(इतक्यात बिरबल दरबारात प्रवेश करतो.)

**बिरबल** : (कुर्निसात करून) आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. जहाँपनाह, आपण आमची आठवण काढली आणि आम्ही आपल्या सेवेला हजर आहोत.

**बादशहा** : ये, बिरबल ये. आम्ही आपलीच आठवण काढीत होतो. इराणची यात्रा कशी काय झाली?

**बिरबल** : छानच झाली. जहाँपनाह, इराणच्या बादशहांनी आपल्याला ही भेट दिली आहे. (भेट सादर करतो.)

**बादशहा** : (कुत्सितपणे) इराणच्या बादशहाच्या दरबारात आपण आमची

७७

खूपच स्तुती केलीत म्हणे?

**पहिला सरदार** : जहाँपनाह, स्तुती कुठली? उलट अपमानच केला त्यानं तुमचा.

**बिरबल** : जहाँपनाह, आपला अपमान! आणि तोही माझ्याकडून!! छे छे! उलट मी तर त्या दरबारात आपला मान ठेवला.

**शेख हुसेन** : इराणचा बादशहा खूश व्हावा, धनसंपत्ती मिळावी म्हणून तू त्याला 'पौर्णिमेचा चंद्र' म्हटलंस.

**बिरबल** : नाही महाराज.

**शेख हुसेन** : चूप! एक शब्द बोलू नकोस. इराणचा बादशहा तुला पौर्णिमेचा चंद्र वाटला काय?

**पहिला सरदार** : आणि आमचे बादशहा म्हणजे काय द्वितीयेचा चंद्र?

**बिरबल** : जहाँपनाह, खरं म्हणजे इराणच्या बादशहाच्या दरबारात मी आपल्यालाच मोठेपणा दिला आहे.

**बादशहा** : तो कसा काय?

**बिरबल** : जहाँपनाह, पौर्णिमेचा चंद्र आकारानं मोठा दिसतो पण दुसऱ्या दिवसापासून तो लहान लहान होत जातो. शेवटी शेवटी तो दिसेनासा होतो.

**बादशहा** : ते आम्हालाही माहीत आहे, तू सांगण्याची गरज नाही.

**बिरबल** : जहाँपनाह, माझ्या म्हणण्याचा अर्थ इराणच्या बादशहाचे वैभव हळूहळू कमी होईल.

**शेख हुसेन** : पण आमचे बादशहा द्वितीयेच्या चंद्राप्रमाणे कसे काय? यात कसला तू त्यांचा मान राखलास?

**बिरबल** : होय हुसेनमियाँ, आपले जहाँपनाह द्वितीयेच्या चंद्राप्रमाणेच आहेत. शुक्ल पक्षातील द्वितीयेपासून चंद्र हळूहळू मोठा होत जातो. म्हणजेच जहाँपनाचं वैभव वाढत जाणारं आहे.



खूपच स्तुती केलीत म्हणे?

**पहिला सरदार** : जहाँपनाह, स्तुती कुठली? उलट अपमानच केला त्यानं तुमचा.

**बिरबल** : जहाँपनाह, आपला अपमान! आणि तोही माझ्याकडून!! छे छे! उलट मी तर त्या दरबारात आपला मान ठेवला.

**शेख हुसेन** : इराणचा बादशहा खूश व्हावा, धनसंपत्ती मिळावी म्हणून तू त्याला 'पौर्णिमेचा चंद्र' म्हटलंस.

**बिरबल** : नाही महाराज.

**शेख हुसेन** : चूप! एक शब्द बोलू नकोस. इराणचा बादशहा तुला पौर्णिमेचा चंद्र वाटला काय?

**पहिला सरदार** : आणि आमचे बादशहा म्हणजे काय द्वितीयेचा चंद्र?

**बिरबल** : जहाँपनाह, खरं म्हणजे इराणच्या बादशहाच्या दरबारात मी आपल्यालाच मोठेपणा दिला आहे.

**बादशहा** : तो कसा काय?

**बिरबल** : जहाँपनाह, पौर्णिमेचा चंद्र आकारानं मोठा दिसतो पण दुसऱ्या दिवसापासून तो लहान लहान होत जातो. शेवटी शेवटी तो दिसेनासा होतो.

**बादशहा** : ते आम्हालाही माहीत आहे, तू सांगण्याची गरज नाही.

**बिरबल** : जहाँपनाह, माझ्या म्हणण्याचा अर्थ इराणच्या बादशहाचे वैभव हळूहळू कमी होईल.

**शेख हुसेन** : पण आमचे बादशहा द्वितीयेच्या चंद्राप्रमाणे कसे काय? यात कसला तू त्यांचा मान राखलास?

**बिरबल** : होय हुसेनमियाँ, आपले जहाँपनाह द्वितीयेच्या चंद्राप्रमाणेच आहेत. शुक्ल पक्षातील द्वितीयेपासून चंद्र हळूहळू मोठा होत जातो. म्हणजेच जहाँपनाचं वैभव वाढत जाणारं आहे.

७८

**बादशहा** : वा! वा!! बहुत खूब (बादशहा बिरबलला मिठी मारतो) बिरबल, इराणच्या बादशहाकडे योग्य मान राखलास तू आमचा.

**बिरबल** : जहाँपनाह, आपण आहातच तसे. मी माझं कर्तव्य बजावलं.

**बादशहा** : तुझ्यासारखं श्रेष्ठ रत्न आमच्या दरबारात आहे म्हणून तर आमची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. तुझ्याबद्दल आम्हाला धन्यता वाटते. (शेख हुसेन व सर्व सरदारांच्या माना खाली गेल्या आहेत. त्यांच्याकडे बघून) आता कशाला तुमच्या माना खाली गेल्या? कळली तुमची हुशारी.

**शेख हुसेन** : जहाँपनाह, गलती झाली. माफी असावी.

(बादशहा बिरबलला आसनस्थ होण्याची खूण करतो. इतक्यात एक शिपाई येतो.)

**शिपाई** : (कुर्निसात करून) जहाँपनाह, बाहेर एक माणूस आला आहे. आपण जगप्रवासी असल्याचं तो सांगतो. आपल्या भेटीसाठी तो थांबला आहे.

**बादशहा** : पाठवून दे त्याला इकडं.

**शिपाई** : जी हुजूर. (कुर्निसात करून माघारी वळतो.)

**बादशहा** : हुसेनमियाँ, कशासाठी आला असेल तो? काही सांगू शकाल?

**शेख हुसेन** : जहाँपनाह, बोलून चालून तो जगप्रवासी आपली कीर्ती ऐकून काही मदत मिळेल या आशेनं आला असेल तो बिचारा!

**बादशहा** : (सरदारांकडे वळून) आपले काय मत आहे?

**पहिला सरदार** : हुजूर, हुसेनमियाँ म्हणतात ते अगदी बरोबर आहे. बिरबलइतकेच हुशार आहेत हे. ह्यांचा अंदाज चुकायचा नाही कधी.

**शेख हुसेन** : अरे, हुजुरांसमोर माझी तारीफ कशाला करतोस? ते सारे जाणून आहेत.

**बादशहा** : हां! आम्ही ओळखून आहोत. बेगमसाहिबाही आपल्या ह्या बंधूंच्या हुशारीबद्दल नेहमी सांगत असतात.



**बादशहा** : वा! वा!! बहुत खूब (बादशहा बिरबलला मिठी मारतो) बिरबल, इराणच्या बादशहाकडे योग्य मान राखलास तू आमचा.

**बिरबल** : जहाँपनाह, आपण आहातच तसे. मी माझं कर्तव्य बजावलं.

**बादशहा** : तुझ्यासारखं श्रेष्ठ रत्न आमच्या दरबारात आहे म्हणून तर आमची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. तुझ्याबद्दल आम्हाला धन्यता वाटते. (शेख हुसेन व सर्व सरदारांच्या माना खाली गेल्या आहेत. त्यांच्याकडे बघून) आता कशाला तुमच्या माना खाली गेल्या? कळली तुमची हुशारी.

**शेख हुसेन** : जहाँपनाह, गलती झाली. माफी असावी.

(बादशहा बिरबलला आसनस्थ होण्याची खूण करतो. इतक्यात एक शिपाई येतो.)

**शिपाई** : (कुर्निसात करून) जहाँपनाह, बाहेर एक माणूस आला आहे. आपण जगप्रवासी असल्याचं तो सांगतो. आपल्या भेटीसाठी तो थांबला आहे.

**बादशहा** : पाठवून दे त्याला इकडं.

**शिपाई** : जी हुजूर. (कुर्निसात करून माघारी वळतो.)

**बादशहा** : हुसेनमियाँ, कशासाठी आला असेल तो? काही सांगू शकाल?

**शेख हुसेन** : जहाँपनाह, बोलून चालून तो जगप्रवासी आपली कीर्ती ऐकून काही मदत मिळेल या आशेनं आला असेल तो बिचारा!

**बादशहा** : (सरदारांकडे वळून) आपले काय मत आहे?

**पहिला सरदार** : हुजूर, हुसेनमियाँ म्हणतात ते अगदी बरोबर आहे. बिरबलइतकेच हुशार आहेत हे. ह्यांचा अंदाज चुकायचा नाही कधी.

**शेख हुसेन** : अरे, हुजुरांसमोर माझी तारीफ कशाला करतोस? ते सारे जाणून आहेत.

**बादशहा** : हां! आम्ही ओळखून आहोत. बेगमसाहिबाही आपल्या ह्या बंधूंच्या हुशारीबद्दल नेहमी सांगत असतात.

७९

(एवढ्यात शिपाई जगप्रवाशाला घेऊन येतो)

**जगप्रवासी** : (बादशहाला कुर्निसात करून) बादशहाचा विजय असो. हुजूर, मी एक जगप्रवासी. आपली कीर्ती दूरदूरच्या देशात पसरली आहे. आपल्या दरबारात विद्वान व बुद्धिमान मंडळी आहेत आपण धन्य आहात!

**बादशहा** : तुझे हे उद्‌गार ऐकून आमचे कान तृप्त झाले. पण आमची भेट घेण्याचं प्रयोजन?

**जगप्रवासी** : जहाँपनाह, मी माझे काही प्रश्न घेऊन आपल्याकडं आलो आहे. आतापर्यंतच्या प्रवासात अनेक ठिकाणी उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न केला... पण.....

**शेख हुसेन** : मग पुढं?

**जगप्रवासी** : अद्याप मला समाधानकारक उत्तरं मिळालेली नाहीत. हुजुर, आपल्या दरबारात ती मिळतील अशी मला आशा आहे. तेव्हा प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी.

**दुसरा सरदार** : हुजूर, हुसेनमियाँच देतील सर्व प्रश्नांची उत्तरं.

**शेख हुसेन** : हो, हो. आम्ही तयार आहोत.

**बादशहा** : (कुत्सितपणे हसतो.) हुसेनमियाँ, आज आपल्या हुशारीची खरी परीक्षा आहे!

**तिसरा सरदार** : हुजूर, हुसेनमियाँ नक्कीच या परीक्षेत उत्तीर्ण होतील.

**बादशहा** : हुसेनमियाँ, जर का आपण ह्या परीक्षेत उत्तीर्ण झालात तर आपली इच्छा आम्ही पूर्ण करू.

**शेख हुसेन** : हुजूर, बंदा एका पायावर तयार आहे.

**बादशहा** : विचार आता तुझे प्रश्न.

**जगप्रवासी** : हुजूर, माझा पहिला प्रश्न आहे, सर्वात श्रेष्ठ राजा कोण?



(एवढ्यात शिपाई जगप्रवाशाला घेऊन येतो)

**जगप्रवासी** : (बादशहाला कुर्निसात करून) बादशहाचा विजय असो. हुजूर, मी एक जगप्रवासी. आपली कीर्ती दूरदूरच्या देशात पसरली आहे. आपल्या दरबारात विद्वान व बुद्धिमान मंडळी आहेत आपण धन्य आहात!

**बादशहा** : तुझे हे उद्‌गार ऐकून आमचे कान तृप्त झाले. पण आमची भेट घेण्याचं प्रयोजन?

**जगप्रवासी** : जहाँपनाह, मी माझे काही प्रश्न घेऊन आपल्याकडं आलो आहे. आतापर्यंतच्या प्रवासात अनेक ठिकाणी उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न केला... पण.....

**शेख हुसेन** : मग पुढं?

**जगप्रवासी** : अद्याप मला समाधानकारक उत्तरं मिळालेली नाहीत. हुजुर, आपल्या दरबारात ती मिळतील अशी मला आशा आहे. तेव्हा प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी.

**दुसरा सरदार** : हुजूर, हुसेनमियाँच देतील सर्व प्रश्नांची उत्तरं.

**शेख हुसेन** : हो, हो. आम्ही तयार आहोत.

**बादशहा** : (कुत्सितपणे हसतो.) हुसेनमियाँ, आज आपल्या हुशारीची खरी परीक्षा आहे!

**तिसरा सरदार** : हुजूर, हुसेनमियाँ नक्कीच या परीक्षेत उत्तीर्ण होतील.

**बादशहा** : हुसेनमियाँ, जर का आपण ह्या परीक्षेत उत्तीर्ण झालात तर आपली इच्छा आम्ही पूर्ण करू.

**शेख हुसेन** : हुजूर, बंदा एका पायावर तयार आहे.

**बादशहा** : विचार आता तुझे प्रश्न.

**जगप्रवासी** : हुजूर, माझा पहिला प्रश्न आहे, सर्वात श्रेष्ठ राजा कोण?

८०

**शेख हुसेन** : (मोठ्या खुशीनं) सर्वात श्रेष्ठ राजा कोण असेल तर आमचे बादशहा ‘सम्राट अकबर.’

**जगप्रवासी** : दुसरा प्रश्न– सर्वात श्रेष्ठ दात कोणाचा?

**शेख हुसेन** : सर्वात शेष्ठ दात हत्तीचा.

**जगप्रवासी** : सर्वात श्रेष्ठ पुत्र कोण?

**शेख हुसेन** : सर्वात श्रेष्ठ पुत्र, सर्वात मोठा मुलगा.

**जगप्रवासी** : यापुढील प्रश्न, सर्वात श्रेष्ठ फूल कोणतं?

**शेख हुसेन** : कमळ.

**जगप्रवासी** : आता शेवटचा प्रश्न सर्वात श्रेष्ठ गुण कोणता?

**शेख हुसेन** : सर्वात श्रेष्ठ गुण विद्या.

(बिरबल वगळता बादशहा व सरदार शेख हुसेनकडे कौतुकाने पाहत समाधानाने माना डोलावतात. इतक्यात बादशहाचे लक्ष त्या जगप्रवाशाकडे जाते. त्याचा चेहरा प्रसन्न दिसत नाही.)

**जगप्रवासी** : खाविंद, माफी असावी. मी मोठ्या आशेनं आलो होतो; परंतु आपल्याही दरबारात माझी निराशा झाली. या प्रश्नांची उत्तरे मी आणखी कुठंतरी मिळवीन. मला निघण्याची परवानगी असावी.

**बादशहा** : थांब, असा निराश होऊ नकोस. (बिरबलकडे पाहत) तुझं समाधान होईल अशी उत्तरं तुला याच दरबारात मिळतील. बिरबल....

**बिरबल** : हुजूर, मी आपल्याच आज्ञेची वाट पाहत होतो. हुजूर, याच्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर ‘मेघराजा.’

**शेख हुसेन** : (आश्चर्याने) ते कसं काय?

**बिरबल** : मेघराजामुळं पाऊस पडतो. म्हणूनच ही सृष्टी जिवंत आहे. दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर आहे– सर्वात श्रेष्ठ दात नांगराचा.



**शेख हुसेन** : (मोठ्या खुशीनं) सर्वात श्रेष्ठ राजा कोण असेल तर आमचे बादशहा ‘सम्राट अकबर.’

**जगप्रवासी** : दुसरा प्रश्न– सर्वात श्रेष्ठ दात कोणाचा?

**शेख हुसेन** : सर्वात शेष्ठ दात हत्तीचा.

**जगप्रवासी** : सर्वात श्रेष्ठ पुत्र कोण?

**शेख हुसेन** : सर्वात श्रेष्ठ पुत्र, सर्वात मोठा मुलगा.

**जगप्रवासी** : यापुढील प्रश्न, सर्वात श्रेष्ठ फूल कोणतं?

**शेख हुसेन** : कमळ.

**जगप्रवासी** : आता शेवटचा प्रश्न सर्वात श्रेष्ठ गुण कोणता?

**शेख हुसेन** : सर्वात श्रेष्ठ गुण विद्या.

(बिरबल वगळता बादशहा व सरदार शेख हुसेनकडे कौतुकाने पाहत समाधानाने माना डोलावतात. इतक्यात बादशहाचे लक्ष त्या जगप्रवाशाकडे जाते. त्याचा चेहरा प्रसन्न दिसत नाही.)

**जगप्रवासी** : खाविंद, माफी असावी. मी मोठ्या आशेनं आलो होतो; परंतु आपल्याही दरबारात माझी निराशा झाली. या प्रश्नांची उत्तरे मी आणखी कुठंतरी मिळवीन. मला निघण्याची परवानगी असावी.


**बादशहा** : थांब, असा निराश होऊ नकोस. (बिरबलकडे पाहत) तुझं समाधान होईल अशी उत्तरं तुला याच दरबारात मिळतील. बिरबल....

**बिरबल** : हुजूर, मी आपल्याच आज्ञेची वाट पाहत होतो. हुजूर, याच्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर ‘मेघराजा.’

**शेख हुसेन** : (आश्चर्याने) ते कसं काय?

**बिरबल** : मेघराजामुळं पाऊस पडतो. म्हणूनच ही सृष्टी जिवंत आहे. दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर आहे– सर्वात श्रेष्ठ दात नांगराचा.

८९



**शेख हुसेन** : (उपहासाने हसत) नांगराला दात तरी असतो का?

**बिरबल** : होय हुसेनमियाँ. नांगराचा फाळ म्हणजे त्याचा दातच. त्याच्यामुळेच जमीन नांगरली जाते आणि चांगलं पीक येतं. त्यामुळेच सर्वांचं पोषण होते.

**जगप्रवासी** : (चेहऱ्यावर आनंद दर्शवीत) वा! छान!!

**बादशहा** : (मध्येच) बिरबल, आगे बढो. आम्ही खूश आहोत.

**बिरबल** : हुजूर, सर्वात श्रेष्ठ पुत्र गाईचा.


**तिसरा सरदार** : गाईचा पुत्र? आणि तो कसा काय?

**बिरबल** : सांगतो ना; बैल नांगर ओढतो. त्याच्या शेणापासून खत मिळतं. त्या खतामुळं धान्य चांगलं मिळतं. म्हणून तर आम्हा सर्वांना मुबलक धान्य मिळतं.

**जगप्रवासी** : वा! फारच छान!आता मला सांग, सर्वात श्रेष्ठ फूल कोणतं?

**बिरबल** : कापसाचे.





**शेख हुसेन** : (उपहासाने हसत) नांगराला दात तरी असतो का?

**बिरबल** : होय हुसेनमियाँ. नांगराचा फाळ म्हणजे त्याचा दातच. त्याच्यामुळेच जमीन नांगरली जाते आणि चांगलं पीक येतं. त्यामुळेच सर्वांचं पोषण होते.

**जगप्रवासी** : (चेहऱ्यावर आनंद दर्शवीत) वा! छान!!

**बादशहा** : (मध्येच) बिरबल, आगे बढो. आम्ही खूश आहोत.

**बिरबल** : हुजूर, सर्वात श्रेष्ठ पुत्र गाईचा.

**तिसरा सरदार** : गाईचा पुत्र? आणि तो कसा काय?

**बिरबल** : सांगतो ना; बैल नांगर ओढतो. त्याच्या शेणापासून खत मिळतं. त्या खतामुळं धान्य चांगलं मिळतं. म्हणून तर आम्हा सर्वांना मुबलक धान्य मिळतं.

**जगप्रवासी** : वा! फारच छान!आता मला सांग, सर्वात श्रेष्ठ फूल कोणतं?

**बिरबल** : कापसाचे.

८२

**पहिला सरदार** : या फुलाला ना रुप ना गंध. मग ते श्रेष्ठ कसं?

**बिरबल** : होय. कापसाचंच फूल सर्वश्रेष्ठ. त्यापासून तर वस्त्र मिळतं. (बादशहा व जगप्रवासी खुशीने मान डोलावतात.)

**बादशहा** : आता शेवटचा प्रश्न–

**बिरबल** : हुजूर, सर्वात श्रेष्ठ गुण–हिम्मत.

**शेख हुसेन** : 'विद्या' या गुणापेक्षाही.

**बिरबल** : होय हुसेनमियाँ, कारण मनुष्य कितीही विद्वान असला तरी 'हिम्मत' नसेल तर तो काही करू शकत नाही.

**जगप्रवासी** : वाहवा! वाहवा!! हुजूर. बिरबलची सर्व अचूक व समाधानकारक उत्तरे ऐकून धन्य झालो.

**बादशहा** : सांगितलं नव्हतं. तुला याच दरबारात समाधानकारक उत्तरं मिळतील म्हणून. (बिरबलकडे वळून) बिरबल. तू आज दरबाराची लाज राखलीस. आपल्या नवरत्न दरबारातील तुझं मानाचं स्थान कोणीच हिरावून घेऊ शकणार नाही.

**(पडदा पडतो.)**

---

**उपक्रम**

ही नाटिका तुम्ही तुमच्या शाळेच्या स्नेहसंमेलन प्रसंगी सादर करा.

●●●



**पहिला सरदार** : या फुलाला ना रुप ना गंध. मग ते श्रेष्ठ कसं?

**बिरबल** : होय. कापसाचंच फूल सर्वश्रेष्ठ. त्यापासून तर वस्त्र मिळतं. (बादशहा व जगप्रवासी खुशीने मान डोलावतात.)

**बादशहा** : आता शेवटचा प्रश्न–

**बिरबल** : हुजूर, सर्वात श्रेष्ठ गुण–हिम्मत.

**शेख हुसेन** : 'विद्या' या गुणापेक्षाही.

**बिरबल** : होय हुसेनमियाँ, कारण मनुष्य कितीही विद्वान असला तरी 'हिम्मत' नसेल तर तो काही करू शकत नाही.

**जगप्रवासी** : वाहवा! वाहवा!! हुजूर. बिरबलची सर्व अचूक व समाधानकारक उत्तरे ऐकून धन्य झालो.

**बादशहा** : सांगितलं नव्हतं. तुला याच दरबारात समाधानकारक उत्तरं मिळतील म्हणून. (बिरबलकडे वळून) बिरबल. तू आज दरबाराची लाज राखलीस. आपल्या नवरत्न दरबारातील तुझं मानाचं स्थान कोणीच हिरावून घेऊ शकणार नाही.

**(पडदा पडतो.)**

---

**उपक्रम**

ही नाटिका तुम्ही तुमच्या शाळेच्या स्नेहसंमेलन प्रसंगी सादर करा.

●●●

# २५. या मुलांना– या फुलांना

या मुलांना या फुलांना
रंग द्या अन् गंध द्या
पाकळ्यांना या कळ्यांना
साद द्या– प्रतिसाद द्या ।। धृ।।

प्रीत ज्यांची रीत आहे
गीत त्यांना गाऊ द्या
बोलही अनमोल ज्यांचे
त्या स्वरांना सूर द्या ।। १।।

नक्षत्र ज्यांचे छत्र आहे
क्षेत्र त्या अजमावू द्या
पुत्र हे आधार भूचे
मात्र त्यांना मंत्र द्या ।। २।।

भाव ज्यांचा देव आहे
धाव त्यांना घेऊ द्या
भरधाव ज्यांची धाव आहे
नाव त्यांचे होऊ द्या ।। ३ ।।

मकरंद ज्यांचा छंद आहे
धुंद त्यांना होऊ द्या
स्वच्छंद या साऱ्या जगाचा
आनंद त्यांना घेऊ द्या ।। ४ ।।

होऊ द्या साकार स्वप्ने
आकार त्यांना घेऊ द्या
आकाश अन् अवकाशही
ग्रहगोल त्यांना पाहू द्या ।। ५।।

●●●



# २५. या मुलांना– या फुलांना

या मुलांना या फुलांना
रंग द्या अन् गंध द्या
पाकळ्यांना या कळ्यांना
साद द्या– प्रतिसाद द्या ।। धृ।।

प्रीत ज्यांची रीत आहे
गीत त्यांना गाऊ द्या
बोलही अनमोल ज्यांचे
त्या स्वरांना सूर द्या ।। १।।

नक्षत्र ज्यांचे छत्र आहे
क्षेत्र त्या अजमावू द्या
पुत्र हे आधार भूचे
मात्र त्यांना मंत्र द्या ।। २।।

भाव ज्यांचा देव आहे
धाव त्यांना घेऊ द्या
भरधाव ज्यांची धाव आहे
नाव त्यांचे होऊ द्या ।। ३ ।।

मकरंद ज्यांचा छंद आहे
धुंद त्यांना होऊ द्या
स्वच्छंद या साऱ्या जगाचा
आनंद त्यांना घेऊ द्या ।। ४ ।।

होऊ द्या साकार स्वप्ने
आकार त्यांना घेऊ द्या
आकाश अन् अवकाशही
ग्रहगोल त्यांना पाहू द्या ।। ५।।

●●●

८४

# जगावेगळी भांडणे

पुरुषोत्तम सखाराम धायमोडकर हे आमच्या चाळीतील एक मोडतील पण वाकणार नाहीत, अशा जातकुळीतील साठीतील गृहस्थ आहेत. त्यांच्या भांडकुदळ शेजारीणबाई श्रीमती लक्ष्मी हिने गेल्या दहा वर्षांत त्यांच्यावर एवढ्यांदा आक्रमण केले तरी पुरुषोत्तम ऊर्फ पुरुसोबाब एखाद्या दगडी भिंतीसारखे अचल-अविचल उभे आहेत. या दोघांच्याही भांडणाला वेळ काळ सोडाच; पण कुठल्याही निमित्ताचीही गरज लागत नाही. श्री. पुरसोबाबच्या घरात जरासे खुट्ट झाले तरी लक्ष्मीबाईच्या घरात त्याचा मोठा आवाज उठतो.

चाळीत भांडून भांडून कमी वाटले म्हणून की काय ही दोघेही एकदा पोलीस स्टेशनात भांडायला गेली. त्यांच्या मागोमाग पुरसोबाबचा एक मरतुकडा कुत्रा, लक्ष्मीचाईचा होयबा नवरा आणि फुकटात मनोरंजन करून घेणारी माझ्यासारखी रिकामटेकडी माणसे असा लवाजमाही होता.

लक्ष्मीबाई टाण टाण उडत इन्स्पेक्टरांच्या खुर्चीकडे गेली. 'इनिस्पेक्टर साहेब, तुम्हाला माहीत आहेच की हा थेरडा गेली दहा वर्षे आमच्या चाळीत राहतो.'

असे बाईंनी म्हणताच म्हातारा कडाडला, 'मी तुमच्या चाळीत राहत नाही, मालकाच्या चाळीत राहतो.'

'तेच ते.' लक्ष्मीबाई म्हणाल्या.

तसे तिच्या नवऱ्याने 'होय, तेच ते' म्हणून री ओढली.

पोलिसांनी त्यांना थंड करून नावे विचारून घेतली. 'मी लक्ष्मी आणि माझा नवरा शिरीपाद. लक्ष्मीबाईंनी सांगितलेण पुरसोबाबचे मध्येच हस्तक्षेप करीत ह्या शिरपादला सगळा गाव 'हयवय' म्हणून ओळखतो, अशी माहिती दिली.

'त्याच्याशी तुला कारण नाही,' बाई तणतणल्या, तसं 'हयवय ते तुला नको' असे त्यांच्या नवऱ्याने धृपद आळविले.

'इनिस्पेक्टरसाहेब, या पुरशाने आम्हाला चाळीत राहणे मुश्कील केले आहे. आता तुम्हीच काय तो निर्णय घ्या.'- लक्ष्मी.

'तुमची नेमकी तक्रार काय आहे ते सांगा.' इन्स्पेक्टर म्हणाले.



# जगावेगळी भांडणे

पुरुषोत्तम सखाराम धायमोडकर हे आमच्या चाळीतील एक मोडतील पण वाकणार नाहीत, अशा जातकुळीतील साठीतील गृहस्थ आहेत. त्यांच्या भांडकुदळ शेजारीणबाई श्रीमती लक्ष्मी हिने गेल्या दहा वर्षांत त्यांच्यावर एवढ्यांदा आक्रमण केले तरी पुरुषोत्तम ऊर्फ पुरुसोबाब एखाद्या दगडी भिंतीसारखे अचल-अविचल उभे आहेत. या दोघांच्याही भांडणाला वेळ काळ सोडाच; पण कुठल्याही निमित्ताचीही गरज लागत नाही. श्री. पुरसोबाबच्या घरात जरासे खुट्ट झाले तरी लक्ष्मीबाईच्या घरात त्याचा मोठा आवाज उठतो.

चाळीत भांडून भांडून कमी वाटले म्हणून की काय ही दोघेही एकदा पोलीस स्टेशनात भांडायला गेली. त्यांच्या मागोमाग पुरसोबाबचा एक मरतुकडा कुत्रा, लक्ष्मीचाईचा होयबा नवरा आणि फुकटात मनोरंजन करून घेणारी माझ्यासारखी रिकामटेकडी माणसे असा लवाजमाही होता.

लक्ष्मीबाई टाण टाण उडत इन्स्पेक्टरांच्या खुर्चीकडे गेली. 'इनिस्पेक्टर साहेब, तुम्हाला माहीत आहेच की हा थेरडा गेली दहा वर्षे आमच्या चाळीत राहतो.'

असे बाईंनी म्हणताच म्हातारा कडाडला, 'मी तुमच्या चाळीत राहत नाही, मालकाच्या चाळीत राहतो.'

'तेच ते.' लक्ष्मीबाई म्हणाल्या.

तसे तिच्या नवऱ्याने 'होय, तेच ते' म्हणून री ओढली.

पोलिसांनी त्यांना थंड करून नावे विचारून घेतली. 'मी लक्ष्मी आणि माझा नवरा शिरीपाद. लक्ष्मीबाईंनी सांगितलेण पुरसोबाबचे मध्येच हस्तक्षेप करीत ह्या शिरपादला सगळा गाव 'हयवय' म्हणून ओळखतो, अशी माहिती दिली.

'त्याच्याशी तुला कारण नाही,' बाई तणतणल्या, तसं 'हयवय ते तुला नको' असे त्यांच्या नवऱ्याने धृपद आळविले.

'इनिस्पेक्टरसाहेब, या पुरशाने आम्हाला चाळीत राहणे मुश्कील केले आहे. आता तुम्हीच काय तो निर्णय घ्या.'- लक्ष्मी.

'तुमची नेमकी तक्रार काय आहे ते सांगा.' इन्स्पेक्टर म्हणाले.

८५

त्यावर ‘तक्रार? अहो या पुरशाच्या करण्या तुम्ही ऐकल्या तर तुम्हीसुद्धा तुमचे बिऱ्हाड सोडून जाल.’

एवढ्यात पुरसोबाबच्या रोगट कुत्र्याने भर पोलीसचौकीत पाय वर केल्याने एक पोलीस ओरडला, ‘या दरिद्री कुत्र्याला आत कुणी सोडले?’

पुरसोबाबने लाडाने कुत्र्याला जवळ घेतले. ‘दरिद्री नव्हे, आमचा राजा आहे तो.’ ते म्हणाले.

‘पण या राजाला कैद्यासारखे तुम्ही येथे का आणले.’ पोलीस कडाडले.

‘तो सोडणार नाही सायब. त्याचा हाच तो कुत्रा. याने आमच्या कोंबड्यांच्या पाच पिढ्या नष्ट केल्या.’ बाईनी पुस्ती जोडली.

‘बरं ते असू द्या. तुमची तक्रार सांगा.’

‘हा पुरशा गावभर भटकून ओली लाकडे गोळा करतो आणि घरात जाळतो. त्याने आमच्या घराच्या भिंती पार काळ्या झाल्या आहेत.’ – बाई.

‘पण इन्स्पेक्टरसाहेब, आामच्या घराची चूलसुद्धा अजून काळी झालेली नाही. तुम्ही पाहिलेले बरं.’ –पुरसोबाब.

‘आम्ही आमच्या गोदूचे थाटाने लग्न केले, म्हूणन आम्हाला चिडविण्यासाठी या इसमाने आपल्या मुलीचे त्याहून मोठ्या थाटात लग्न केले.’– बाई.

‘म्हणजे मी माझ्या मुलीला कुमारिकाच ठेवायला हवे होते काय?’ पुरसोबाबची पृच्छा.

‘हा पुरसोबाब सोमवार, गुरुवार या आमच्या व्रतांच्या दिवशी तर हटकून मासळी आणतो आणि ती तासतासभर तळत बसतो. त्या वासाने आमचा सोमवार, गुरुवार भ्रष्ट होतो.’– लक्ष्मी.

‘आमची मुलं मासळीसाठी रडतात.’ – इति श्रीपाद.

‘हे बघा इन्स्पेक्टरसाहेब, मी आतापर्यंत कायदेशीररीत्या मासळी तळत आलो आहे. मालकाने मला चाळीत बिऱ्हाड देताना सोमवार, गुरुवार मासळी खाऊ नये अशी अट घातलेली नाही, त्यामुळे मी मासळी खातो, यापुढेही खाणार’ असे सांगून पुरसोबाब पुढे म्हणाले, ‘हे सगळं एक वेळ ऐकून घेता येईल पण तुम्ही सांगा, दर सोमवार, गुरुवारी चांगल्या सिमेंटच्या जमिनीवर शेणाचा शिंतोडा घालण्याची याना गरज काय? त्या



त्यावर ‘तक्रार? अहो या पुरशाच्या करण्या तुम्ही ऐकल्या तर तुम्हीसुद्धा तुमचे बिऱ्हाड सोडून जाल.’

एवढ्यात पुरसोबाबच्या रोगट कुत्र्याने भर पोलीसचौकीत पाय वर केल्याने एक पोलीस ओरडला, ‘या दरिद्री कुत्र्याला आत कुणी सोडले?’

पुरसोबाबने लाडाने कुत्र्याला जवळ घेतले. ‘दरिद्री नव्हे, आमचा राजा आहे तो.’ ते म्हणाले.

‘पण या राजाला कैद्यासारखे तुम्ही येथे का आणले.’ पोलीस कडाडले.

‘तो सोडणार नाही सायब. त्याचा हाच तो कुत्रा. याने आमच्या कोंबड्यांच्या पाच पिढ्या नष्ट केल्या.’ बाईनी पुस्ती जोडली.

‘बरं ते असू द्या. तुमची तक्रार सांगा.’

‘हा पुरशा गावभर भटकून ओली लाकडे गोळा करतो आणि घरात जाळतो. त्याने आमच्या घराच्या भिंती पार काळ्या झाल्या आहेत.’ – बाई.

‘पण इन्स्पेक्टरसाहेब, आामच्या घराची चूलसुद्धा अजून काळी झालेली नाही. तुम्ही पाहिलेले बरं.’ –पुरसोबाब.

‘आम्ही आमच्या गोदूचे थाटाने लग्न केले, म्हूणन आम्हाला चिडविण्यासाठी या इसमाने आपल्या मुलीचे त्याहून मोठ्या थाटात लग्न केले.’– बाई.

‘म्हणजे मी माझ्या मुलीला कुमारिकाच ठेवायला हवे होते काय?’ पुरसोबाबची पृच्छा.

‘हा पुरसोबाब सोमवार, गुरुवार या आमच्या व्रतांच्या दिवशी तर हटकून मासळी आणतो आणि ती तासतासभर तळत बसतो. त्या वासाने आमचा सोमवार, गुरुवार भ्रष्ट होतो.’– लक्ष्मी.

‘आमची मुलं मासळीसाठी रडतात.’ – इति श्रीपाद.

‘हे बघा इन्स्पेक्टरसाहेब, मी आतापर्यंत कायदेशीररीत्या मासळी तळत आलो आहे. मालकाने मला चाळीत बिऱ्हाड देताना सोमवार, गुरुवार मासळी खाऊ नये अशी अट घातलेली नाही, त्यामुळे मी मासळी खातो, यापुढेही खाणार’ असे सांगून पुरसोबाब पुढे म्हणाले, ‘हे सगळं एक वेळ ऐकून घेता येईल पण तुम्ही सांगा, दर सोमवार, गुरुवारी चांगल्या सिमेंटच्या जमिनीवर शेणाचा शिंतोडा घालण्याची याना गरज काय? त्या

८६

शेणाच्या गलिच्छ दर्पानं माझी आतडी विटत आली आहेत.'

'आम्ही आमच्या घरात काहीही करू, तुला ती उठाठेव नको.' लक्ष्मीबाई आणि मागोमाग 'हयवय तुला ते नको.' श्रीयुत श्रीपाद यांचा सूर.

'बरं ते असो.'

'दुसरी गोष्ट, हा पुरसोबाब मुलांच्या अभ्यासाच्या वेळी रेडिओ लावत असल्याने आमची सर्व मुले मागच्या परीक्षेत नापास झाली.'– लक्ष्मी.

पण आमच्या घरातील सर्व मुले पास झाली ती काय चमत्काराने? असाणि इन्स्पेक्टरसाहेब, मी अंथरुणावर पडलो म्हणजे त्यांच्या रेडिओचा लाऊडस्पीकर कसा होतो हे त्यांना विचारा.' पुरसोबाबने त्याला कात्रीत पकडत विचारले.

'बरं ते असू द्या. आता मला सांगा, यांच्या मोरीतून पाणी बाहेर जाते तिथे मोठे डबके झाले आहे व तिथे मधमाशीएवढे डास तयार झाले आहेत. हे डास नेमके आम्हालाच चावतात. ही जादू मला समजत नाही. हा पुरसोबाब आपल्या देवाकडे तासतासभर बसतो आणि जादुटोणा करतो. त्याच्या जादूमुळे आमच्या नळांना पाणी येत नाही. कधी कधी तर हे नळ भूतबाधा झाल्याने नुसतेच 'सॉं–क्' करून अंगावर येतात आणि पाणी येत नाही. हा माणूस देवाकडे आमच्या घरातील सर्वांची नावे घेऊन गाऱ्हाणे का घालतो ते आज मला कळलेच पाहिजे.' लक्ष्मीबाई त्वेषाने उद्गारल्या.

पुरसोबाब तेवढ्याच थंडपणे म्हणाले, 'इन्स्पेक्टरसाहेब आता मात्र हद्द झाली अहो, मी देवाकडे 'श्रीकृष्ण कमलापदे यदुपदे सीतापदे श्रीपदे, वैकुंठाधीपते, चराचरपते, लक्ष्मीपते तारी मा, असा श्लोक...'

त्याना मध्येच तोडत लक्ष्मीबाई ओरडल्या, 'हेच ते गाऱ्हाणे.' यात कृष्णा हा माझा मुलगा, कमला, सीता या मुली, यदु अर्थात गोदू ही लग्न करून दिलेली मुलगी, श्रीपाद म्हणजे आमचे 'हे', वैकुंठ म्हणजे आमच्या ह्यांचे वडील आणि तारी हे आमचे आडनाव, आत बोला इन्स्पेक्टरसायब.' लक्ष्मीबाईंनी जणू त्यांना पुराव्यानिशी पकडले होते.

'साहेब ही सगळी नावे श्लोकात आहेत त्याला मी काय करणार. तसा आणखीही एक श्लोक मी म्हणतो, उदाहरणार्थ, श्रीराम, पुरुषोत्तम, नरहरी, नारायणा, केशवा, गोविंदा, गरूडाध्वजे, गुणनिधे, दामोदरा, माधवा.'

पुरसोबाबचे श्लोकपठण संपताच लक्ष्मीबाईचा नवरा पुढे आला.



शेणाच्या गलिच्छ दर्पानं माझी आतडी विटत आली आहेत.'

'आम्ही आमच्या घरात काहीही करू, तुला ती उठाठेव नको.' लक्ष्मीबाई आणि मागोमाग 'हयवय तुला ते नको.' श्रीयुत श्रीपाद यांचा सूर.

'बरं ते असो.'

'दुसरी गोष्ट, हा पुरसोबाब मुलांच्या अभ्यासाच्या वेळी रेडिओ लावत असल्याने आमची सर्व मुले मागच्या परीक्षेत नापास झाली.'– लक्ष्मी.

पण आमच्या घरातील सर्व मुले पास झाली ती काय चमत्काराने? असाणि इन्स्पेक्टरसाहेब, मी अंथरुणावर पडलो म्हणजे त्यांच्या रेडिओचा लाऊडस्पीकर कसा होतो हे त्यांना विचारा.' पुरसोबाबने त्याला कात्रीत पकडत विचारले.

'बरं ते असू द्या. आता मला सांगा, यांच्या मोरीतून पाणी बाहेर जाते तिथे मोठे डबके झाले आहे व तिथे मधमाशीएवढे डास तयार झाले आहेत. हे डास नेमके आम्हालाच चावतात. ही जादू मला समजत नाही. हा पुरसोबाब आपल्या देवाकडे तासतासभर बसतो आणि जादुटोणा करतो. त्याच्या जादूमुळे आमच्या नळांना पाणी येत नाही. कधी कधी तर हे नळ भूतबाधा झाल्याने नुसतेच 'सॉं–क्' करून अंगावर येतात आणि पाणी येत नाही. हा माणूस देवाकडे आमच्या घरातील सर्वांची नावे घेऊन गाऱ्हाणे का घालतो ते आज मला कळलेच पाहिजे.' लक्ष्मीबाई त्वेषाने उद्गारल्या.

पुरसोबाब तेवढ्याच थंडपणे म्हणाले, 'इन्स्पेक्टरसाहेब आता मात्र हद्द झाली अहो, मी देवाकडे 'श्रीकृष्ण कमलापदे यदुपदे सीतापदे श्रीपदे, वैकुंठाधीपते, चराचरपते, लक्ष्मीपते तारी मा, असा श्लोक...'

त्याना मध्येच तोडत लक्ष्मीबाई ओरडल्या, 'हेच ते गाऱ्हाणे.' यात कृष्णा हा माझा मुलगा, कमला, सीता या मुली, यदु अर्थात गोदू ही लग्न करून दिलेली मुलगी, श्रीपाद म्हणजे आमचे 'हे', वैकुंठ म्हणजे आमच्या ह्यांचे वडील आणि तारी हे आमचे आडनाव, आत बोला इन्स्पेक्टरसायब.' लक्ष्मीबाईंनी जणू त्यांना पुराव्यानिशी पकडले होते.

'साहेब ही सगळी नावे श्लोकात आहेत त्याला मी काय करणार. तसा आणखीही एक श्लोक मी म्हणतो, उदाहरणार्थ, श्रीराम, पुरुषोत्तम, नरहरी, नारायणा, केशवा, गोविंदा, गरूडाध्वजे, गुणनिधे, दामोदरा, माधवा.'

पुरसोबाबचे श्लोकपठण संपताच लक्ष्मीबाईचा नवरा पुढे आला.

‘हयवय हेच ते दुसरे गाऱ्हाणे. यात माझ्या बायकोच्या माहेरच्या सगळ्या लोकांची नावे आहेत.’

इन्स्पेक्टरानी काहीही लिहून न घेता डायरी बंद केली आणि म्हणाले, ‘या पृथ्वीतलावावर तुमचा खटला चालविणारे कोर्ट अद्याप तरी अस्तित्वात आलेले नाही. ते कधी तरी निर्माण व्हावे अशी प्रार्थना करा आणि घरी चला.’

लक्ष्मीबाई, पुरसोबाब यांच्या केकाटण्यात कुत्र्यानेही आपली बोंबाबोंब चालू ठेवीत हा लवाजमा चाळीकडे परतला आणि शांत झाला.

**पुष्पाग्रज**

(‘हंसोळी’ वरून)

●●●



‘हयवय हेच ते दुसरे गाऱ्हाणे. यात माझ्या बायकोच्या माहेरच्या सगळ्या लोकांची नावे आहेत.’

इन्स्पेक्टरानी काहीही लिहून न घेता डायरी बंद केली आणि म्हणाले, ‘या पृथ्वीतलावावर तुमचा खटला चालविणारे कोर्ट अद्याप तरी अस्तित्वात आलेले नाही. ते कधी तरी निर्माण व्हावे अशी प्रार्थना करा आणि घरी चला.’

लक्ष्मीबाई, पुरसोबाब यांच्या केकाटण्यात कुत्र्यानेही आपली बोंबाबोंब चालू ठेवीत हा लवाजमा चाळीकडे परतला आणि शांत झाला.

**पुष्पाग्रज**

(‘हंसोळी’ वरून)

●●●

# – राष्ट्रगुरु समर्थांचा मुलांस उपदेश –

बरे सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक येणे तुम्हाला ।।
धरा बुद्धि पोटी विवेके मुले हो ।
बरा गुण तो अंतरामाजि राहो ।।१।।
सदा दात घासोनि तोंडा धुवावे ।
कयाहीन घाणेरडे बा नसावे ।।
सदा सर्वदा यत्न सोडू नये रे ।
बहूकाळ हा खेळ कामा नये रे ।। २।।
दिसामाजि काहीतरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ।।
गुणश्रेष्ठ उपास्य त्यांना करावे ।
बरे बोलणे नित्य जीवी धरावे ।।३।।
बहू खेळ खोटा सदालस्य खोटा ।
समस्तासि भांडेल तोची करंटा ।
बहुतां जनांलागि जीवी भजावे।
भल्या संगती न्याय तेथे बसावे ।।४।।
भला रे भला बोलती ते करावे ।
बहूता जनांचे मुखे येश घ्यावे ।।
परी शेवटी सर्व सोडोनी द्यावे ।
मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।।५।।

●●●



# – राष्ट्रगुरु समर्थांचा मुलांस उपदेश –

बरे सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक येणे तुम्हाला ।।
धरा बुद्धि पोटी विवेके मुले हो ।
बरा गुण तो अंतरामाजि राहो ।।१।।
सदा दात घासोनि तोंडा धुवावे ।
कयाहीन घाणेरडे बा नसावे ।।
सदा सर्वदा यत्न सोडू नये रे ।
बहूकाळ हा खेळ कामा नये रे ।। २।।
दिसामाजि काहीतरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ।।
गुणश्रेष्ठ उपास्य त्यांना करावे ।
बरे बोलणे नित्य जीवी धरावे ।।३।।
बहू खेळ खोटा सदालस्य खोटा ।
समस्तासि भांडेल तोची करंटा ।
बहुतां जनांलागि जीवी भजावे।
भल्या संगती न्याय तेथे बसावे ।।४।।
भला रे भला बोलती ते करावे ।
बहूता जनांचे मुखे येश घ्यावे ।।
परी शेवटी सर्व सोडोनी द्यावे ।
मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।।५।।

●●●

८९

# श्रमदीप उजळा घरोघरी

श्रमदीप उजळा घरोघरी
अन् करा दिवाळी साजरी
आळस झटकुनी टाका सारा
उद्योगाचा फिरू द्या वारा
जुनी जळमटे जाळुनि आता
सजवा अभिनव नगरी
चैन नको आराम नको
पोकळ तो बडेजाव नको
घाम गाळूनी जीवन सजवू
दैन्यहि जाईल दूरी
लहानमोठा भेद कशाला
गरीबालाहि म्हणा आपला
घास मुखीचा त्यालाहि द्या
देवच येईल घरी
कुठे कुणाची नको खुशामत
मीपणाची द्या सोडुनि संगत
भ्रष्टाचारी भुतास पळवा
प्रकाश आणा घरी
सुजळ सुफल हा देश करू या
धैर्य धरूनि पुढे सरू या
अंधकार हा सरेल आणिक
श्रद्धा होईल खरी

– दिनकर शिर्के

●●●



श्रमदीप उजळा घरोघरी

श्रमदीप उजळा घरोघरी
अन् करा दिवाळी साजरी
आळस झटकुनी टाका सारा
उद्योगाचा फिरू द्या वारा
जुनी जळमटे जाळुनि आता
सजवा अभिनव नगरी
चैन नको आराम नको
पोकळ तो बडेजाव नको
घाम गाळूनी जीवन सजवू
दैन्यहि जाईल दूरी
लहानमोठा भेद कशाला
गरीबालाहि म्हणा आपला
घास मुखीचा त्यालाहि द्या
देवच येईल घरी
कुठे कुणाची नको खुशामत
मीपणाची द्या सोडुनि संगत
भ्रष्टाचारी भुतास पळवा
प्रकाश आणा घरी
सुजळ सुफल हा देश करू या
धैर्य धरूनि पुढे सरू या
अंधकार हा सरेल आणिक
श्रद्धा होईल खरी

– दिनकर शिर्के

●●●

९०

# आमुचे पाऊल पुढे

प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे
डोळे आमुचे विज्ञानाच्या नव्या प्रकाशाकडे

अज्ञानाच्या मोडत बागा
विस्तारित क्षितिजाच्या रेघा
खुडत चाललो बीज आंधळ्या श्रद्धेचे तोकडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे

ज्ञानाच्या वटवृक्षापोटी....
ठावुक आम्हाला फळे गोमटी
आणि उद्याच्या उषःकालचे आम्हीच पाईक गडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे

गती–कृतीची आमुची भाषा
प्रगतीची आम्हा अभिलाषा
नसे आम्हाला तसे कोणत्या काळाचे वावडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे–

**–डॉ. कल्याण इनामदार**



आमुचे पाऊल पुढे

प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे
डोळे आमुचे विज्ञानाच्या नव्या प्रकाशाकडे

अज्ञानाच्या मोडत बागा
विस्तारित क्षितिजाच्या रेघा
खुडत चाललो बीज आंधळ्या श्रद्धेचे तोकडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे

ज्ञानाच्या वटवृक्षापोटी....
ठावुक आम्हाला फळे गोमटी
आणि उद्याच्या उषःकालचे आम्हीच पाईक गडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे

गती–कृतीची आमुची भाषा
प्रगतीची आम्हा अभिलाषा
नसे आम्हाला तसे कोणत्या काळाचे वावडे
प्रकाशयात्री आम्ही सगळी, आमुचे पाऊल पुढे–

–डॉ. कल्याण इनामदार

९१

# गौरवगान

भारतभूचे सुपुत्र आम्ही गातो गौरवगान
मानवतेचा धर्म आमुचा, विश्वास अभिमान ।। धृ.।।

इथे नांदती सर्व सुखाने, धर्मपंथ हे मिळून सारे
सहिष्णुतेचे निषाण फडके, समानतेचे वहात वारे
भारतवासी आळवु आम्ही, एकच मंत्र महान ।। १ ।।

राष्ट्रगीत ही अमुची गीता, कोटि मुखांनी सांगे जनता
इथे दिसतसे जरी विविधता, अभंग तरिही राष्ट्र एकता
निर्मळ गंगा आणि तिरंगा, आमचे पंचप्राण ।। २ ।।

एकत्वाचा हा तेजस्वी, दीप तेवतो या भूमीवर
माती इथली माता आमुची, मानवतेचे इथेच मंदिर
उच्च-नीच ना कोणी येथे, सारे एक समान ।। ३।।

–बंडा जोशी

●●●



# गौरवगान

भारतभूचे सुपुत्र आम्ही गातो गौरवगान
मानवतेचा धर्म आमुचा, विश्वास अभिमान ।। धृ.।।

इथे नांदती सर्व सुखाने, धर्मपंथ हे मिळून सारे
सहिष्णुतेचे निषाण फडके, समानतेचे वहात वारे
भारतवासी आळवु आम्ही, एकच मंत्र महान ।। १ ।।

राष्ट्रगीत ही अमुची गीता, कोटि मुखांनी सांगे जनता
इथे दिसतसे जरी विविधता, अभंग तरिही राष्ट्र एकता
निर्मळ गंगा आणि तिरंगा, आमचे पंचप्राण ।। २ ।।


एकत्वाचा हा तेजस्वी, दीप तेवतो या भूमीवर
माती इथली माता आमुची, मानवतेचे इथेच मंदिर
उच्च-नीच ना कोणी येथे, सारे एक समान ।। ३।।

–बंडा जोशी


●●●

९२


# भारतीय संरक्षण दलाची मानचिह्ने




परम वीर चक्र



महावीर चक्र




अशोक चक्र
वर्ग १




अशोक चक्र
वर्ग २




भारतीय संरक्षण दलाची मानचिह्ने




परम वीर चक्र



महावीर चक्र



अशोक चक्र
वर्ग १




अशोक चक्र
वर्ग २

९३


# भारतीय संरक्षण दलाची मानचिह्ने

सुलट बाजू उलट बाजू





वीर चक्र

सुलट बाजू उलट बाजू





दीर्घ सेवा आणि सदाचार पदक

सुलट बाजू उलट बाजू




अशोक चक्र वर्ग ३

सुलट बाजू उलट बाजू





स्पृहदीय सेवा पदक




# भारतीय संरक्षण दलाची मानचिह्ने

सुलट बाजू उलट बाजू





वीर चक्र

सुलट बाजू उलट बाजू





दीर्घ सेवा आणि सदाचार पदक

सुलट बाजू उलट बाजू




अशोक चक्र वर्ग ३

सुलट बाजू उलट बाजू




स्पृहदीय सेवा पदक

९४